# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ५

## सभावृत्तांत

दिनांक – २०.०६.२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुन-२०१७ ची मा.महापालिका सभा मंगळवार दि.२०.०६.२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे - महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे - उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.वसंत प्रभाकर बोराटे
११) मा.बुर्डे सुवर्णा विकास
१२) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१३) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१४) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१५) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१६) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१७) मा.गायकवाड निर्मला मनोज
१८) मा.सागर बाळासाहेब गवळी
१९) मा.गोफणे अनुराधा देविदास

२०) मा.बारसे प्रियांका प्रविण

२१) मा.अजित दामोदर गव्हाणे

२२) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२३) मा.लांडगे सारिका संतोष

२४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

२६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२७) मा.फुगे भिमाबाई पोपट

२८) मा. ॲड. नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२९) मा.सावळे सिमा रविंद्र

३०) मा.लोंढे नम्रता योगेश

३१) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३२) मा.लांडे विक्रांत विलास

३३) मा.गीता सुशिल मंचरकर

३४) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३५) मा.अनुराधा गणपत गोरखे

३६) मा.केशव हनुमंत घोळवे

३७) मा.मंगला अशोक कदम

३८) मा.तुषार रघुनाथ हिंगे

३९) मा.अश्विनी भिमा बोबडे

४०) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

४१) मा.संजय बबन नेवाळे

४२) मा.एकनाथ रावसाहेब पवार

४३) मा.भालेकर प्रविण महादेव

४४) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४५) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४६) मा.घोलप कमल अनिल

४७) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४८) मा.पवळे सुमनताई मधुकर

४९) मा.चिखले सचिन तुकाराम

५०) मा.यादव मीनल विशाल

५१) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५२) मा.प्रमोद कुटे

५३) मा.राजू मिसाळ

५४) मा.बाबर शर्मिला राजू

५५) मा.अमित राजेंद्र गावडे

५६) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५७) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५८) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५९) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

६०) मा.ढाके नामदेव जनार्दन

६१) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६२) मा.करुणा शेखर चिंचवडे

६३) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६४) मा.भोईर सुरेश शिवाजी

६५) मा.अपर्णा निलेश डोके

६६) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६७) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६८) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६९) मा.जयश्री वसंत गावडे

७०) मा.कोमल दिपक मेवानी

७१) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७२) मा.सुलक्षणा राजू धर

७३) मा.शाम गणपतराव लांडे

७४) मा.योगेश मंगलसेन बहल

७५) मा.कदम निकीता अर्जुन

७६) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७७) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७८) मा.नढे विनोद जयवंत

७९) मा.पाडाळे निता विलास

८०) मा.काळे उषा दिलीप

८१) मा.कोकणे संतोष अंकुश

८२) मा.बारणे अर्चना तानाजी

८३) मा.अभिषेक गोविंद बारणे

८४) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८५) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८६) मा.बारणे माया संतोष

८७) मा.निलेश हिरामण बारणे

८८) मा.दर्शले रेखा राजेश

८९) मा.कलाटे राहुल तानाजी

९०) मा.कलाटे मयूर पांडुरंग

९१) मा.कामठे तुषार गजानन

९२) मा.चोंधे आरती सुरेश

९३) मा.कस्पटे संदिप अरुण

९४) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९५) मा.सविता बाळकृष्ण खुळे

९६) मा.सुनिता हेमंत तापकीर

९७) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९८) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९९) मा.कुटे निर्मला संजय

१००) मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

१०१) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१०२) मा.आंगोळकर सागर सुनिल

१०३) मा.मुंढे उषा अंकुश

१०४) मा.कदम शशिकांत गणपत

१०५) मा.लोखंडे चंदा राजू

१०६) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०७) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०८) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०९) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

११०) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१११) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११२) मा.नवनाथ दत्तू जगताप

११३) मा.संतोष बबन कांबळे

११४) मा.सोनवणे शारदा हिरेन

११५) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११६) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११७) मा.संजय मल्हारराव वाबळे

११८) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

११९) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

१२०) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

१२१) मा.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सह शहर अभियंता, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत-सहा.आयुक्त, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.इंगळे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.पाटील-कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) मे.सॅमटेक क्लिन अँन्ड केअर प्रा.लि. यांनी Automatic Public toilet adaption करणेबाबत प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.विलास मडिगेरी-**मा.महापौर साहेब, काश्मीर मधील राजोरी जिल्ह्यात ताबारेषेवर पाकिस्तानने केलेल्या गोळीबारात शहीद झालेला एक जवान, काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यात दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले ६ पोलीस, धरमशाला येथे खाजगी पर्यटन बस दरीत कोसळुन झालेल्या अपघातात मृत्यू पावलेले १० प्रवासी, खडकी येथील संरक्षण मंत्रालयाच्या दारुगोळा कारखान्यात झालेल्या स्फोटात मृत पावलेले दोन कर्मचारी, तसेच नागपूर येथे उच्चदाब वाहिनीचा धक्का लागून मृत पावलेले प्रियांश धर व पीयूष धर यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी. व ही सभा दुपारी २.३५ वा.पर्यंत तहकुब करणेत यावी.

**मा.केशव घोळवे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर -** श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.महापौर-**आजची सभा गुरुवार दि.२०/०६/२०१७ रोजी दुपारी २.३५ वा. पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

------

(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.विशेष महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक – ५</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

**<u>(दि.२०/०६/२०१७ (दु.२.०० वा.) ची तहकूब सभा)</u>**

<u>दिनांक – २०.०६.२०१७</u> <u>वेळ – दुपारी २.३५ वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०/०६/२०१७ (दु.२.०० वा.) ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दि.२०.०६.२०१७ रोजी दुपारी २.३५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.नितीन (आप्पा) प्रताप काळजे - महापौर
२) मा.शैलजा अविनाश मोरे - उपमहापौर
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
५) मा.साधना अंकुश मळेकर
६) मा.दत्तात्रय बाबूराव साने
७) मा.अश्विनी संतोष जाधव
८) मा.सारीका शिवाजी सस्ते
९) मा.राहुल गुलाब जाधव
१०) मा.बुर्डे सुवर्णा विकास
११) मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
१२) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
१३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
१४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
१५) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन
१६) मा.गायकवाड निर्मला मनोज
१७) मा.सागर बाळासाहेब गवळी

१८) मा.गोफणे अनुराधा देविदास

१९) मा.बारसे प्रियांका प्रविण

२०)मा.अजित दामोदर गव्हाणे

२१) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश

२२)मा.लांडगे सारिका संतोष

२३)मा.लांडगे राजेंद्र किसनराव

२४) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

२५) मा.फुगे भिमाबाई पोपट

२६)मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

२७) मा.सावळे सिमा रविंद्र

२८)मा.लोंढे नम्रता योगेश

२९)मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

३०)मा.लांडे विक्रांत विलास

३१) मा.गीता सुशिल मंचरकर

३२)मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर

३३)मा.अनुराधा गणपत गोरखे

३४) मा.केशव हनुमंत घोळवे

३५) मा.मंगला अशोक कदम

३६)मा.तुषार रघुनाथ हिंगे

३७) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

३८)मा.संजय बबन नेवाळे

३९)मा.एकनाथ रावसाहेब पवार

४०)मा.भालेकर प्रविण महादेव

४१)मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

४२) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

४३) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

४४) मा.घोलप कमल अनिल

४५) मा.उत्तम प्रकाश केंदळे

४६) मा.पवळे सुमनताई मधुकर

४७) मा.चिखले सचिन तुकाराम

४८) मा.यादव मीनल विशाल

४९) मा.वैशाली जालिंदर काळभोर

५०) मा.प्रमोद कुटे

५१) मा.राजू मिसाळ

५२) मा.बाबर शर्मिला राजू

५३) मा.अमित राजेंद्र गावडे

५४) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

५५) मा.खानोलकर प्रज्ञा महेश

५६) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

५७) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

५८) मा.ढाके नामदेव जनार्दन

५९) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई

६०) मा.करुणा शेखर चिंचवडे

६१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव

६२) मा.भोईर सुरेश शिवाजी

६३) मा.अपर्णा निलेश डोके

६४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

६५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

६६) मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे

६७) मा.जयश्री वसंत गावडे

६८) मा.कोमल दिपक मेवानी

६९)मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

७०) मा.सुलक्षणा राजू धर

७१) मा.शाम गणपतराव लांडे

७२) मा.योगेश मंगलसेन बहल

७३) मा.कदम निकीता अर्जुन

७४) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

७५) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७६) मा.नढे विनोद जयवंत

७७) मा.पाडाळे निता विलास

७८) मा.काळे उषा दिलीप

७९) मा.कोकणे संतोष अंकुश

८०) मा.बारणे अर्चना तानाजी

८१) मा.अभिषेक गोविंद बारणे

८२) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

८३) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८४) मा.बारणे माया संतोष

८५) मा.निलेश हिरामण बारणे

८६) मा.दर्शले रेखा राजेश

८७) मा.कलाटे राहुल तानाजी

८८) मा.कलाटे मयूर पांडुरंग

८९)मा.कामठे तुषार गजानन

९०)मा.चोंधे आरती सुरेश

९१) मा.कस्पटे संदिप अरुण

९२)मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

९३)मा.सविता बाळकृष्ण खुळे

९४) मा.सुनिता हेमंत तापकीर

९५) मा.चंद्रकांत बारकु नखाते

९६) मा.बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

९७) मा.कुटे निर्मला संजय

९८)मा.शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

९९) मा.विठ्ठल उर्फ नाना काटे

१००)मा.आंगोळकर सागर सुनिल

१०१) मा.मुंढे उषा अंकुश

१०२) मा.कदम शशिकांत गणपत

१०३) मा.लोखंडे चंदा राजू

१०४) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

१०५) मा.आशा धायगुडे-शेंडगे

१०६) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

१०७) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

१०८) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

१०९) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

११०) मा.नवनाथ दत्तू जगताप

१११) मा.संतोष बबन कांबळे

११२) मा.सोनवणे शारदा हिरेन

११३) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे

११४) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

११५) मा.वाबळे संजय मल्हारराव

११६) मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

११७) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

११८) मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू

११९) मा.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त,मा.अच्युत हांगे-अति.आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधेकर, मा.पठाण-सह शहर अभियंता, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर, मा.बोदडे, मा.खोत-सहा.आयुक्त, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम, मा.इंगळे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी, मा.गट्टूवार, मा.पुजारी, मा.भोसले, मा.पाटील-कार्यकारी अभियंता, मा.लावंड-कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर-**उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

विशेष मा.महापालिका सभा क्र-०१ दि.१४/०३/२०१७ व दि.२३/०३/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

## नियुक्त्या

**विषय क्रमांक-१)** मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे यांनी मा.विधी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.विधी समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे.

**मा.नगरसचिव –** विषय क्रमांक १ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.विधी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.विधी समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने सदर रिकाम्या जागेवर नियुक्ती करणे. मा.सदस्यांच्या नियुक्त्या सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन नामनिर्देशनाव्दारे करणे करीता सदर कलमा अन्वये महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणा-या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद करण्यात आली. तसेच रिक्त होणा-या जागांवर राजीनामा दिलेले मा.सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा गटाचा आघाडीचा किंवा फ्रंटचा आहे त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या/ नोंदणीकृत पक्षाच्या/गटाच्या/ आघाडीच्या किंवा फ्रंटच्या मा.सदस्यास नामनिर्देशित करावयाचे आहेत.

१) मा. शितल उर्फ विजय गोरख शिंदे - भारतीय जनता पार्टी,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टीचे गटनेते मा.एकनाथ पवार यांनी त्यांच्या पक्षाचे १ सदस्यांचे नांव बंद लखोटयामध्ये स्वाक्षरीनीशी मा.महापौरांकडे द्यावेत. (बंद लखोटा देणेत आला.)

मा.महापौर यांनी बंद लखोटा सर्वांसमक्ष उघडला आणि त्यामध्ये असणारे नांव श्री.बोदडे, सहा.आयुक्त, माहिती व जनसंपर्क विभाग यांनी सभागृहात वाचून दाखविले ते पुढीलप्रमाणे-

१) मा.चिंचवडे सचिन बाजीराव, पिंपरी चिंचवड महानगरपालिका भारतीय जनता पार्टी.

ठराव क्रमांक -३६ विषय क्रमांक – १
दिनांक – २०/६/२०१७ विभाग – नगरसचिव

मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे यांनी मा.विधी समिती सदस्य पदाचा राजीनामा दिला असल्याने मा.विधी समिती सदस्यत्वाची एक जागा रिकामी झाली असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ अ आणि पिंपरी चिंचवड शहराच्या महानगरपालिकेच्या समित्यांच्या सभा इ.चे संचालन करण्याविषयीचे जादा नियमांपैकी नियम क्र.६९ मध्ये निर्देश केल्याप्रमाणे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणेकामी मान्यताप्राप्त पक्षांचे/नोंदणीकृत पक्षांचे/गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेवुन आणि सदर रिकाम्या जागेवर सभागृह नेता/विरोधी पक्षनेता/पक्षनेता/गटनेता यांच्याशी विचारविनिमय करुन महानगरपालिकेतील पक्षांच्या/गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात १) मा.चिंचवडे सचिन बाजीराव या पालिका सदस्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करण्यात आली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

(नियुक्त मा.विधी समिती सदस्यांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करणेत आला.)

-----------

**मा.नगरसचिव** – प्रश्नोत्तरे - मा.विलास हनुमंतराव मडिगेरी यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.विलास मडिगेरी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.नगरसचिव, सन्मा.सभागृह, सर्व अधिकारी, पत्रकार बंधू, या महिन्यात मी माझ्या प्रश्नांचे एक पत्र आपल्याला दिले होते. मा.महापौर साहेबांनी माझ्या पत्राचा स्विकार करुन माझे प्रश्न घेतलेत, त्याबद्दल मी मा.महापौर साहेबांचे आभार मानतो. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने गेले अनेक वर्षापासून अनुदान प्रक्रियेसंदर्भात मी काही प्रश्न मांडले होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत एकूण किती आर्थिक मदत केली आहे, किती ट्रस्ट/संस्थांना रक्कम दिली आहे, ट्रस्ट/संस्था/मंडळ असे म्हटले असेलतर त्यांचे संपूर्ण नाव काय-काय आहे, आजपर्यंत दिलेल्या एकूण रकमा किती, मोबाईल नंबर काय-काय आहेत, ट्रस्ट/संस्था/मंडळ असे म्हटले असेलतर त्यांचे रजिस्टर्ड नंबर काय आहेत, या सर्व प्रश्नांची माहिती वर्षनिहाय यादीचा चार्ट तयार करुन द्यावी अशी मागणी केली होती. छायांकित प्रत मागीतलीतर खूप मोठ्या प्रमाणात खर्च होईल म्हणून इथे यादीचा चार्ट मागितला होता. याठिकाणी सभागृहात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू मा.महापौर साहेब, माहिती देत असताना

अपूरी,अर्धवट माहिती अनेक ठिकाणी दिलेली आहे. मला कल्पना आहे की, खूप जूनी माहिती असल्याकारणाने माहिती उपलब्ध झाली नसेल तरी पुढील काळात राहिलेली सर्व अर्धवट माहिती आहे ती उपलब्ध करुन देण्याचे आदेश मा.आयुक्त साहेबांनी अधिका-यांना द्यावेत.

महापालिकेच्या स्थापनेपासूनची माहिती आपण मागितली होती. उपलब्ध माहितीनुसार सन १९८२ ते १९९० सालात कोणत्याही प्रकारचा निधी दिला नाही. याठिकाणी अशा प्रकारची माहिती मा.आयुक्त साहेबांनी दिली आहे. सन १९९० ते १९९१ या काळात र.रु.२२,७९,५००/- चा निधी वाटप केला होता. त्याचप्रमाणे त्या वर्षाची माहिती देत असताना त्या कालखंडातील संस्थेचे नाव, अध्यक्षांचे नाव, रजिस्टर्ड नंबर, नाव उपलब्ध करुन दिलेले नाही, हे मी सांगू इच्छितो. सन १९९१ ते १९९२ या काळात र.रु.४८,००,०००/- लाखांचे अनुदान दिले आहे. संस्थेचे नाव,अध्यक्षांचे नाव,रजिस्टर्ड नंबर दिलेला नाही. सन १९९२ ते १९९३ मध्ये र.रु.१९,०५,३००/- रुपयांचे अनुदान दिले गेले आहे. त्याच्यासुद्धा संस्थेचे नाव, अध्यक्षाचे नाव, रजिस्टर्ड नंबर दिलेला नाही. सन १९९३ ते १९९४ मध्ये र.रु.५,५७,००१/- असे अनुदान दिले आहे. याची माहिती देताना संस्थेचे नाव, अध्यक्षाचे नाव, रजिस्टर्ड नंबर दिला आहे. सन १९९४ ते १९९५ या काळात र.रु.२९,४९,८२२/- रुपयांचा निधी वाटप करण्यात आला आहे. त्याच्याही संस्थेचे नाव, अध्यक्षाचे नाव, रजिस्टर्ड नंबर दिला गेलेला नाही. याची नोंद करुन घ्यावी. सन १९९५ ते १९९६ या काळात र.रु.३१,११,०००/- निधी वाटप केला आहे. यात अध्यक्षाचे नाव, संस्थेचे नाव, रजिस्टर्ड नंबर दिलेला नाही. सन १९९७-१९९८ या काळात र.रु.५०,०९,४००/- निधी वाटप केला आहे. अध्यक्षाचे नाव, संस्थेचे नाव, रजिस्टर्ड नंबर दिलेला नाही. सन १९९८-१९९९ या काळात र.रु.१९,०२,९३५/- निधी वाटप केले आहे, याची माहिती योग्य रितीने दिलेली आहे. सन १९९९-२००० या कालखंडात र.रु.२३,९४,७००/- निधी वाटप केला आहे. याची माहिती योग्य रितीने दिलेली आहे. सन २०००-२००१ या कालखंडात र.रु.२९,५६,५९४/- असा निधी वाटप केला आहे. त्याची माहिती योग्य रितीने मागितल्याप्रमाणे दिलेली आहे. सन २००१-२००२ या कालखंडात र.रु.२४,३६,८७९/- निधी वाटप केला आहे. त्याची योग्य रितीने माहिती दिली आहे. सन २००२ ते २००३ या कालखंडात र.रु.६४,९४,०४५/- निधी वाटप केला आहे. त्याची योग्य रितीने माहिती दिलेली नाही. संस्थेचे नाव, अध्यक्षाचे नाव, रजिस्टर्ड नंबर दिलेला नाही. सन २००३-२००४ या कालखंडात र.रु.१४,४९,०००/- निधी वाटप केला आहे. मागितल्याप्रमाणे व्यवस्थित माहिती दिलेली आहे. सन २००४-२००५ या कालखंडात र.रु.३९,६४,०००/- निधी वाटप केला असून त्याची माहिती मागितल्याप्रमाणे योग्यरित्या दिलेली आहे. सन २००५-२००६ या कालखंडात र.रु.२६,६३,५००/- निधी वाटप केला आहे. मागितल्याप्रमाणे माहिती योग्य रितीने दिलेली आहे. सन २००६-२००७ या कालखंडात र.रु.५७,८७,२००/- निधी वाटप केला आहे. परंतू त्यात संस्थेचे नाव, अध्यक्षाचे नाव काही दिलयं, काही माहिती दिलेली नाही, अशी अर्धवट माहिती दिलेली आहे. त्यामुळे कोणती संस्था,

अध्यक्ष कोण हे लक्षात येत नाही, याची नोंद करुन घ्यावी. सन २००७-२००८ या वर्षासाठी र.रु.६०,९८,०००/- निधी वाटप केला आहे. मागितल्याप्रमाणे माहिती योग्य रितीने प्राप्त आहे. सन २००८-२००९ या कालखंडात र.रु.५६,४५,६६७/- निधी वाटप केला आहे. माहिती योग्य रितीने मागितल्याप्रमाणे प्राप्त आहे. सन २००९-२०१० या कालखंडात र.रु.७५,३०,१२६/- इतका निधी वाटप केला आहे. मागितल्याप्रमाणे माहिती व्यवस्थितरित्या उपलब्ध करुन दिलेली नाही. सन २०१०-२०११ या कालखंडात र.रु.३०,९७,८७८/- इतका निधी वाटप झाला असून मागितल्याप्रमाणे योग्य माहिती दिलेली आहे. सन २०११-२०१२ या साली र.रु.३१,६४,४६१/- निधी दिला आहे. मागितल्याप्रमाणे माहिती व्यवस्थितरित्या प्राप्त आहे. सन २०१२-२०१३ या कालखंडात र.रु.२९,८६,४९९/- इतका निधी वाटप केला आहे. मागितल्याप्रमाणे माहिती व्यवस्थितरित्या दिलेली आहे. सन २०१३-२०१४ या कालखंडात र.रु.२८,४३,८६८/- इतका निधी वाटप केला आहे. माहिती मागितल्याप्रमाणे व्यवस्थित चार्ट करुन दिली आहे. सन २०१४-२०१५ या कालखंडात र.रु.६४,१९,०९१/- निधी वाटप तिथे केला होता. त्याची माहिती व्यवस्थितरित्या मागितल्याप्रमाणे प्राप्त आहे. सन २०१५-२०१६ या कालखंडात र.रु.२७,९९,७६०/- इतका निधी वाटप केला आहे. त्याचीही माहिती मागितल्याप्रमाणे व्यवस्थित प्राप्त आहे. सन २०१६-२०१७ या कालखंडात र.रु.२५,००,०००/- निधी वाटप केला आहे. त्याचीही माहिती मागितल्याप्रमाणे इथे दिलेली आहे.

असे आपण १९९० पासून २०१७ पर्यंत पाहिलेतर जवळपास या अनुदानाच्या माध्यमातून एकूण र.रु.९७,२१,५१,७६८/- इतका निधी वाटप महापालिकेकडून करण्यात आला आहे. त्यात महापौर निधीतून वेगळी रक्कम अदा केली जाते. महापौर निधीतून आजपर्यंत र.रु.२,१४,८०,०००/- इतका निधी दिला आहे. तो निधी वजा केलातर र.रु.७,०६,७१,७५८/- इतक्या निधीचे वाटप इथे करण्यात आले आहे. शासन निर्णय, बीपीएमसी ॲक्टमधील कलम ८८ आय प्रमाणे विचार केलातर सोबत शासन आदेश प्राप्त केला आहे. त्यात उल्लेख आहे की, याठिकाणी तीन लाखापर्यंतचा निधी पाहिजे तसा देऊ शकतो. याठिकाणी अशी तरतूद दिसते आहे. परंतू तीन लाखांवरील रक्कम कोणाला द्यायची असेलतर त्याला शासन मान्यता घेऊन ती रक्कम देण्यात यावी. अशा प्रकारचा उल्लेख शासनाच्या आदेशपत्रात आहे. आपण पाच लाखापेक्षा जास्त रक्कम दिली आहे, त्याची छोटीशी यादी तयार केली आहे. सन १९९० ते १९९१ या काळात पाच लाख रुपये निधी रयत शिक्षण संस्था, कला व वाणिज्य विद्यालय, पिंपरी यांना दिला होता. त्याला आजपर्यंत शासन मान्यता मिळालेली नाही. सन १९९१-१९९२ या कालखंडात र.रु.३,०५,०००/- इतका निधी ज्योतीबा सावित्री कृतज्ञता प्रतिष्ठाण या संस्थेला दिला आहे. पण चार्टमध्ये आजपर्यंत शासन मान्यता दिसून येत नाही. सन १९९२-१९९३ या वर्षी र.रु.१५,००,०००/- इतका निधी पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे यांना दिला आहे. आजतागायत यास शासन मान्यता/परवाना प्राप्त नाही. सन १९९१-१९९२ या कालखंडात

र.रु.११,००,०००/- इतका निधी आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठाण यांना दिला गेला आहे. आजतागायत शासन मान्यता महापालिकेस प्राप्त नाही. सन १९९१-१९९२ या कालखंडात र.रु.६,००,०००/- निधी स्पोर्टस् अँड रिसर्च फेडरेशन ऑफ इंडिया या संस्थेला दिला गेला असून त्यास शासन मान्यता प्राप्त नाही. मुख्यमंत्री सहाय्यता निधी पाच लाख रुपये दिला गेला आहे. त्यासही शासन मान्यता प्राप्त नाही. सन १९९८-१९९९ या कालखंडात र.रु.१०,००,०००/- इतका निधी पुणे विद्यापीठ, पुणे यांना दिला आहे. यास आजतागायत शासन मान्यता प्राप्त नाही. सन २००२-२००३ या कालखंडात र.रु.२५,००,०००/- निधी संत तुकाराम वारकरी संशोधन मंडळ यांना दिला असून त्यास आजतागायत शासन मान्यता प्राप्त नाही. सन २००३-२००४ मध्ये र.रु.१०,००,०००/- निधी कै.लक्ष्मीबाई नांदगुडे विद्यालय यांना दिला आहे. यास शासन मान्यता मिळाली असल्याचे चार्टमध्ये दाखवले आहे. सन २००४-२००५ या कालखंडात र.रु.१५,००,०००/- निधी अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषद, पिंपरी यांना दिला असून यास शासन मान्यता असल्याचा उल्लेख चार्टमध्ये आहे. सन २००६-२००७ या कालखंडामध्ये र.रु.१०,,००,०००/- निधी चिंतामणी रात्रप्रशाला,चिंचवड यांना दिला आहे. यास आजतागायत शासन मान्यता प्राप्त नाही. सन २००६-२००७ मध्ये र.रु.११,००,०००/- निधी साधना ट्रस्ट,शनिवार पेठ,पुणे यांना दिला होता. यास शासन मान्यता मनपाला प्राप्त नाही. सन २००७-२००८ या कालखंडात र.रु.१०,००,०००/- निधी रमेश प्रोडक्शन प्रा.लि. यांना दिला होता. यास आजतागायत शासन मान्यता प्राप्त नाही. सन २००६-२००७ या कालखंडात र.रु.१४,००,०००/- इतके अनुदान प्राची पॅरामिडीया अँड रिसर्च अँड ऍनॅलिसिस या संस्थेला दिले होते. त्यास शासन मान्यता प्राप्त नाही. सन २००८-२००९ मध्ये र.रु.१०,००,०००/- इतका निधी नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ, तळेगाव यांना दिला होता. महापालिकेला त्याची आजतागायत शासन मान्यता प्राप्त नाही. मनपा वर्धापन दिनासाठी श्री.अभिनव ब्रिंद्रा यांना सन २००८-२००९ साली महापालिकेच्या वतीने र.रु.५,००,०००/- निधी दिला होता. महापालिकेच्या वतीने शासन मान्यता चार्टमध्ये दिसते आहे. सन २००८-२००९ मध्येच र.रु.५,००,०००/- निधी मनपा वर्धापन दिनी श्री.सुशिलकुमार यास वैयक्तिकरित्या महापालिकेच्या वतीने दिला होता. त्यास शासन मान्यता चार्टमध्ये दिसून येते आहे. सन २००८-२००९ मध्ये र.रु.५,००,०००/- निधी श्री.विजयेंद्र कुमार यांना दिला होता. यास शासन मान्यता असल्याचे दिसते आहे. सन २००८-२००९ या वर्षी र.रु.२०,००,०००/- रक्कम पिंपरी-चिंचवड कलारंग प्रतिष्ठाण यांना दिले होते. याची शासन मान्यता घेतल्याचे दिसून येते आहे. सन २००९-२०१० या कालखंडात र.रु.२५,००,०००/- निधी ग्रंथराज ज्ञानेश्वर सत्संग मंडळ, आळंदी देवाची यांना दिला होता. यास आजतागायत शासन मान्यता प्राप्त नाही. सन २०१६-२०१७ करिता र.रु.२५,००,०००/- निधी डेव्हीस कपसाठी महाराष्ट्र डेव्हीस असोसिएशन यांना दिला होता. यास आजतागायत शासन मान्यता प्राप्त नाही. या सर्व गोष्टींचा विचार केलातर एकूण र.रु.६०,००,०००/- यास

शासन मान्यता आहे. र.रु.१,८५,५०,०००/- या रकमेस आजतागायत शासन मान्यता नाही. मला या माध्यमातून प्रशासनाला विचारायचे आहे की, अशा पद्धतीने संस्था, मंडळे या सर्वांना आपण जी अनुदाने देतो, या अनुदानांचा विनियोग कशा स्वरुपात केला पाहीजे, त्याचे स्पष्टपणे अवलोकन त्या-त्या संस्थांनी केलेले नाही असे याठिकाणी दिसून येते आहे. जेव्हा अनुदान दिले गेले, त्या वेळेला प्रत्येका बरोबर करारनामा करण्यात आला. आणि करारनामा करत असताना त्यात अशा अटी होत्या की, ज्या संस्थेला अनुदान दिले आहे, त्यांनी योग्य रितीने ती रक्कम खर्च करावी. तो पैसा जनतेच्या हितासाठी वापरावा. अशा प्रकारचा उल्लेख आहे. आणि आपण करारनामा पाहिलातर त्यात अशा प्रकारचा उल्लेख आहे. लिहून देणार यांना देण्यात आलेले अनुदान रकमेचा खर्चाचा तपशिल लिहून घेणार यांच्याकडे ज्या आर्थिक वर्षाकरीता अनुदान दिले आहे,ते आर्थिक वर्ष संपल्यानंतर शासनमान्य लेखापरिक्षणाच्या प्रती लिहून देणार यांनी तीन महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक आहे. अशी कागदपत्रे सादर न केल्यास लिहून घेणार यांच्याकडून कारवाई केल्यास लिहून देणार यांच्याकडे काही तक्रार राहणार नाही असा त्या अटींत उल्लेख आहे.

मला सांगायला अत्यंत खेद वाटतोय की, मागील सत्ताधारी असतील,प्रशासन असेल, कोणतीही संस्था, कोणत्याही मंडळाने त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचा ऑडीट रिपोर्ट सादर केला नाही. मग आपण प्रशासन म्हणून एक वर्ष संपल्यानंतर त्यांच्याकडून तीन महिन्यांच्या कालखंडात त्यांच्याकडून घेणे अपेक्षित होते. परंतू आपण तो घेतला नाही. मला हेच विचारायचे आहे की, गेल्या वीस/पंचवीस वर्षांपासून हे चालू आहे. परंतू एवढे मोठे कोट्यावधी रुपयांचे अनुदान इथे दिल्यानंतर त्याचा योग्य विनियोग केला नाही असे दिसून येते आहे. यात अनेक संस्था दिसतात की, ज्यांना वारंवार प्रत्येक वर्षी अनुदान दिले गेले आहे. मा.महापौर साहेब, मला हे विचारायचे होते की, एक संस्था/ट्रस्टला किती वेळा अनुदान देण्याची तरतूद आहे. कशासाठी अनुदान देण्याची तरतूद आहे. त्यांनी एकदा ऑडीट रिपोर्ट दिला नाहीतरी आपण त्यांना परत-परत अनुदान का देतो आहोत,असा माझा प्रश्न आहे. म्हणजे मी काही संस्थांची, ट्रस्टची यादी पुस्तकातून काढली आहे. एका संस्थेला अनेक वेळा म्हणजे सन २००५-२००६ पासून सन २०१६ पर्यंत खूप मोठ्या रकमा देऊ केल्या आहेत. सन २००५ ते २००६ या कालखंडात साई संस्कार संस्था, आकुर्डी याच्या अध्यक्षा या सभागृहाच्या सन्मा.नगरसदस्या मंगलाताई अशोक कदम या आहेत. त्यांच्या संस्थेचा रजिस्टर्ड क्रमांक एमएच ११४४७ रजि. दि.१/७/१९९६ असा आहे. या संस्थेला र.रु.२,९०,०००/- इतके अनुदान दिले होते. सन २००६-२००७ मध्ये पुन्हा साई संस्कार संस्था, त्याच्या अध्यक्षा मंगलाताई अशोक कदम यांना र.रु.२,८६,०००/- इतके अनुदान दिले होते. सन २००८-२००९ साली साई संस्कार संस्था,आकुर्डी अध्यक्षा मंगलाताई अशोक कदम यांना र.रु.२,९०,०००/- इतके अनुदान दिले होते. परत सन २००९-२०१० या सालासाठी साई संस्कार संस्था,आकुर्डी, अध्यक्षा मंगलाताई अशोक कदम यांना

र.रु.२,९०,०००/- निधी दिला आहे. सन २०१०-२०११ करिता साई संस्कार संस्था,आकुर्डी अध्यक्ष श्री.खारगे शरद रामचंद्र यांना र.रु.४,००,३७५/- निधी दिला आहे. त्याचा अध्यक्ष वेगळा असलातरी संस्थेचा रजिस्टर क्र.एमएच/११४४७ दि.१/७/१९९६ असा आहे. सन २०११-२०१२ या कालखंडात तीच संस्था साई संस्कार संस्था,आकुर्डी, अध्यक्ष श्री.शरद खारगे यांना र.रु.२,९६,६२५/- इतका निधी दिला आहे. सन २०१२-२०१३ मध्ये साई संस्कार संस्था, आकुर्डी अध्यक्ष-श्री.शरद खारगे यांना र.रु.१,८९,२५२/- इतका निधी दिला आहे. सन २०१३-२०१४ करिता साई संस्कार संस्था,आकुर्डी अध्यक्ष-श्री.शरद रामचंद्र खारगे यांना र.रु.२,०२,०८२/- इतका निधी दिला आहे. सन २०१४-२०१५ या वर्षासाठी साई संस्कार संस्था,आकुर्डी अध्यक्ष-श्री.शरद खारगे यांना र.रु.२,९०,०००/-इतका निधी दिला आहे. सन २०१५-२०१६ या कालखंडात पुन्हा एकदा साई संस्कार संस्था,आकुर्डी अध्यक्ष-श्री.शरद खारगे यांना र.रु.२,९०,०००/- निधी दिला आहे. असे काही ठरावीक पाच/सहा याठिकाणी मी लिहून आणले आहेत, ते मी वाचू इच्छितो. सन १९९९ ते २००० या कालखंडात यमुनानगर महिला आघाडी, श्रीमती ऊबाळे सुलभा रामभाऊ यांना र.रु.१६,१००/-, सन २००१-२००२ मध्ये प्रबोधनकार क्रीडा विकास संस्था, श्री. ऊबाळे रामभाऊ यांना र.रु.४३,२००/- दिले आहेत. सन २०००-२००१ मध्ये प्रबोधनकार क्रीडा विकास संस्था,श्री.ऊबाळे रामभाऊ यांना र.रु.११,५००/- निधी दिला आहे. सन सन १९९९-२००० मध्ये प्रबोधनकार क्रीडा विकास संस्था,श्री.ऊबाळे रामभाऊ र.रु.२८,०००/-. मी या नावांचा उल्लेख एवढ्यासाठी करतो कारण याठिकाणी नगरसदस्य असलेल्या व्यक्तीच्या संस्थेला निधी देणे अभिप्रेत आहे का हे स्पष्ट करावे अशी मा.आयुक्त साहेबांना माझी विनंती आहे. त्याचबरोबर १९९९ ते २००० या कालखंडात मराठा सेवासंघ,महापालिकेचे तत्कालिन अधिकारी श्री.अमृत सोपान सावंत यांना र.रु.१५,०००/- निधी दिला होता. २०००-२००१ या कालखंडात मराठा सेवासंघ,श्री.अमृत सोपान सावंत यांना र.रु.१९,५००/- निधी दिलेला आहे. त्याचप्रमाणे सन २००१-२००२ मध्ये पिंपरी चिंचवड स्पोर्टस् फाऊंडेशनचे सुनील ज्ञानदेव चाबुकस्वार यांना र.रु.३६,०००/- निधी दिला आहे. पुन्हा सन २००१-२००२ मध्ये पिंपरी चिंचवड स्पोर्टस् फाऊंडेशनचे सुनील ज्ञानदेव चाबुकस्वार यांना र.रु.५०,०००/- निधी दिला आहे. सन १९९८-१९९९ मध्ये गांधी पेठ तालिम मंडळ, अध्यक्ष श्री.भाऊसाहेब भोईर यांना र.रु.२५,५००/- निधी दिला आहे. सन २०००-२००१ मध्ये गांधीपेठ तालिम मंडळ, अध्यक्ष श्री.गजानन पोपटराव चिंचवडे यांना र.रु.४६,१५०/-, सन २०००-२००१ मध्ये गांधीपेठ तालिम मंडळ, अध्यक्ष श्री.गजानन पोपटराव चिंचवडे यांना र.रु.२६,०००/- निधी दिला आहे. सन १९९९-२००० राणाप्रताप मित्र मंडळ, श्री.गजानन चिंचवडे अध्यक्ष आहेत, यांना र.रु.१५,०००/- निधी दिला आहे. पिंपरी चिंचवड जीवन मित्र प्रतिष्ठाणचे अध्यक्ष श्री.गजानन पोपटराव चिंचवडे यांना र.रु.३२६०/- निधी दिला होता. सन २००५-२००६ मध्ये गांधीपेठ तालिम मंडळाचे अध्यक्ष माजी नगरसेवक श्री.राजाभाऊ गोलांडे यांना र.रु.३०,०००/- निधी दिला आहे. २००१-२००२

मध्ये राष्ट्रतेज तरुण मंडळाचे अध्यक्ष माजी नगरसेवक श्री.मधुकर धरमजी बाबर यांना र.रु.४०,८००/-, सन २०००-२००१ मध्ये राष्ट्रतेज तरुण मंडळाचे अध्यक्ष श्री.शिंदे यांना र.रु.१,१९,०००/-, सन २०००-२००१ मध्ये एकता महिला विकास संस्था, अध्यक्षा आहेत माजी नगरसेविका शमिम पठाण यांना र.रु.१९,५००/-, २००१-२००२ मध्ये डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी उपमहापौर श्री.मुरलीधर ज्ञानेश्वर ढगे यांना र.रु.२०,०००/-, शरदचंद्र प्रतिष्ठाणचे अध्यक्ष श्री.मुरलीधर ज्ञानेश्वर ढगे यांना र.रु.१,५०,०००/- निधी, त्याचप्रमाणे १९९९-२००० मध्ये महाराष्ट्र एज्युकेशन मेडीकल फाऊंडेशनचे अध्यक्ष माजी नगरसेवक श्री.शशीकिरण गवळी यांना र.रु.९८,०००/- निधी दिला आहे. २००१-२००२ या कालखंडात सत्यश्री कला मंडळ याचे अध्यक्ष माजी नगरसेवक श्री.सतिश दरेकर यांना १४,४००/- निधी दिला आहे. २००१-२००२ नोबल एज्युकेशन सोसायटी, अध्यक्ष-श्री.सतिश दरेकर यांना ३४,४००/- निधी दिला आहे. २००१-२००२ मध्ये जागृती सामाजिक व युवक कल्याण विभाग याचे अध्यक्ष - श्री.फजल शेख हे शिक्षण मंडळाचे माजी सभापती आहेत. त्यांना र.रु.१३,६००/- निधी दिला होता. सन २००५-२००६ मध्ये सिताबाई लांडे प्रतिष्ठाणचे अध्यक्ष विद्यमान नगरसेवक श्री.शाम लांडे यांना र.रु.५०,०००/- निधी दिला होता.

निवडणूक लढत असताना उमेदवारांकडून शपथपत्र भरुन घेतो की, मी कोणत्याही प्रकारचा लाभ, कॉन्ट्रॅक्ट, एस्टिमेट असेलतर, एम्प्लॉयर असेलतर त्याचा लाभ घेणार नाही. अशा प्रकारचा उल्लेख त्या शपथपत्रात केलेला असतो. मला तुम्हाला विचारायचे आहे की, एक संस्था जिचे नाव आहे साई संस्कार संस्था, आकुर्डी यांना आजपर्यंत जवळपास र.रु.२४,९७,८३४/- इतका निधी दिला आहे. याठिकाणी या संस्थेने कोणत्याही प्रकारचा ऑडीट रिपोर्ट दिला नाही. तरीसुद्धा त्यांना परत-परत इतका निधी का दिला आणि २००८ मध्ये महापालिकेने एक ठराव इथे केला होता. तो ठराव क्र.३०६ दि.१८/३/२००८ या कालखंडातील ठराव आहे. अनुदाने तसेच अन्य सार्वजनिक संस्था/मंडळासोबत प्रपत्र-ब प्रमाणे अदा करणेची मागणी असलीतरी पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील, शहरातील ख-या अर्थाने मानवतेच्या दृष्टिकोणातून काम करणा-या सार्वजनिक संस्था,सार्वजनिक ट्रस्ट, मतिमंद, अपंग, अंध,कृष्ठरोगी,कर्णबधिर, वृद्धाश्रम,अनाथालय अशा संस्था, यांची मा.आयुक्त साहेबांनी समक्ष पाहणी करुन चांगले काम करणा-या संस्थांना प्रसंगी अटी-शर्ती शिथिल करुन, त्यांची मागणी लक्षात घेता प्रत्यक्ष पाहणी करुन त्यांची संख्या व इतर बाबी लक्षात घेता ऑडीटच्या अटी-शर्ती शिथिल करुन अनुदान मंजूर करायचा अधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येत आहे, असा ठराव सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता २००८ साली असा ठराव केला होता. त्यानंतर या संस्थेला प्रत्येक वर्षी जवळपास २०१६ पर्यंत रु.२४,९७,०००/- एवढा निधी का देण्यात आला. हा निधी देत असताना तेवढ्या एकाच नाहीतर अन्य सर्व ठिकाणी ठरावाप्रमाणे त्या संस्थांचे सक्षम अधिकारी व त्या-त्या वेळचे आयुक्त यांनी परवानगी दिली होती का, पाहिले

होते का, अशा प्रकारची माहिती मला अपेक्षित आहे. अशाप्रकारे याठिकाणी जनतेच्या पैशांची लूट महापालिकेच्या माध्यमातून, अनुदानांच्या माध्यमातून करोडो रुपयांची लूट मागील काळात करण्यात आली आहे. अशाप्रकारे ही परंपरा बंद केली पाहिजे. याठिकाणी आपल्यासमोर अनेक अडचणी आहेत. आपण अनेक मोठमोठे प्रकल्प इथे करतो आहोत. त्यासाठी अनेक प्रकारचा निधी आपल्याला उपलब्ध करुन देता येईल.त्याचबरोबर मी बीपीएमसी ॲक्टची पण माहिती मागीतली होती.

माझा दुसरा प्रश्न असा होता की, महापालिका स्थापनेपासून आर्थिक मदत दिल्यानंतर प्रत्येक वेळी महाराष्ट्र शासनाची मान्यता घेतली होती का. ज्या–ज्या चार/पाच गोष्टी असतील, कुठलीही मान्यता घेतली नाही, मा.महापौर साहेब याची नोंद करुन घ्यावी. त्याचप्रमाणे मंडळांना अनुदान दिल्यानंतर संबंधितांनी काय काय कागदपत्रे सादर करण्यासाठी ती मागितली होती का. त्यात लिहिले होते का. करारनाम्याप्रमाणे ज्या आर्थिक वर्षांत त्यांना निधी दिला होता, त्याचे पुढील वर्षी वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत त्यांनी ऑडीट रिपोर्ट सादर करावा. ही अट बंधनकारक असताना सुद्धा आत्तापर्यंत रु.९ कोटींचा एकही ऑडीट रिपोर्ट इथे सादर झालेला नाही. असे दिलेल्या माहितीवरुन निदर्शनास येते आहे. ज्या अटी-शर्ती असतील, त्यानुसार संबंधितांनी कागदपत्रे सादर केली आहेत का अशी माहिती मागितली होती. माहिती सादर केली असेलतर कोणीकोणी माहिती सादर केली. अशीही माहिती घेतली होती. पण कोणीही माहिती सादर केली नाही, अशी माहिती सभागृहाला दिलेली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थापनेपासून जे-जे ट्रस्ट, मंडळे, व्यक्ती यांना अनुदाने दिली आहेत ती कोणत्या महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार दिली गेली आहेत. मान्यता घेणे बंधनकारक आहे का, अशीही माहिती मी मागितली होती. शासनाचा आदेश आहे की, तीन लाखांवरील रकमेस शासन मान्यता घेणे बंधनकारक असतानासुद्धा आजतागायत करोडो रुपये रकमेला, र.रु.१,८५,००,०००/- रकमेला शासन मान्यता मिळालेली नाही. शासन मान्यतेसाठी पाठवले होते का. आजपर्यंत शासन मान्यता का आली नाही याचे उत्तर मला इथे अपेक्षित आहे. त्याचबरोबर या संस्थेला रु.२४,९७,०००/- रुपये व अन्य सर्व ट्रस्टी यांना कोट्यावधी रुपये दिले आहेत. मा.महापौर साहेब, मला याठिकाणी बोलायचे आहे की, अशाप्रकारे सभागृहातील सदस्य, आजी-माजी नगरसेवकांना आर्थिक स्वरुपाची मदत/लाभ याठिकाणी घेता येतो का. असा लाभ घेता येत नसेलतर कोणत्या नियमाखाली त्यांचे सदस्यपद बाद होऊ शकते. मला अशा पद्धतीचा खुलासा इथे हवा आहे. लोकांच्या कररुपी बुडवलेल्या रुपयांची, करोडो रुपयांची उधळपट्टी इथे झाली आहे. माझी यास हरकत आहे.

मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, याठिकाणी कुठल्याही प्रकारचे ऑडीट सादर झालेले नसताना प्रशासनाने आत्तापर्यंत त्यांच्यावर काय कारवाई केली. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण या अनुदानाच्या प्रोजेक्टवर इथे चौकशी समिती स्थापन करावी.

आपण चौकशीचे आदेश द्यावेत अशी मी मा.महापौर साहेब व मा.आयुक्त साहेबांना विनंती करतो. त्या माध्यमातून जे दोषी आहेत, ज्यांनी पैसे घेऊन पैशांची लूटमार चालवली आहे, याची काळजी, दक्षता आपण घेऊ का. अशाप्रकारचे उत्तर मला अपेक्षित आहे. या विषयात शासन मान्यता न आलेल्या करोडो रुपयांचा निधी असताना आपण गप्प का बसलो आहोत, असे मला याठिकाणी अपेक्षित आहे. माझा शेवटचा प्रश्न होता की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थापनेपासून आजतागायत आयुक्त साहेबांनी विविध विभागांच्या अधिका-यांना कोणकोणत्या पदांना कोणकोणते अधिकार प्रदान केले आहेत, याची मी विचारणा केली होती. आयुक्तांनी अधिकार प्रदान केलेल्या सर्व आदेशपत्रांच्या छायांकित प्रती मला देण्यात याव्यात, अशी माझी मागणी होती. सर्व आदेशपत्रांचा जावक क्रमांक, दिनांक, संबंधित विभागाला कोणत्या प्रकारचे अधिकार दिले आहेत, त्या माहितीचा चार्ट, प्रत्येक वर्षनिहाय याचा चार्ट तयार करुन सभागृहाला मिळावा अशी मी विनंती केली होती. परंतू मला कल्पना आहे की, झेरॉक्स काढायला खूप मोठ्या प्रमाणात खर्च होऊ शकतो. म्हणून मी जावक क्रमांकासकट माहिती मागितली होती. परंतू प्रशासनाने इथे माहिती देत असताना माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की, पुढील काळात कोणीही प्रश्न विचारला तरी संबंधित अधिका-यांनी विचारणा करावी की आपल्याला काय अभिप्रेत आहे. शेवटी पैसा हा आपला आहे. असे प्रकार आपण कमी करु शकतो. तत्कालिन आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी यांनी इथे काम केले होते. मी मागील कालखंड पाहत असताना अनेक अधिकारांचा वापर चुकीच्या ठिकाणी केला गेला होता. यात अनेक प्रकारची अनियमितता दिसून येते म्हणून मी मागणी केली होती. परंतू प्रशासन विभाग व लेखा विभाग यांनी दोघांनी माहिती देताना हात झटकलेले आहेत. कारण डॉ.श्रीकर परदेशी साहेबांनी २०१३ साली एक आदेश पारित केला होता की, आजपासूनचे जुने सर्व दिलेले अधिकार निरस्त करण्यात येत आहेत. अशा प्रकारचा आदेश काढला होता. त्याचाच आधार घेऊन मागील कुठलेही आवक-जावक क्रमांक दिले नाहीत. परंतू मला आवक-जावक क्रमांकासह जूने आदेशपत्र देणे इथे अपेक्षित होते. तसे त्यांनी काही दिलेले नाही. इथे अर्धवट माहिती दिली आहे. खूप मोठ्या प्रमाणात माहिती मागीतली होती. अधिका-यांना पाच/सहा दिवस या विषयावर माहिती गोळा करणे, माहिती टाईप करणे यासाठी वेळ व कालावधी लागला आहे. मी याठिकाणी मा.महापौर साहेबांना विनंती करतो की, या झेरॉक्ससाठी दहा हजारांपेक्षा जास्त खर्च झाला असावा म्हणून पुढील महिन्याचे माझे मानधन हे या खर्चासाठी सुपूर्द करायची इच्छा मी व्यक्त करतो. शेवटी पैसा जनतेचा आहे. म्हणून मी स्वतः निर्णय घेतला की, मी अर्धातरी खर्च देऊ शकलो तर उपयोग होऊ शकेल. म्हणून अधिकार प्रदानात आयुक्त साहेब अनेक प्रकारच्या अनियमितता इथे आहेत. डॉ.श्रीकर परदेशी साहेबांनी सर्व अधिकार निरस्त करुन पुन्हा एकदा सर्व अधिकार प्रदान केले आहेत. दिलेल्या सर्व अधिकारांचे पुन्हा एकदा अवलोकन करुन सर्व अधिकार निरस्त करुन ज्यांना-ज्यांना हवेत त्यांना तसे द्यावेत अशी मी विनंतीवजा सूचना करु

इच्छितो. आणखी दोन मिनिटे घेतो. अधिकार प्रदानाबाबतीत आर्थिक अधिकार इथे दिले आहेत. एक अधिकारपत्र वाचले की, जर मनपाचे वाहन हद्दीबाहेर न्यावे लागत असेलतर, प्रत्येक विभागप्रमुखांना ते अधिकार दिले आहेत. मा.आयुक्त साहेब, प्रत्येक विभागप्रमुखांना हे अधिकार न देता आपण मा.अतिरिक्त आयुक्त यांना जुने अधिकार निरस्त करुन हे अधिकार द्यावेत अशी मी विनंती करतो. अशा पद्धतीने संपूर्ण सात कोटींचे गौडबंगाल झाल्यासारखे अनावश्यक निधी राजकीय पाठिंब्याने प्रेरीत होऊन इथे वाटण्यात आला आहे. यासाठी चौकशी समिती लावून अधिकारी, संस्था यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. मा.महापौर साहेब, आपण मला बोलायला संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो, धन्यवाद!

**मा.उत्तम कैंदळे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, सर्व अधिकारी, पत्रकार बंधू,आत्ताच आमचे सहकारी नगरसेवक मा.विलासभाऊ मडीगेरी यांनी जो प्रश्न/विषय मांडला आहे. याबाबतीत मी पूर्ण सहमत आहे. मला एकच प्रश्न विचारायचा आहे की, मुंबई प्रांतिक अधिनियम कलम १० या कलमानुसार नगरसेवक पद रद्द होऊ शकते का. याबाबतीत आपण खुलासा करावा. नगरसचिव व कायदा विभाग यांनी खुलासा करावा अशी मी विनती करतो.

**मा.महापौर-**मा.आयुक्त साहेबांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त-**मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सभागृह,आत्ता सविस्तर प्रश्नाबाबत नगरसेवक महोदयांनी मत मांडलेले आहे. त्यात सन्मा.नगरसेवक महोदयांनी तीन/चार प्रश्न मांडले आहेत. अनुदान वाटप प्रक्रियेबाबतीत स्पष्ट निर्देश आहेत. त्याच्या अनुषंगाने महापालिका स्थापनेपासूनचा सविस्तर माहिती आत्ता आपण सभागृहासमोर सादर केली आहे. ही सादर करत असताना ऑडीट रिपोर्ट प्रत्येक नियमाच्या अनुषंगाने मागविणे अपेक्षित आहे. तसेच वेळोवेळी शासन निर्देश दिल्याप्रमाणे वाटप प्रक्रियेमध्ये काही शासन निर्देशांचे पालन करणे आवश्यक आहे. या सर्व प्रक्रियेच्या बाबतीत प्रत्येक जे अनुदान दिले आहे, त्याच्या अनुषंगाने कुठली-कुठली कागदपत्रे उपलब्ध आहेत, याची सविस्तर माहिती घेण्यात येईल व तशाप्रकारचा आदेश आयुक्त कार्यालयाकडून संबंधित अधिका-यांना देण्यात येईल. २००८ च्या ठरावाचा इथे उल्लेख केला आहे,त्याच्या अनुषंगाने काय पूर्तता केली, याची सविस्तर माहिती घेण्यात येईल. आणि सविस्तर माहिती गोळा करुन त्याप्रमाणे भविष्यात उचित कारवाई करण्यात येईल. संस्थेचे अध्यक्ष/सदस्य हे नगरसेवक असतील तर त्याच्या अर्हता/अनर्हता काही आहेत का, यासंदर्भात मा.महापौर महोदयांना विनंती आहे की, याबाबत कायदा तज्ञ किंवा सल्लागार यांच्याकडून मत घेतल्यास किंवा मा.नगरसचिव यांचे मत घेतल्यास उचित होईल. तसा त्यांचा अभिप्राय घेण्यास अनुमती असावी.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब,सन्मा.सभागृह, आत्ताच नगरसदस्य मा.विलास मडिगेरी यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्या प्रश्नांची व्याप्ती फार मोठी आहे. आणि एखाद्या नगरसदस्याचे पद रद्द होते का या संदर्भातील निर्णय इतक्या तडकाफडकी घेणे शक्य होणार

नाही. कायद्याच्या सगळ्या बाजू तपासून या संदर्भातील अहवाल आपण पुढील वेळी मा.महापालिका सभेसमोर ठेवावा, असा आदेश महापौर साहेबांनी आयुक्त साहेबांना द्यावा एवढीच विनंती करते.

**मा.केशव घोळवे-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.नगरसचिव, मा.नगरसदस्य, मा.नगर सदस्या,मा.अधिकारी,मा.पत्रकार,आत्ताच सन्मा.नगरसेवक विलास मडिगेरी यांनी जी माहिती मागवली, त्या माहितीच्या आधारे आपण जर पाहिलेतर या सभागृहाच्या माध्यमातून या शहरातील सामान्यातील सामान्य नागरीकांच्या कराची कोट्यावधी रुपयांची लयलूट झाली आहे. ख-या अर्थाने खिरापत वाटल्यासारखे चित्र इथे आपल्या सर्वांना दिसून आले आहे. प्रत्येक वर्षी त्याच-त्याच संस्था, कुठलीही पावती, इथे ऍफेडेव्हिट असते. त्यातील एकाही तरतूदीचे पालन न करता इथे पैसा लाटलेला आहे. ख-या अर्थाने ही जनतेची लूट आहे. म्हणून या अनुषंगाने बीपीएमसी ऍक्टमधील कलम १० - पालिका सदस्य होण्यास अनर्हता, त्यातील क – आयुक्ताचे पद किंवा महानगरपालिकेच्या अधिकाराखालील कोणताही अन्य लाभ, पद, किंवा जागा धारण करत असेलतर त्यात फ - पोटकलम (२) तरतूदीच्या अधिन हिचा महानगरपालिकेबरोबर महानगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही करारात किंवा महानगरपालिकेच्या नोकरीत तिचा स्वतःचा किंवा तिच्याच भागीदारांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणाताही भाग किंवा हितसंबंध असेल, त्यातील ह – विश्वस्त या नात्याव्यतिरिक्त अन्य नात्याने महानगरपालिकेस देय असलेली कोणत्याही प्रकारची थकबाकी देण्याविषयी आयुक्तांनी याबाबतीत खास नोटीस बजावल्यानंतर तीन महिन्यांच्या आत ती भरण्यास कसूर करत असेल, असे गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन इथे दिसून येते आहे. मा.महापौर साहेब, मी इथे मागणी करतो की, जी-जी मंडळी या लूटीत सहभागी आहेत, त्यांच्यावर कडक कारवाई करावी. कायद्याप्रमाणे ही कारवाई लवकरात लवकर कशी करता येईल या अनुषंगाने आपण भूमिका बजवावी. कारण या शहराच्या विकासासाठी सामान्यातील सामान्य गोरगरीब जनता कर देत असते. कराचा विनियोग ख-या अर्थाने विधायक कार्यासाठी, या शहराच्या विकासासाठी करण्यात यावा, हीच आमची मूळ भूमिका आहे. जे-जे दोषी आहेत, त्यांच्यावर त्वरित कडक कारवाई करावी.

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,माझे सर्व सहकारी,पत्रकार,आत्ता ज्यांनी प्रश्न विचारले आणि त्यांनी महापालिका स्थापनेपासून आत्तापर्यंत जी अनुदाने दिली आहेत, त्याचे भाष्य सभागृहात केले. दूर्दैव या गोष्टीचे वाटते की, या सभागृहात स्वतः अर्धवट माहिती घेऊन, दुस-याचे नाव घेऊन बोलणे. म्हणजे यातून एखाद्या व्यक्तीचा किंवा त्या संस्थेचा अवमान सुद्धा होऊ शकतो. जे चांगले काम करतात, त्यांना कर कशात नसतो, आणि डरही कशात नसतो हे लक्षात घ्या. जेव्हा महापालिका स्थापन झाली, १९९२ ला महिला आरक्षण आले तेव्हापासून मी गेले २५ वर्षांपासून या सभागृहात काम करतेय. आजपर्यंत कधीही मला अर्धवट अभ्यास करुन बोलायला आवडत नाही. आणि म्हणूनच प्रश्न विचारणं, त्यांनी शंका

उपस्थित करणं, त्यांना तसे वाटणे हे सगळे साहजिक आहे. परंतू त्या-त्या वेळी ज्या-ज्या कमिट्या होत्या, त्यांनी तो निर्णय घेतला. पूर्वीचे पिंपरी चिंचवड शहर होतं, त्या त्या वेळी त्या त्या लोकांना वाटले की, पहिल्यांदा मंडळांना अनुदान द्यावे. गणपती मंडळांना अनुदान द्यावे असे त्यांना वाटले. म्हणून त्यांनी मंडळांना अनुदान देण्यासाठी प्रस्ताव तयार केला. इथे सुद्धा बरेचसे सदस्य असे असतील, जे गणपती मंडळांचे अध्यक्ष असतील, कोणी पदाधिकारी असतील. गणेश मंडळात काम करणारा माणूसच हा जास्तीत जास्त सामाजिक काम करत असतो. नगरसेवक असतो. आणि अशा माध्यमातून त्यावेळी जेव्हा महापालिका स्थापन झाली, त्यानंतर ज्या गोष्टी घडल्या. त्यात मंडळांना अनुदान देण्यात आले. मंडळांचा अनुदानाचा ऑडीटचा खर्च रु.५,०००/-, रु.१०,०००/- व्हायचा आणि मंडळांना अनुदान फक्त रु.२,०००/-, रु.५,०००/- इतके दिले जायचे. त्यामुळे शेवटी सगळी मंडळे नाराज झाली. जेवढा ऑडीटचा खर्च करतो, तेवढे देखील अनुदान पिंपरी चिंचवड महापालिका देत नसेलतर आम्हाला हे अनुदानच नको, अशा पद्धतीची मंडळांची भूमिका आणि मंडळांचा रोष व्हायला लागला. म्हणून अंध, अपंग, मतिमंद, उपेक्षित घटकांतील संस्था आहेत. त्यांना आपण अनुदान दिले गेले पाहिजे. असा मा.महापालिका सभेचा ठराव आहे. त्यावेळी त्यांना वाटले की अटी शर्ती कमी करुन त्यांना द्यावे. त्यावेळचे नगरसेवक असतील, महापौर असतील, त्यांनी केलेला हा प्रश्न आहे. आत्ता कायद्यात आले की, जो संस्थेवर, पदावर, ठेकेदार म्हणून काम करतो वगैरे. सगळे हुशार आहेत. कोणी अडाणी नाहीत. त्यांनी त्यावेळी अध्यक्षपदाचे राजीनामे देऊन टाकले. शेवटी ते चांगलं काम करायचे बंद करत नाहीत. ज्या सदस्यांनी आत्ता साई संस्कार संस्थेचे नाव घेतले, त्यांना आख्ख्या सभागृहाला माझे म्हणणे आहे की, तुम्ही या संस्थेत येऊन बघा. आणि एकाची तरी तशी दुसरी संस्था असेलतर ही मंगला कदम नगरसेवक पदाचा सुद्धा राजीनामा द्यायला तयार आहे. १६० मतीमंद मुले माझ्या संस्थेत राहतात. सकाळपासून येतात, संध्याकाळी सहा वाजता घरी जातात. पिंपरी चिंचवडमध्ये कामायनी नावाची एक जुनी संस्था आहे. ते फक्त १०० मुले सांभाळतात. आम्ही १६० विद्यार्थ्यांना सांभाळतो. ज्यांना पाहायचे असेल त्यांनी संस्थेत येऊन बघा. ऑडीट नाही अशातला भागच नाही. अधिका-यांनी ज्या-ज्या वेळी सांगितले, कायद्यात बदल केला. तुमचा एक अधिकारी आमच्या संस्थेवर येऊ द्या, मिटींगला येऊ द्या. तुमच्या लोकांनी मिटींगला येऊन बघा. ते आले, त्यांनी बघितले, त्यांनी केले. ऑडीटच्या एक तृतीयांश अनुदान दिले जाते. कडूसकर साहेब मागे बसलेले आहेत. ऑडीट नसेलतर अनुदान मंजूर पण होत नाही. ज्या संस्थांचा ऑडीट रिपोर्ट देत नाही,त्यांना अनुदान दिले जात नाही. इंग्रजी माध्यमाची शाळा काढणे, मराठी शाळा काढणे, कॉलेज काढणे या सगळ्या गोष्टी खूप सोप्प्या आहेत. पण पिंपरी चिंचवडमधील उपेक्षित घटकांसाठी किती संस्था काम करतात याचा अभ्यास केला गेला पाहिजे. नुसते संस्थेचे नाव आणि त्यात कोण काम करतं म्हणून त्यांची नावे घ्यायची, हे बोलणे फार सोप्पे आहे. लोकांच्या काचेच्या घरावर दगड

मारणे फार सोप्पे आहे. त्यामागे जी माणसे काम करतात, ती कशा पद्धतीने काम करतात, हे बघितले गेले पाहिजे. उलट या वर्षाचे अनुदान भाजपच्या सत्ताधा-यांना आज द्यावेसे वाटले नाही. स्थायी समितीच्या सभापतींनी आत्ताच सांगितले की, आम्ही उपेक्षित घटकांसाठी, मतिमंदांसाठी खूप चांगल्या पद्धतीने काम करणार आहोत. म्हणून मी त्यांना आमंत्रण पण देणार होते. मी माझ्या संस्थेत तसा निरोप पण दिला होता. माझ्या संस्थेबद्दल मी स्वाभिमानाने सांगेन की, कामायनी संस्थेतून रिटायर्ड झालेल्या श्रीमती सुप्रभा सावंत या संपूर्ण संस्था सांभाळतात. मी तर या संस्थेत फार कमी जाते. पण कोणाला शंका वाटत असेल, ज्यांना कोणाला त्या संस्थेत जाऊन पोस्टमार्टेम करायचे असेल,तरीसुद्धा मी सभागृहाला नम्रपणे निमंत्रण देते, तुम्ही या संस्थेत या. नमस्कारपूर्वक सांगते, तुमच्या घरी कोणी मतिमंद नसावे कारण ज्यांच्या घरी मतिमंद असतात, त्यांना त्या संस्थेमध्ये काय काम चालते याची जाण असते. आणि राजकारण तर सगळेच करत असतात. सत्ता येत असते, सत्ता ही जात असते. परंतू समाजात चांगले काम करण्याच्या दृष्टिकोणातून समाजात कसे काम केले गेले पाहीजे आणि समाजासाठी कसे काम केले गेले पाहीजे. यासाठी म्हणून मी तिथेसुद्धा चांगल्या पद्धतीने शाळा काढू शकले असते, नर्सरी काढू शकले असते. परंतू समाजातील उपेक्षित घटकांसाठी काम करणे, त्यांना निधी मिळणे. पिंपरी चिंचवड शहरात मोरे वस्ती येथे कल्याणी नावाची संस्था होती. त्या संस्थेला फंडस् उपलब्ध नाहीत़ गव्हर्नमेंट नीट मान्यता देत नाही, पगार मिळत नाही म्हणून अक्षरशः तिथे ६० विद्यार्थी होते, तरी त्या संस्थाचालकांना ती संस्था बंद करावी लागली. आणि उलट आम्हाला आज असे वाटत होते की, स्थायी समिती चेअरमन म्हणाल्या की, समाजातील उपेक्षित घटकांसाठी, अपंगांसाठी खूप चांगल्या पद्धतीने काम करणार आहोत. म्हणून आम्हाला आज असे वाटले की, मतिमंद, अपंग, उपेक्षित घटकांना आता खूप चांगले दिवस येतील. संस्था कोण चालवतो त्यापेक्षा संस्थेत काय काम चालते हे जाऊन बघितले पाहिजे.

ज्या बोगस संस्था असतात, त्यांना जास्तीत-जास्त पैसे मिळतात हे लक्षात ठेवा. १९९७ ची संस्था आहे. गव्हर्नमेंटची मान्यता आहे पण पैसा/पगार असे काहीही संस्थांमध्ये चांगले नाही. आज माझी संस्था रजिस्टर्ड संस्था आहे. तुम्ही पुणे जिल्ह्यात जाऊन बघा. तिथेसुद्धा माझी एकच संस्था काम करते. त्या संस्थांना असणा-या सुविधा, बाकी कुठलेही काहीही प्रेशरने घेत नाही. ससूनमध्ये आमचे पूर्ण रेकॉर्ड आहे. तिथली मुले आमच्याकडे येतात. औंधमधून आमच्याकडे मुले येतात. ज्यांना कोणी नाही, अशी मुले सुद्धा आमच्याकडे येतात. यानिमित्ताने आख्ख्या सभागृहाला,पिंपरी चिंचवड शहराला कळेल की, चांगले काम करणारी माणसे सुदधा या सभागृहात आहेत. म्हणून माझे सभागृहाला आमंत्रण आहे. तुम्ही काहीही करा. काढून घ्या. आम्ही कुणासाठी, कशासाठी बसलेलो नाहीत. ज्याअर्थी आम्ही संस्था काढलेली आहे, त्याअर्थी आमची संस्था पोसण्याची पण तयारी आहे. मतिमंद मुलांसाठी काम करण्यासाठी, ही तर

परमेश्वराची मुले आहेत. त्यांच्यासाठी तर मी नक्कीच समर्थ आहे. मी एवढेच सभागृहात सांगते की, जे जे होईल, त्याला कशाला मी घाबरत नाही. सभागृहाने चांगल्या पद्धतीने माहिती घ्यावी. ज्याची हिंमत आहे, त्याने एक दिवस संस्थेत येऊन काम करावे अशी मी विनंती करते. नक्की या. येऊन काम करावं, अशी सभागृहाला विनंती आहे.

**मा.एकनाथ पवार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,खरेतर मा.विलास मडिगेरी यांनी एखाद्या व्यक्तीसाठी किंवा एखाद्या मंडळासाठी प्रश्न विचारला नव्हता. ताईंना वाटले. मंडळांची नावे त्यात असल्यामुळे नावे घेतली असतील. चांगल्या कामाची स्तूती ही चांगलीच होते. म्हणून मा.महापौर साहेब, मी यासंदर्भात वाद किंवा चर्चा न करता यासंदर्भातील नीट अहवाल, कुठल्या मंडळाला किती दिले, जास्त दिले, हे प्रशासनाने पुढील महासभेमध्ये मांडावे, असे आदेश द्यावेत. आणि पुढील विषय घ्यावा, धन्यवाद.

**मा.महापौर** – मा.आयुक्त यांना तसे आदेश देण्यात येत आहेत. प्रश्नोत्तरांचा तास संपला.

----------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ३७ | विषय क्रमांक – २

दिनांक – २०/६/२०१७ | विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/२५१६/२०१६ दि.२२/१२/२०१६

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१९७१७ दि.२७.१२.२०१६

३) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२००३८ दि.०३.०१.२०१७

४) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक १० दि.२०/४/२०१७

५) मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ३४ दि.१९/०५/२०१७

शिक्षण मंडळ विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सन २०१७-२०१८ चे वार्षिक अंदाजपत्रक मंजूरीकामी सादर केलेले आहे. शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रकास मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९ चे कलम १५४ (२) अन्वये दिनांक १ जानेवारी पूर्वी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. सन २०१६-२०१७ च्या ४ महिन्यातील प्रत्यक्ष जमा व खर्चाच्या व ८ महिन्याच्या जमा व खर्चाच्या अंदाजे रक्कमा नमूद केलेल्या आहेत. शिक्षण मंडळ सभेने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर प्रशासन अधिकारी शिक्षण मंडळ यांचेशी चर्चा करुन सन २०१६-२०१७ चे सुधारीत अंदाजपत्रक र.रु. १२४,२२,५४,०००/- चे व सन २०१७-२०१८ चे मूळ अंदाजपत्रक र.रु.१२५,६९,०४,०००/- मान्यतेकामी सादर केलेले असलेतरी शिक्षण मंडळाने सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यानुसार मा.शिक्षण मंडळाने सुचविल्याप्रमाणे सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक

रु.१४८,६०,२४,०००/- व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक रु.१५१,०५,२४,०००/- ची मा.महापालिका सभेच्या उमेद मान्यतेवर अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.माधुरी कुलकर्णी -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, शिक्षण मंडळाच्या अंदाजपत्रकाचा विषय कार्यपत्रिकेवर आला आहे. शिक्षण मंडळ अस्तित्वात राहीलेले नाही. आता शाळा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे या बजेटवर अधिक चर्चा करण्यापेक्षा मला वाटते की, शिक्षण अधिका-यांचे अधिकार मा.आयुक्तांना देण्यात यावेत. मा.आयुक्त साहेब, याठिकाणी जे काही चूकत असेल, बजेट करत असताना कदाचित त्या वेळच्या सहकार्यांकडून बजेट व्यवस्थित झाले नसेल, किंवा त्यातील ज्या उणीवा असतील, त्रुटी असतील त्या दुरुस्त कराव्यात. माझी सभागृहाला विनंती आहे की, सर्व अधिकार मा.आयुक्त यांना द्यावेत. कारण शाळा सुरु झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना गणवेष, दप्तर, रेनकोट, बूट इ. जे-जे काही द्यायचे असेल ते त्यांना वेळेत मिळाले पाहीजे. त्याअनुषंगाने सर्व नियमांचे पालन करुन आपल्याकडून युद्ध पातळीवर कार्यवाही व्हावी आणि मा.आयुक्त यांना सर्व अधिकार द्यावेत अशी मी सूचना करतो.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.माया बारणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, खरेतर मा.योगेश बहल यांनी शिक्षण मंडळाच्या बजेटचा विषय मांडला आहे. यावर आयुक्त साहेबांचे नियंत्रण राहणार आहे. आत्ता जे बजेट मांडले आहे, शिक्षण मंडळाचे र.रु.१५१ कोटींचे बजेट इथे मान्यतेसाठी सभागृहापुढे आले आहे. त्याला मान्यता मिळणार आहे यात वादच नाही. परंतू यापूर्वी शिक्षण मंडळाचा व महापालिकेचा काही संबंध नव्हता. शिक्षण मंडळ बरखास्त झाल्यामुळे शिक्षण समिती स्थापन करण्यात येणार आहे. या जून महिन्यात शिक्षण समिती स्थापन होणार आहे का? खरेतर जून किंवा जुलै महिन्यात ही शिक्षण समिती स्थापन होणार होती का, आणि नियंत्रक म्हणून आपण काम करणार आहात का, यात वाद नाही. यापूर्वी कोट्यावधी रुपये खर्च करुन सुद्धा महापालिकेच्या शाळांची परिस्थिती आज काय आहे, हे मी इथे थोडक्यात नमूद करतेय.

सन २००८-०९ साली असलेली विद्यार्थी संख्या आणि आज असलेली विद्यार्थी पटसंख्या पाहिलीतर ती वाढायला पाहीजे होती. परंतू आज ही परिस्थिती नाही. १९९५ साली ८३ शाळा होत्या आणि जवळजवळ ४४७७४ विद्यार्थी होते. परंतू आज २००९ पासून शाळांच्या इमारती वाढल्या. १३४ इमारती आहेत. त्यामध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांची पटसंख्या ४८७८४ इतकीच आहे. शाळांमध्ये पटसंख्या गळती चालू आहे. ती कशामुळे चालू आहे याची कारणे शोधणे खूप गरजेचे आहे. नुसत्या इमारती वाढवून उपयोग नाही. तिथे येणारा विद्यार्थी मोठ्या संख्येने आला पाहिजे. शहरात अनेक खाजगी शिक्षण संस्था आहेत. त्या वेळेवर टॅक्स भरत नाहीत. या संस्थांनी कितीही टॅक्स असलातरी तो भरला पाहिजे. महापालिकेच्या शाळांवर खर्च झाला

पाहिजे. जेणेकरुन खाजगी शाळांतील विद्यार्थी व महापालिकेच्या शाळांतील विद्यार्थी तितके सक्षम होण्यासाठी खरेतर हे गरजेचे आहे. आज महापालिकेच्या शाळांतील शिक्षकांचा दर्जा पाहिलातर तो आपल्याला कमी जाणवतो. त्याला कारण देखील तसेच आहे. शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त भार टाकला जातो. तो कमी करण्यात यावा. जेव्हा निवडणूका येतात, तेव्हा शिक्षकांना सर्वेचे काम दिले जाते. हे काम करत असताना त्यात त्यांचा बराचसा कालावधी जातो. तो विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आवश्यक असतो. सर्वे करण्यात वेळ गेल्यामुळे महापालिकेच्या शाळांतील शिक्षणाचा दर्जा कुठेतरी खालावला असल्याचे जाणवते आहे. ही वस्तुस्थिती आहे. ते खरेतर नगरसेवकांकडे जाऊन बसतात व मतदार यादी घेऊन टिक मार्क करत असतात. घरोघरी जाऊन पारदर्शीपणे जो सर्वे व्हायला पाहिजे, तसा तो केला जात नाही. माझी आयुक्त साहेबांना विनंती राहील की, या कामासाठी एखादी संस्था नेमावी किंवा संबंधित सार्वजनिक संस्था, गणेशमंडळे यांना हे काम दिल्यास हा सर्वे उत्तम प्रकारे होईल आणि शिक्षकांवरील अतिरिक्त कामाचा भार कमी करता येईल. आपण महापालिकेच्या शाळांच्या इमारतीमध्ये जाऊन पाहिलेतर अतिशय वाईट अवस्था आहे. वर्षानुवर्षे पेंटींग झालेले नाही. टॉयलेटमध्ये लिकेजेस आहेत. नळांचे कोंडाळे गायब आहेत. महापालिकेच्या शाळेत विचित्र वातावरण पाहायला मिळते. मुळात आपण कोट्यावधी रुपये खर्च करतो. नवीन इमारतीच्या किरकोळ दुरुस्तीसाठी आपण एवढी घासाघीस का करतो. हाच प्रश्न आजपर्यंत अनुत्तरीत आहे. आपल्या शाळेत महापालिकेच्याच अधिका-यांनी एकदा व्हिजिट करून मेंटेनन्स व पेंटींगची कामे करुन घ्यावीत. आपण या सर्व कामासाठी अधिकारी नेमावा. त्याचे दर वर्षी लेखापरिक्षण करावे. जेणेकरुन खाजगी शाळांसारखेच वातावरण महापालिकेच्या शाळांमध्ये असायला पाहिजे.

२००८ साली आय.एल.एफ.एस. या संस्थेला काम दिले होते. हे काम विद्यार्थी गुणवत्ता वाढ या शिर्षकाखाली दिले होते. त्यासाठी रु.१६ कोटी इतका खर्च केला होता आणि आज वस्तुस्थिती पाहिलीतर, मुलांचा बौद्धिक विकास व्हावा यासाठी आपण हे काम त्यांना दिले होते. ख-या अर्थाने मुलांची गुणवत्ता वाढ झाल्याचे दिसून येत नाही. यावर प्रशासनाचे शंभर टक्के नियंत्रण नव्हते. केवळ शाळांचा दर्जा चांगला असून चालत नाहीतर शिक्षकांच्या बौद्धिक क्षमतेचाही विकास झाला पाहिजे. या संस्थेचे काम तब्बल पाच वर्षानंतर पूर्ण झाले. या संस्थेने मनापासून काम केले असतेतर इथे विद्यार्थी पटसंख्या वाढायला मदत व्हायला पाहिजे होती. परंतू वस्तुस्थिती मात्र तशी दिसत नाही. खाजगी संस्थांमध्ये भरमसाठ फी असूनही विद्यार्थी पालक तिथे जात असतीलतर आपल्या शाळांमध्ये एवढ्या चांगल्या सुविधा देऊन, गुणवत्ता वाढ कार्यक्रम राबवूनही विद्यार्थी येत नसतीलतर त्याची कारणे आपण सगळ्यांनी शोधली पाहिजेत. मला एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते की, आदरणीय नेते कै.रामकृष्ण मोरे यांनी खरेतर पहिली इयत्तेपासून इंग्रजी विषय अभ्यासक्रमात ठेवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. ही अतिशय वाखाणण्याजोगी गोष्ट आहे. पिंपरी चिंचवडमधील मुले देशपातळीवर पाहायची

असतीलतर इंग्रजी व हिंदी या दोन्ही भाषांना तितकेच प्राधान्य दिले पाहिजे. आयएसएफएल या संस्थेला सायन्स अँड टेक्नॉलॉजी, तसेच लायब्ररीसाठी जवळजवळ रु.१,७६,००,०००/- दिले. त्यात प्रत्येक शाळेकरिता प्रोजेक्टर देणे, इ.८वी,९वी,१०वी.च्या वर्गातला अभ्यासक्रम सी.डी.मध्ये रुपांतरित करणे, संगणक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणे, प्रत्येक शिक्षकाला अधिकृत प्रशिक्षण देऊन त्यांची गुणवत्ता वाढवणे, या सर्व कामांवर नियंत्रण ठेवणे अशी कामे या संस्थेला दिली होती. परंतू प्रत्यक्षात यापैकी कोणतेही काम व्यवस्थित झालेले नाही. म्हणूनच या संस्थेत नक्की कोणाची वाढ झाली आणि कोणाचा विकास झाला हे तपासणे खूप गरजेचे आहे.

शिक्षण मंडळ जे खर्च करते, त्यात बजेटमधील सर्वांत जास्त रक्कम ही शिक्षकांच्या पगारावर खर्च होत असते. रु.६४,८२,००,०००/- इतका खर्च केला जातो. खरेतर एवढा मोठा पगार घेऊन ही शिक्षक मंडळी खरेच प्रामाणिकपणे काम करतात का. तिसरी/चौथीतल्या विद्यार्थ्यांची परिस्थिती पाहिलीतर अक्षरशः त्यांना वाचनही व्यवस्थित करता येत नाही. मग आपले शिक्षक एवढा पगार घेऊन काय काम करतात. त्यात प्रत्येक शाळेवर दोन संगणक दिले आहेत. एका वर्गाची पटसंख्या ४० असेलतर आणि दोन संगणक देत असतील तर ती मुले संगणक कशी शिकतील. केवळ संगणक घेऊन जमणार नाही. त्यासाठी फर्नीचर लागते. आपण फक्त खुर्च्या पुरवायचे काम करतो. त्यासाठी जे टेबल लागतात ते आपल्याला कुठून आयात करायचे होते का. शाळांची अवस्था अतिशय वाईट आहे. याठिकाणी साफसफाईचे काम पाहिलेतर ठेकेदाराच्या निविदेची मुदत संपून, कामाची मुदत संपून तीन ते चार महिने झाले आहेत. तीन/चार महिन्यांसाठी मुदतवाढ दिली आहे. आपल्याकडे एक प्रथा आहे. जर ठेकेदाराचे काम संपणार आहे, त्याच्या सहा महिने अगोदर आपण ई-टेंडरींग प्रोसेस चालू करतो. हे प्रत्येक वेळी सभागृहात आम्हाला अधिका-यांना का सांगावे लागते की,आधी टेंडरींग प्रोसेस चालू करावी. चुकीच्या व्यक्तीला वारंवार तिथे काम करायची संधी देतोय. कुठेतरी हा प्रशासनाचा हलगर्जीपणा आहे.

प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये जे सुरक्षारक्षक नेमले आहेत, त्यांच्या काही अटी आहेत, त्यांच्यासाठी काही पात्रता आहेत. निविदेत तरतूद आहे की, त्यांची उंची १६२ सेमी पेक्षा कमी नसावी. छाती फुगवून किंवा न फूगवता ४ ते ५ सें.मी., वय वर्ष १८ ते ४५च्या दरम्यान, वजन ४५ ते ६५ किलोग्रॅम अशी सुरक्षारक्षकाची पात्रता असावी. त्यांची शैक्षणिक पात्रता ८वी पास असावी. एका झापडीत आडवे होतील असे सुरक्षारक्षक भरले आहेत. ते स्वतःची काळजी तर घेऊ शकत नाहीत. मग हे विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे संरक्षण कसे करणार आहेत, हाही एक मोठा प्रश्नच आहे.

शालेय पोषण आहार – यासाठी आपण कोट्यावधी रुपये खर्च करतो. बचत गट व संस्थांच्या मार्फत आपण हा पोषण आहार देतो. पण याठिकाणी अनेक नगरसदस्य आहेत, त्यांना आपापल्या प्रभागातील शाळांमध्ये पोषण आहार कशा पद्धतीने दिला जातो, याविषयी

अनेक गोष्टी कानावर आल्या आहेत. या पोषण आहारात किडे व आळ्या सापडल्या आहेत. एवढा कोट्यावधी रुपये खर्च करुन जर विद्यार्थ्यांना चांगला आहार देता येत नसेलतर निदान ही प्रथा तरी बंद करुन टाका. काहीतरी खायला देण्यापेक्षा ते न दिलेले परवडले. आपण शाळेत पालक-शिक्षक समिती स्थापन करतो. खरेतर यामध्ये पालक, शिक्षण आणि संबंधित नगरसेवक असतात. परंतू आयुक्त साहेब, आपण या शिक्षण मंडळाचा कारभार पाहणार आहात. तर माझी आपल्याला विनंती राहील की या समितीत त्याठिकाणचे स्थानिक निवृत्त शिक्षक असतील, संगणक उत्कृष्टपणे जाणणारे अधिकारी असतील, तर अशा लोकांना जेणेकरुन शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी ज्यांचा उपयोग होईल अशा लोकांना या समितीत घ्यावे अशी मी आपणाला विनंती करते.

२०१७-१८ मध्ये जे अंदाजपत्रक केले आहे, त्यात प्रामुख्याने शालेय साहित्य खरेदी, दुरुस्ती यासाठी रु.२५,००,०००/- तरतूद केली आहे. स्वेटर खरेदीसाठी रु.२,२०,००,०००/-, विदयार्थी पादत्राणे रु.१,१५,००,०००/-,विद्यार्थी पी.टी. शूज रु.८५,००,०००/-, दप्तरे, पाट्यांकरिता रु.८०,००,०००/-,विद्यार्थी पावसाळी साधनांसाठी रु.१,५५,००,०००/-,शालेय साहित्यासाठी रु.५५,००,०००/- अशी भरीव तरतूद करुनसुद्धा आपल्या मुलांना ड्रेस,शालेय साहित्य इ. वेळेवर दिले जात नाही. थंडी संपल्यानंतर स्वेटर, पावसाळा संपल्यानंतर रेनकोट मिळतो. दप्तरे आणि शूज एका क्वालिटीचे देतो. ते मार्केट रेटने खरेदी करतो. परंतू त्याची प्रत्यक्ष किंमत व दर्जा इतका भंगार असतो. आपण आपल्या मुलांसाठी पण अशी वस्तू खरेदी करत नाही. या वर्षी पण शिक्षण मंडळाच्या बजेटसाठी भरीव तरतूद केलेली आहे. आणि मला वाटते की, जर भरीव तरतूद आहेतर तर निश्चितच क्वालिटीचा माल मुलांना मिळाला पाहीजे. या शाळांमध्ये शिकणारी मूले ही सर्वसामान्य नागरीकांची, गोरगरीबांची मुले आहेत. त्यामुळे त्यांना मिळणा-या ज्या काही सुविधा आहेत, त्या त्यांना चांगल्या प्रतीच्या कशा मिळतील याकडे मा.आयुक्त साहेब, आपण लक्ष द्यावे अशी मी आपणाला विनंती करते.

जाता जाता एवढेच सांगेन की, शिक्षण मंडळ केवळ खरेदीसाठी नको तर शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी पाहिजे. समितीवर नगरसेवक व अधिका-यांचे नियंत्रण असेलतर होणा-या भ्रष्टाचाराला काहीशी खिळ बसेल अशी आशा व्यक्त करते व माझे दोन शब्द बोलून थांबते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, शिक्षण मंडळाच्या बजेटचा विषय आहे. मी काही बोलले नाहीतर मला योग्य वाटणार नाही. ख-या अर्थाने शिक्षण मंडळाचा शिक्षण समितीत बदल होतो आहे. या बदलामुळे आम्ही सगळे मोठ्या प्रश्नांत आहोत की, नेमके समितीत रुपांतर होत असताना त्याचे नियम कसे असणार आहेत. या समितीत नेमके कोणाकोणाला सभासद म्हणून घेणार आहोत. त्या समितीचे सक्षम अधिकारी कोणाकडे आहेत, आणि याची नियमावली केली असेल किंवा करणार असूतर त्याला शासनाचे काही निर्देश/आदेश आपल्याकडे आहेत का. या प्रकारची माहिती मा.महापौर साहेब

आपण संबंधित विभागाला द्यायला सांगावी अशी विनंती करते. मा.महापौर साहेब, त्यानंतर मला पुन्हा बोलायचे आहे.

**मा.महापौर** – थोडक्यात माहिती द्यावी.

**मा.डॉ.महेशकुमार डोईफोडे**- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, शिक्षण (सहा.आयुक्त,प्रशासन) मंडळ बरखास्त झाल्यामुळे आयटीआय ॲक्टनुसार महासभेला वाटले तर शिक्षण समिती निर्माण करण्याची तरतूद आहे. याचे अधिकारी/कर्तव्ये काय असतील, सदस्य किती असतील, याबाबतीत शिक्षण विभाग माहिती घेतो आहे. प्रशासन विभागामार्फत ती तपासून आपल्या सभागृहापुढे समिती निर्माण करायची किंवा कशी हे पुढील सभेपर्यंत प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. शिक्षण समिती स्थापन करायची किंवा कसे हा मा.महासभेचा अधिकार आहे.

**मा.एकनाथ पवार**- मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,खरेतर आपण याठिकाणी शिक्षण मंडळाचे बजेट सादर केले आहे. सन्मा. सगळ्या नगरसेवकांनी यास अनुमोदन दिले आहे. आत्ता मा.माया बारणे बोलत होत्या ते खरे आहे. आपल्या शाळांचा दर्जा अजून सुधारला गेला पाहिजे. जेव्हा आपण इंजिनिअरींगला ॲडमिशन घेतो. टेक्नीकलला जातो. तेव्हा सीओईपीतून ॲडमिशन घेतले जाते. आणि हे खरे आहे. मा.महापौर साहेब, मी तुम्हाला एवढीच विनंती करेन की, या शहरातील सर्वसामान्य माणसाला, झोपडपट्टीतील माणसाला चांगले शिक्षण देण्यासाठी महापालिका करोडो रुपये खर्च करते तर त्याचा उपयोग नीट झाला पाहिजे. सर्वसामान्य माणसाच्या मुलांना चांगले शिक्षण मिळायला पाहिजे. यासाठी पुढील काळात प्रयत्न करायची गरज आहे. मागील आठवड्यात ज्ञानप्रबोधिनी सारख्या नामांकित संस्थेला आपण विनंती केली की, शाळा चालवण्यासाठी ज्या ज्या प्रकारची मदत करता येईल ती करावी. आणि अशी परिस्थिती येईल की, मराठीचे शिक्षण घेण्यासाठी किंवा इंग्रजीचे शिक्षण घेण्यासाठी महापालिकेच्या शाळेत प्रवेश घेतला पाहिजे. अशी परिस्थिती आपल्याला सर्वांना निर्माण करायची आहे. यासाठी अधिक चर्चा न करता शिक्षण मंडळाच्या बजेटच्या या विषयास मंजूरी द्यावी.

**मा.सचिन चिखले**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,सन्मा.पत्रकार बंधू, आज शिक्षण मंडळाचे बजेट मंजूरीसाठी सभागृहासमोर येते आहे आमचा या बजेटला बिल्कूलसुद्धा विरोध नाही. काही दिवसांपूर्वी एक घटना घडली होती. घटना अशी होती की,अंकुशराव लांडगे सभागृहात पिंपरी चिंचवड शहराचे जेवढे शिक्षक मंडळी आहेत, ते सगळे एकत्र होते. काही मानपानावरुन त्या शिक्षकांचे एकमेकांमध्ये वाद-विवाद झाले आणि ते वाद-विवाद दुस-या दिवशी वर्तमानपत्रांत छापून आले. हे सर्व शिक्षक पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे होते. आपण दरवर्षी शिक्षक आणि कर्मचारी यांच्यावर रु.८२ कोटी रुपये खर्च करतो आणि शालेय साहित्य खरेदीपोटी २५ ते ३० कोटी रुपये खर्च दरवर्षी करत असतो.

आपण बजेट पाहिलेतर दरवर्षी हे बजेट वाढत वाढत चालले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जे कोणी विद्यार्थी ॲडमिशन घेत असतील तर ते सर्वसामान्य कुटूंबातील, गोरगरीब घरांतील विद्यार्थी असल्याचेच आज आप पाहतोय. बारणे ताईंनी खूप चांगल्या पद्धतीने आपल्यासमोर सगळ्या गोष्टी व्यवस्थितपणे मांडल्या आहेत. एकिकडे बजेट वाढत चालले आहे. दुसरीकडे शाळांतील विद्यार्थी पटसंख्या कमी कमी होत चालली आहे. यावर आपण नीट व्यवस्थितपणे माहिती घेऊन अभ्यास केला पाहिजे. येणा-या दिवसांत आपल्या महापालिकेच्या शाळा कशा पद्धतीने सुधारल्या गेल्या पाहिजेत. जर नीट व्यवस्थिपणे शहरातील खाजगी शाळांविषयी आपण अभ्यास केलातर, खाजगी शाळांतील दोन तीन शाळा सोडल्यातर खाजगी शाळांना क्रिडांगण व्यवस्थित नाही, इमारत व्यवस्थित नाही. तरीसुद्धा त्या शाळांमध्ये पिंपरी चिंचवडमधील नागरीक एक-एक/दीड-दीड लाख भरुन ॲडमिशन घेतो. आपण महापालिकेच्या शाळांवर एवढा मोठा खर्च करतोय. मग आपली पटसंख्या खाली खाली का होत चालली आहे. आपल्या महानगरपालिकेच्या इमारती व क्रिडांगणे पाहीलीतर खूप चांगल्या इमारती व प्रशस्त स्वरुपाची मैदाने आपल्याकडे आहेत. शिक्षक चांगले आपल्याकडे आहेत. तरीसुद्धा देखील आपली मुले का कमी-कमी होत आहेत, याकडे व्यवस्थितपणे पाहिले पाहिजे. दरवर्षी ज्यावेळी पावसाळा असतो, पावसाळा झाल्यानंतर मुलांना रेनकोट दिला जातो. हिवाळा येतो, तेव्हा हिवाळा संपल्यानंतर स्वेटर किंवा कपडे दिले जातात. आज शाळेच्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्र शासनाने पुस्तकांचे वाटप केले, तरी पण ती ठेवण्यासाठी मुलांकडे दप्तरे उपलब्ध नव्हती. मुलांना पावसाळा, हिवाळा झाल्यानंतर बूट,सॉक्स वाटप केले जातात. कित्येक वर्षे चालणारा हा प्रकार थांबलाच पाहीजे. प्रत्येक वर्षी खरेदीत भ्रष्टाचार केला जातो आणि त्याच-त्याच अधिकारी आणि त्याच-त्याच संस्थांना निविदा किंवा ठेके दिले जातात. मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो की,आता सर्व नगरसेवकांची नियुक्ती शिक्षण मंडळावर होणार आहे. पण मी आपल्याला हे सुद्धा सांगू इच्छितो की, ज्या नगरसेवकांना शिक्षण मंडळावर काम करायची इच्छा आहे, जास्त इंटरेस्ट आहे आणि जे लोक आपल्या वॉर्डातले काम करुन शिक्षण मंडळाकडे व्यवस्थितपणे लक्ष देतील. कारण या गोरगरीब विद्यार्थ्यांचे भवितव्य आपल्या हातात आहे. चांगल्या पद्धतीने लक्ष देऊन अत्याधुनिक पद्धतीच्या शाळा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कशा होतील, सर्वसामान्य नागरीकांना किंवा त्यांच्या मुलांना सुद्धा वाटले पाहिजे की, आमचा विद्यार्थी महापालिकेच्या शाळेत गेला पाहिजे. असे कामकाज आपण येणा-या दिवसांत करावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आणि थांबतो. धन्यवाद.

**मा.उत्तम केंदळे** -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पत्रकार बंधू, शाळा हा आशाताईंना जसा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे, तसाच मला देखील हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. मी एक लेक्चरर आहे. आमचे सहकारी नगरसेवक मा.सचिन चिखले यांनी सांगितले की, खाजगी

शाळा कशा चालतात. त्यासाठी मी आयुक्त साहेबांना एक मागणी सुद्धा केली आहे की, आपल्या महापालिकेच्या शाळा आहेत, त्यांत इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरु करा किंवा सेमी इंग्रजी सुरु करा. ई-लर्निंग सुद्धा चालू करा. पालिकेच्या शाळांतील सर्व शिक्षक सध्यातरी दिवसेंदिवस पाट्या टाकायचे काम करतात. आपण त्यांना अपग्रेड करायची गरज आहे. त्यांना नवीन-नवीन टेक्नॉलॉजीद्वारे ट्रेनिंग द्यायची गरज आहे. या शिक्षण व्यवस्थेत सुधारणा होण्यासाठी काही कमी पडणार नाही. त्याचपद्धतीने आपल्याकडे जशा भौतिक सुविधा आहेत. आपल्या ९८ इमारती आहेत. १२८ शाळा आहेत. दोन इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत. असे एकूण १३० वर्ग सुरु आहेत. आपण जशी भौतिक सुविधा देतो, बाहेरून कलर मारतो, स्वच्छता करतो. मानव संसाधने जसे सुरक्षारक्षक असो, शिक्षक असो, कर्मचारी असो यांना देखील ट्रेनिंग दिले पाहिजे. जसे शिक्षण मंडळ बरखास्त करुन समिती होणार आहे. तसे नियम अटींमध्ये बदल करुन ही शिक्षण समिती सक्षम करावी, अशी नगरसेवकांच्या वतीने माझी पूर्णपणे मागणी आहे.

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, माझे सर्व सहकारी, शिक्षण मंडळाचा विषय सर्वसाधारणपणे आपल्याकडे सभागृहात बजेटद्वारे येतो. त्यानंतर शिक्षण मंडळावर चर्चा किंवा बाकी काही होत नाही. त्यामुळे शिक्षण मंडळावर फक्त बजेटच्या वेळीच चर्चा होते. प्रत्येकाच्या मनात जे काही आहे त्या भावना आणि त्यातून करावी लागणारी दुरुस्ती हे कुठेतरी होणे गरजेचे आहे. त्या दृष्टिकोणातून ही चर्चा होते. मघाशी सांगितले, पूर्वी बजेट कमी होते. ५० कोटी होते, त्याचे ७५ कोटी, ८० कोटी झाले, १०० कोटी झाले. या वर्षी १५१ कोटींचे झाले. बजेट मंजूर करत असालतर शंभर टक्के शिक्षणावर खर्च झाले पाहिजे. यातून पिंपरी चिंचवडचा भावी नागरीक घडणार आहे. हे बजेट योग्य कारणी लागेल हे बघितले पाहीजे. मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करेन की, शिक्षण मंडळ बरखास्त झाल्यानंतर आयुक्त साहेबांनी शिक्षण मंडळाची आणि शाळांची ए टू झेड माहिती घेतली. त्यानुसार शिक्षणात कसा बदल करता येईल, या संदर्भातील मिटींग आणि माहिती घेतली होती. यासंदर्भात माझ्या माहितीत आहे. मा.आयुक्त साहेब, मी तुमचे मनापासून आभार मानेन. परंतू मा.आयुक्त साहेब, आपण या गोष्टीचा सुद्धा विचार केला पाहिजे की, पिंपरी चिंचवडमध्ये खाजगी शाळा किती आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेचा त्यात काहीतरी अधिकार आहे का नाही. कारण आपल्या शाळा फक्त मराठी मिडीयम किंवा सेमी इंग्रजी अशा आहेत. ज्या कंपन्यांमध्ये, सीएसआरमध्ये शाळा चालतात, त्या फक्त इंग्लिश मिडीयमच्या शाळा चालवतात. मग आपल्यालाही काही दृष्टिकोणातून अ,ब,क,ड,इ आणि फ, आणखी दोन प्रभाग या एरियानुसार इंग्लिश मिडीयमच्या शाळा सुरु करता येतील का, याचा प्रयोग केला गेला पाहीजे. कारण आजची परिस्थिती अशी आहे की, प्रत्येक गरीब कुटूंबातील मनुष्य असेल, धुणी-भांडी करणारी आई असलीतरी त्या कुटूंबाला, त्या स्त्रिला वाटत असते की, माझा मुलगा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गेला पाहीजे. एक/दोन घरचे जास्त काम करेन पण माझा मुलगा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत गेला पाहीजे.

शिक्षणाबाबतीत त्या पिंपरी चिंचवडमध्ये मुलांना किंवा त्यांच्या घरच्यांना खूप वाटते अशातला भाग नाही. परंतू बहुतांशी लोक शिक्षणावर खर्च करायला सुध्दा तयार आहेत. आपल्याकडे सगळी यंत्रणा आहे. मा.माया बारणे यांनी मघाशी सांगितले, त्यात सत्यता आहे. मे महिन्यात एकदाच टेंडर का काढले जात नाही. इथून पुढे अशी प्रथा पाडावी की, एप्रिल, मे महिन्यात आगामी येणा-या वर्षाचे सगळे टेंडर काढले जावेत. मग स्वेटरसकट टेंडर काढा. थंडीच्या कुठल्या महिन्यांत स्वेटर द्यायचे आहेत, मग ते ऑक्टोबरमध्ये द्यायचे असतील तरी त्याचे टेंडर एप्रिलमध्येच निघाले पाहीजेत. मग ती नगरसेवकांची कमिटी असो किंवा कुणाचीही कमिटी असो. मी माझ्या मुलाला घ्यायचे असेलतर मी म्हणेन पुण्यातल्या रमेश डाईंगमध्ये जा. तिथे कलरची गॅरंटी, सगळ्याची गॅरंटी. ते कोणी माझे नातेवाईक नाहीत. इथे लोकांना वाटेल की, त्यांनी रमेश डाईंगचे नाव घेतले म्हणजे ते मंगलाताईंचे कोणीतरी नातेवाईक आहेत. तुम्ही कोणालाही ठेका द्या. परंतू आपण असे म्हणतो, जर आपल्याला चांगले दप्तर घ्यायचे असेलतर नातवंडांना किंवा मुलांना कुठले घेतले पाहिजे. चांगली क्वालिटी पाहिजे. त्यात पावसाचे पाणी आतमध्ये गेले नाही पाहिजे. आपण ही दक्षता घेत नाही. शिक्षण मंडळ व पीएमपीएमएल हे दोन्ही आपलेच आहेत. परंतू जेव्हा त्यांचा विषय सभागृहात येतो तेव्हा आपण भरपूर तोंडसुख घेतो,पण त्यावर उपाययोजना काढत नाही. शिक्षणमंडळावर उपाययोजना काढल्या पाहीजेत. सेमीइंग्लिश, इंग्लिश मिडीयमच्या शाळा सुरु केल्या पाहीजेत. आपल्यातलेच काही शिक्षक ज्याचे उच्च शिक्षण झाले आहे, अशा शिक्षकांना बरोबर घेऊन कमीत-कमी एलकेजी, नर्सरी पासून ज्या-ज्या भागात इंग्लिश मिडीयमची शाळा सुरु करता येईल, तिथे प्रत्येक प्रभागात एक याप्रमाणे इंग्लिश मिडीयमची शाळा सुरु केली पाहीजे. जेणेकरुन दहा वर्षांनंतर तो विद्यार्थी दहावीत जाईल. अशी दुरुस्ती करत गेलोतर नक्कीच चांगल्या दृष्टीकोणातून पिंपरी चिंचवडची वाटचाल खूप चांगल्या पद्धतीने होईल.

मी मागील वर्षी शिक्षण मंडळाला एक संकल्पना दिली होती. पिंपरी चिंचवडमधील नामांकित श्री.गजानन एकबोटे, पुण्यातले मॉडर्नचे जे प्रमुख आहेत त्यांनादेखील आम्ही विनंती केली होती की, मॉडर्नच्या इकडच्या बाजूच्या दहा शाळा तुम्ही सुपरविजनसाठी द्या की, जेणेकरुन त्यांच्याकडे एप्रिल, मे मध्ये शिक्षकांसाठी विविध कोर्सेस होतात,त्यांचे लेक्चर्स होतात. दरवर्षी पोर्शन बदली होतो. त्यांच्या अभ्यासक्रमात बदल झालेला असतो. दरवर्षी काहीतरी नाविण्यपूर्ण घटना घडत असतात. त्या सगळ्या त्यात आल्या गेल्या पाहीजेत. आपल्याकडे कुठेही सुट्टीत शिक्षकांसाठी अशा व्हेकेशन बॅचेस होत नाहीत. तशा व्हेकेशन बॅचेस शिक्षकांसाठी व्हायला पाहीजेत. नवीन आलेले शिक्षक, जे कोणी शिक्षक रिटायर्ड व्हायला आले आहेत, त्यांच्याकडून आपण अशी अपेक्षा केली की, तुम्हाला ते यायला पाहीजे. त्यांनी जर कधी केलचं नाहीतर त्यांना कसं येईल. त्यामुळे दरवर्षी त्या शिक्षकांसाठी किंवा मुख्याध्यापकांसाठी व्हेकेशन बॅचेस झाल्या पाहीजेत. शनिवार,रविवार बॅचेस झाल्या पाहीजेत.

आपल्या संस्थेतून काय केले गेले पाहीजे याचा अभ्यास करुन पहिले आपल्या शिक्षकांना दिले पाहीजे. हे १५१ कोटींचे बजेट आहे. अजून २०० कोटी रुपयांचे करा. काही प्रॉब्लेम नाही. परंतू शिक्षकांना जादाची कामे दिली जातात,ती पहिली बंद करा. आपले इतके कोटी खर्च होणार नाही. जेणेकरुन आजच्या शिक्षकांना वाटते, आम्ही शिक्षक आहोत. का आम्ही सर्वे करण्यासाठी आहोत का. पल्सपोलिओ जा सर्वेला,निवडणूका आल्या, जा सर्वेला. यावेळी तर जे.ई.ना पण सोडले नाही. त्यांची गुणवत्ता काय, त्यांची पात्रता काय आणि आपण त्यांना सांगतो, जा खड्डे कुठे पडले आहेत ते मोजा. त्यांच्या क्वालिफीकेशनप्रमाणे, त्यांचे जे शिक्षण आहे, ते गुरु आहेत. या दृष्टिकोणातून त्यांना काम दिलेतर त्यांना नक्कीच मनातून वाटेल की, आम्ही पिंपरी चिंचवडचा विद्यार्थी चांगला घडवला पाहिजे. त्यांना जी जादा कामे दिली जातात, ती बंद करा. मग तुम्ही त्यांना बोलू शकता. आज आपल्याकडे क्रिडाकूल आहे. येथे एक गोष्ट माझ्या कानावर आली. खरोखरच मी त्या व्यक्तिकडे बघितले. तो क्रिडाकूलमधील विद्यार्थी होता. ती व्यक्ती सुरुवातीला खूप चांगली होती. त्यांना ऍंटीकरप्शनवाल्यांनी पकडले. काहीही असू शकते. पण क्रिडाकूलमधील दर्जा बघा. तिथे चांगले लोक का येत नाहीत. आपल्याकडे अशा कितीतरी शाळा आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये चांगल्या प्रकारची क्रिडाकूले झाली पाहीजेत. आण्णासाहेब मगर स्टेडीयम पूर्णपणे डिमॉलिश करुन तिथे करा. तिथे होस्टेलच्या बिल्डींग आहेत, त्या पण चांगल्या करा. मुलांचे शिक्षण व्हायला पाहीजे. ते क्रिडाकूल व्हायला पाहिजे. तुम्ही बघितले असेल काही शाळांमध्ये क्रिडाकूल आहे. सकाळी ७.०० वा. पासून संध्याकाळी ७.०० पर्यंत मुले तिथे जातात. ९८ टक्के निकाल आहे. म्हणजे ९८ टक्के मिळवणारी मुले त्या शाळांमध्ये आहेत. वेगळी शाळा बघितल्यानंतर मुलांना चांगले मार्क पडतात. पण आपल्याकडे काय झाले आहे. शिक्षकांमध्ये सुद्धा उदासिनता असू शकते. का आपल्या विद्यार्थ्यांना वाचायला येत नाही. का आपल्या विद्यार्थ्यांना गाणे म्हणता येत नाही. सगळ्या शाळांमध्ये ई-लर्निंग दिले, प्रोजेक्टर दिले. सगळ्या शाळांना सीएसआरमधून सगळे देतो. आपण सगळे प्रोव्हाईड करायला तयार आहोत. मग आपल्या शिक्षकांमध्ये ही मानसिकता का नाही. याचा सखोल अभ्यास केला गेला पाहीजे. त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्यावर नियंत्रण घेतले गेले पाहिजे. का त्यांना वाटत नाही का आपण काम करावे. त्यांनाही वाटत असेल की, पिंपरी चिंचवडमधील विद्यार्थी चांगला शिकला पाहिजे. त्याला चांगले शिक्षण दिले गेले पाहीजे. त्यांना सगळे दिले गेले पाहीजे. जूनमध्ये जेवढी विद्यार्थी पटसंख्या असते, तेवढी मधल्या टप्प्यात कधीही नसते. विद्यार्थ्याला माहित असते, आपल्याला जूनमध्ये वह्या-पुस्तके, बूट-सॉक्स हे सगळं मिळणार आहे. आपल्याला शाळेत जायचे आहे. जिल्हापरिषद पुणे जिल्हा शिक्षणाच्या संस्थेने असा नियम केला आहे की, विद्यार्थीचा सुद्धा थम्ब झाला पाहिजे. आमच्याकडे विशेष शाळा आहेत. विशेष शाळा खूप बोगस आहेत. आपल्या शाळांमध्ये ते पण करा. विद्यार्थीचे सुद्धा थम्ब झाले पाहिजे. शिक्षकांचा तर थम्ब झालाच पाहिजे. मतिमंद मुलं थम्ब करु शकतात. मग आपली

मुले सुद्धा चांगल्या पद्धतीने थम्ब करु शकतील. आपल्याकडे डेली रेकॉर्डींग म्हणजे आपल्याकडे विद्यार्थी वह्या-पुस्तके घ्यायला येतात. किंवा बाकी वेळीपण विद्यार्थी येतात. मा.महापौर साहेब, हे सगळे या माध्यमातून आपल्याला समजेल.

मा.महापौर साहेब, अजून सुद्धा एक योजना होती. शिक्षण मंडळाच्या माध्यमातून मुलींसाठी आपण ज्या शिष्यवृत्त्या दिल्या आहेत. सात मुली लक्षाधीश झाल्या आहेत. महापालिकेच्या शाळांतील ज्या मुलामुलींना ८० टक्यांपेक्षा जास्त मार्क पडतील, त्यांना हे पैसे दिले गेले पाहीजेत. ११ वी, १२ वी, नुसते असे म्हणून चालणार नाही. त्यांची फी बघीतली तर त्या पैशाचे प्रमाण फार मोठे आहे. त्यामुळे या मुलांचा भार आपण चांगल्या पद्धतीने उचलला तरी दहावी/बारावीची चांगली मुले किंवा शिक्षणाचा चांगला दर्जा मिळेल. सगळ्या महापालिकेतल्या शाळांतील पिंपरी चिंचवडमधील ज्या मुली आहेत, किंवा जो विद्यार्थी गेले १० वर्षे आपल्या शाळेत येतो. त्यांची शॉर्टलिस्ट करुन, क्रिडाकूलातील मुली असतील अशा मुलींसाठी एक विशेष शाळा सुरु करावी. ती होस्टेल स्कूल असावी. निगडीतली आपली शाळा रिकामी आहे. तिथे ही शाळा सुरु करावी अशी आमची इच्छा होती. त्या शाळेत आख्ख्या पिंपरी चिंचवडमधील शाळांमधून मुली निवडून काढाव्यात. फक्त स्पोर्टस् व शिक्षणासाठी ती शाळा चालवावी. ५ वी ते १० वी अशी असावी. या वर्षी महिला व बालकल्याणचे बजेट वाढवले आहे. त्यात महिला बालकल्याणमधून मुलींसाठी किंवा मागासवर्गीय मुलींसाठी सुद्धा या योजनेतून आपल्याला चांगले काहीतरी करता येईल. मागासवर्गीय असे काही न ठेवता मुलांसाठी निगडीमधील आपली जी शाळा आहे, तिथे अशी मुलांसाठी शाळा सुरु करावी असा प्रस्ताव मी घेतला आहे. आपण जे मुलांचे आयटीआय सुरु केले. तेव्हा आम्हाला असे वाटत होते की, दीडशेचं मुली आयटीआयमध्ये जातील. परंतू जेव्हा या दीडशे मुली आयटीआयमध्ये शिकून बाहेर येतात, तेव्हा दीडशे कुटूंबे साक्षर होतात, सक्षम होतात. त्या मुली स्वतःच्या पायावर उभ्या राहण्यासाठी सक्षम राहतात. दरवर्षी दीडशे दीडशे म्हटले तरी समाजात हा फार मोठा आकडा होऊ शकतो.

मागे आम्ही माध्यमिक शाळांबाबत चर्चा करत होते. एक्साईड बॅटरी यांना आपल्याला टॉयलेटस् बांधून दिले गावडे साहेब व त्यांचे सहकारी खूप प्रयत्नशील आहेत. इतर लोकही आहेत. आता आम्ही त्यांना वेंडींग मशिनची मागणी पण केली आहे. एक्साईड बॅटरी यांनी काही शाळांना द्यावे. प्रायोगिक तत्वावर महापालिकेच्या प्रत्येक शाळेत वेंडींग मशिन बसवावे. किशोरवयीन मुली, १२ वर्षांनंतरच्या मुलींसाठी वेंडींग मशिन ही काळाची गरज आहे. या वयात मुलींची शाळेतील उपस्थिती कमी होते, मग या मुलींसाठी किमान त्यांना ज्या गोष्टी पाहीजेत, त्या गोष्टी त्यांना मिळाल्या पाहीजेत. टॉयलेट क्लिनिंगचा फार महत्वाचा मुद्दा आहे. सगळ्या शाळांमध्ये मुलींसाठी खूप चांगल्या पद्धतीचे टॉयलेट झाले पाहीजेत. आणि त्या माध्यमातून प्रत्येक मुलींच्या माध्यमिक शाळेतील वर्गात वेंडींग मशीन बसली गेली पाहीजे. महिला

बालकल्याणमधून घ्या, शिक्षण मंडळाच्या माध्यमातून घ्या परंतू प्रत्येक शाळेत ही उपाययोजना झालीच पाहीजे. प्रत्येक गोष्टीसाठी करा. तुम्ही खेळांसाठी करा, वाचनालयासाठी करा. जर चांगल्या पद्धतीने केले आणि त्याच्यावर जर शिक्षकांनी सुपरव्हिजन केलेतर मला वाटत नाही विषय आल्यानंतर १५१ कोटी काय, २०० कोटी घ्या. काही फरक पडत नाही. पैसे शेवटी हे नागरीकांचे आहेत. ते नागरीकांसाठी खर्च होऊ द्यात. त्याचे आऊटपुट चांगल्या पद्धतीने आले पाहीजे. शिक्षण मंडळाचे चेअरमनपद किंवा पुढे काय-काय होईल, कसे-कसे होईल, यावर कोणाचे अधिकार राहतील, हा त्यांचा मुद्दा आहे. पण एप्रिल-मे महिन्यात टेंडर निघाले पाहीजेत याची दक्षता घेतली पाहीजे. किशोरवयीन मुलींसाठी प्रत्येक शाळेत वेंडींग मशीन बसवले पाहीजे. चांगले सॅनिटरी नॅपकीन्स दिले पाहीजेत. मुलींना ते कमीत कमी किंमतीत मिळाले पाहीजेत. टॉयलेटची स्वच्छता असली पाहीजे. अशा पद्धतीने दुरुस्ती करावी. मा.आयुक्त साहेब, खुर्ची असते. खुर्चीवर बसणारा माणूस दरवेळी नवीन येतात. दरवेळी नवीन संकल्पना असतात. या नवीन संकल्पना घेऊन शिक्षण समितीवर जे जे सदस्य सभागृहातून जातील, त्यांनी खूप चांगल्या पद्धतीने विचार करुन चांगल्या पद्धतीने कामकाज केले गेले पाहीजे. मी या प्रसंगी एवढीच अपेक्षा शिक्षण मंडळाकडून ठेवते.

**मा.दत्ता साने-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पत्रकार बंधू, मा.महापौर साहेब, सर्व अधिका-यांना अधिकार प्रदान केले आहेत. गेले अनेक वर्षे सभागृहात काही सूचना झाल्या आहेत. आपल्यासमोर शिक्षण मंडळाचे बजेट आले आहे. सर्व नगरसेवकांच्या भावना तीव्र आहेत. प्रत्येकाकडून आपापल्या भागातील शाळेच्या बाबतीतील चर्चा या ठिकाणी केली जाते. मा.मायाताई बारणे असतील, मा.मंगलाताई कदम असतील यांनी शाळेबाबतीत विषय चांगल्या पद्धतीने आपल्यासमोर मांडला आहे. आपल्याला अधिकार देत असताना मी काही विषय आपल्यासमोर मांडू इच्छितो. १५१ कोटींपर्यंत बजेट आणायचे काम शाळेच्या माध्यमातून केले आहे. ज्या-ज्या वेळी शिक्षण मंडळाच्या बजेटचा विषय सभागृहात मंजूरीसाठी येतो, तेव्हा अनेक वेळा शाळेचा दर्जा हा उंचावला पाहिजे, चांगला व्हायला पाहीजे, मुलांना वस्तू देतो त्या वेळच्या वेळी दिल्या गेल्या पाहीजेत अशी चर्चा होते. सर्वांत महत्वाचे म्हणजे जेव्हा बजेट मंजूर होते आणि विषय पूर्वीच्या शिक्षण मंडळाकडे गेला की, एवढे पान भरून यायचे. त्यात काय झाले, यात भ्रष्टाचार झाला. यात वस्तू कमी झाल्या. यात जास्त झाल्या. अनेक वेळा या शहरात शिक्षण मंडळाच्या माध्यमातून हा प्रकार झाला आहे. तो चूक आहे का बरोबर आहे याची शहानिशा आजपर्यंत कधी कोणी केली असेल नसेल मला माहित नाही. पण माझी आपल्याला विनंती आहे की, आपण समितीचे हेड असणार आहात असे मला वाटतेय. आमच्या भावना त्यात असतील की यात शिक्षण मंडळ समितीचे नाव बदनाम होईल अशा समितीकडून कधी काम होऊ नये अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

आपल्या शाळेत महापालिकेच्या १२८ शाळा आहेत. मराठी माध्यमाच्या १०९, उर्दू माध्यमाच्या १४,हिंदी माध्यमाच्या ०३, इंग्रजी माध्यमाच्या ०२ शाळा असे एकूण जवळपास ३६५४२ विद्यार्थी आपल्या शाळांमध्ये शिकत आहेत. ही विद्यार्थी संख्या बघता आणि गेले पाच वर्षांपूर्वी ४२२६८ इतकी विद्यार्थी संख्या होती. कमीतकमी ५२७६ विद्यार्थी घटलेले आहेत. याचे कारण मी सांगू इच्छितो की, काही ठिकाणी शाळा चांगल्या नाहीत. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना बसायला जागा नाही. काही ठिकाणी शिक्षक नाहीत. शिक्षकांची बोंब ही सगळ्यांत वाईट आहे. ११४० शिक्षक कार्यरत आहेत. शिक्षकांची २१५ पदे रिक्त आहेत. याचा विचार होणे गरजेचे आहे. मी माझ्या प्रभागातली परिस्थिती सांगतोय. एक शिक्षक जर दोन/दोन वर्ग चालवत असेलतर त्याने पहिला वर्ग पाहायचा का दुसरा वर्ग पाहायचा. जर आपल्याला शाळेची क्वालिटी चांगली करायची असेल, खाजगी व्यावसायिक शाळांप्रमाणे आपल्याला शाळा करायची असेलतर आपल्याला त्या शिक्षकांना ताकद देणे, आपण त्यांना कामाचा एक्स्ट्रा बोजा देतोय तो त्यांच्याकडून बंद करणे, त्यांना लागणा-या सगळ्या सुविधा, वस्तू वेळच्यावेळी देणे गरजेचे आहे. मी आपले अभिनंदन करेन की, ज्यावेळी शाळा चालू झाल्या, त्यादिवशी पुस्तकांचे वाटप झाले आहे.होते. त्यांनी हा चांगला उपक्रम राबविला आहे. म्हणून मी शिक्षण मंडळाचे अभिनंदन करतो. परवा माझ्याकडे एक प्रकार घडला होता. आपल्याला पत्र दिले होते. माझ्या प्रभागातील शाळा क्र.१६ ही सर्वे क्र.८९,९०,९१,९२ अशी चार ठिकाणी विभागून ही शाळा आहे. याठिकाणी आपल्याकडे चांगले विद्यार्थी शिकतात. चिखली गावठाणातील शाळेत १६०० ते १८०० विद्यार्थी आहेत. मोरेवस्ती शाळेत ५५० ते ८०० विद्यार्थी आहेत. अतिशय चांगले शिक्षक असताना कोणाच्या डोक्यात काय युक्ती घुसली मला माहित नाही. माझ्याकडे शाळेच्या इमारतीचे बांधकाम चालू आहे. शहरात कुठेही अशी शाळा नाही अशी सुंदर प्रकारे शाळा चालू असताना माझ्या शाळेच्या जागेत एकाने पोलिस स्टेशन स्थापन केले, बोर्ड लावला, रंगरंगोटी केली. ही शाळा जिल्हा परिषदेची आहे. ही इमारत जिल्हा परिषदेची आहे. हे सर्व असताना जर याठिकाणी शाळेच्या जागेवर पोलिस स्टेशन होत असेलतर याच्यापेक्षा निंदनीय बाब कुठली नसेल. ज्यांनी ही शाळा पेंटींग केली, रिपेअरींग केले, पोलिस स्टेशनचा बोर्ड तिथे लागला गेला. मी चौकशी करायला सांगितली होती. नक्की काय झाले. कोणाच्या डोक्यात हा प्रकाश आला. कोणी करायला सांगितले होते. जर ही शाळा पोलिस स्टेशनला द्यायची असेलतर त्या विद्यार्थ्यांना कुठे ठेवणार आहात. मी तुम्हाला जाहीर आवाहन केले होते की, मी महापालिकेच्या प्रांगणात शाळा भरवेल. आपला असा कोण अधिकारी आहे, त्याच्या डोक्यात कोणी ही युक्ती सूचवली. शाळेचा विद्यार्थी सोडून पोलिस स्टेशनला जागा देतोय. हे काम करणा-यावर कडक कारवाई व्हावी अशी मी विनंती करतो.

मा.आयुक्त साहेब, माझे दूसरे म्हणणे असे आहे की, शहरात सोळा शाळा महापालिकेच्या जागेवर अनधिकृतपणे चालू आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, या

सोळा शाळा कोणाच्या आहेत. या शाळा चालू करताना महापालिकेची परवानगी घेतली होती का. माझ्याकडे पराक्रम केला तसा पराक्रम करुन यापूर्वीपासून अनधिकृत शाळा चालू आहेत तश्या आजही महापालिकेच्या आरक्षणांवर अनधिकृत शाळा चालू करायचे काम चालू आहे. मी आपल्याला पत्र देण्याची व्यवस्था करतो. माझी आपल्याला विनंती आहे की,आपल्या शाळांमध्ये मुले शिकली पाहीजेत. आपल्याकडे येणारा विद्यार्थी हा स्लम एरियातील विद्यार्थी आहे. कुठल्याही श्रीमंत घरातला विद्यार्थी आपल्या शाळेमध्ये शिक्षण घेत नाही. आपल्या शाळेतला विद्यार्थी ज्याचे आई किंवा वडील कुठेतरी मोलमजूरी केल्याशिवाय त्यांचे घर चालत नाही. असे विद्यार्थी आपल्या शाळांत शिकतात. तुम्ही १५१ कोटींचा निधी उपलब्ध करुन देत असालतर त्याच्या सुखसुविधा, त्याला लागणारा खर्च, त्याला लागणा-या शैक्षणिक वस्तू, शिक्षक सुद्धा चांगले आहेत. एक शिक्षक दोन वर्ग सांभाळून सुद्धा विद्यार्थी पटसंख्या अतिशय चांगली आहे. आम्ही किती वर्षे असे दोन दोन वर्ग चालवायचे, आम्हाला शिक्षक द्या, असे तिथले शिक्षक सांगतात. विद्यार्थ्यांच्या बुद्धीप्रमाणे त्यांची शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी क्रिडा शिक्षक सुद्धा देणे गरजेचे आहे. विचार करा, शहरात आपल्या कुठल्याही शाळेत क्रिडा शिक्षक किती आहेत, हे क्रिडा शिक्षक विद्यार्थ्यांना किती शिक्षण देतात अजिबात नाही. चांगले-चांगले क्रिडा शिक्षक असतील त्यांना मानधन द्या. मुले नुसती डोक्याने नाहीतर शरीराने पण वाढणे गरजेचे आहे. प्रत्येक नगरसेवकाच्या घरी विद्यार्थी शिफारस पत्र घेण्यासाठी येत असतात की, आम्हाला या या शाळेत ऍडमिशन पाहीजे. असे तुम्हाला का वाटत नाही की, जे काही १२८ नगरसेवक आहेत, त्यांच्याकडे आम्हाला महापालिकेच्या शाळेत ऍडमिशन द्या म्हणून शिफारस पत्र घेण्यासाठी या विद्यार्थ्यांनी यावे. महापालिकेच्या शाळांची क्वालिटी आपण का वाढवू शकत नाही. खाजगी शाळा विद्यार्थ्यांकडून पालकांकडून डोनेशन घेऊन चालविल्या जातात. आपल्या महापालिकेच्या शाळा स्वखर्चाने चालवतो तरी यामध्ये आपण कुठे कमी पडतो त्याचा सुद्धा विचार करायची गरज आहे आणि आपण तो विचार करावा अशी मी विनंती करतो. जसे मी तुम्हाला सांगितले, जसे नगरसेवकांकडे बाहेरच्या शाळेतून शिफारस घेण्यासाठी येतात, तसे आम्हाला या-या महापालिकेच्या शाळेत ऍडमिशन मिळावे अशी शिफारस घेण्यासाठी लोकांनी आमच्याकडे यावे, असे काम येणा-या शिक्षण समितीने करावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि थांबतो. धन्यवाद!

**मा.तुषार हिंगे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पहिल्यांदा मी सर्व सभागृहाच्या वतीने अभिनंदन करेन की, शिक्षण मंडळाच्या बजेटचा विषय सभागृहासमोर ठेवला आहे. मी मागील वेळी आयुक्त साहेबांना भेटलो होतो. पिंपरी चिंचवड शहरात जेवढ्या झोपडपट्टया आहेत, अंगणवाड्या आहेत, त्यांची दूरावस्था एवढी झाली आहे. मला सांगितले की, या अंगणवाड्या राज्य शासनाकडे आहेत. माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे की, झोपडपट्टीतली मुले अंगणवाडीत तयार होतात. आपण स्वतः जाऊन शहरातील पूर्ण

झोपडपट्ट्यांचा सर्वे करावा आणि अंगणवाड्यांची परिस्थिती बघावी. त्यांना तिथे जागा नाही. जागा असलीतरी पूर्ण रुम लिकेज होते आहे. एवढी भयानक परिस्थिती आहे. त्या मुलांना तिथे बसायची व्यवस्था नाही. शिक्षण मंडळाकडून काही करता येत असेलतर तसे करावे.

पिंपरी चिंचवडचे पॉलिटेक्निक आहे, आयटीआय आहे. पिंपरी चिंचवडचे आयटीआय माझ्या प्रभागात आहे. आज मुलांचा जास्त कल आयटीआयकडे दिसतोय. आयटीआयचा परिसर आता कमी पडतोय. तो वाढवण्यासाठी भविष्यात काय करता येईल याची तरतूद करावी. मोरवाडीत महापालिकेची शाळा नाही. आज तिथे रेणुकादेवी मंदीर आहे, त्याठिकाणी पहीली ते सातवी पर्यंतची शाळा भरते. गेले आठ ते नऊ वर्षांपासून या छोट्या मंदीरात ही शाळा भरते आहे. महापालिकेतर्फे काय करता येईल ते आपण करावे. एवढी विनंती करतो व थांबतो.

**मा.एकनाथ पवार**–मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खरेतर शिक्षण मंडळाच्या विषयावर बोलू द्यायचे नाही. तसे दीड तास त्या विषयावर सगळेजण बोलतोय. मला कल्पना आहे, या शहरातील शाळेचा दर्जा सुधारला पाहीजे. सगळ्यांची प्रामाणिक इच्छा आहे की, शाळेचा दर्जा सुधारला पाहीजे. शिक्षकांनी मनापासून काम केले पाहीजे. खाजगी शाळांसारखे महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण मिळाले पाहिजे. या पक्षाचे, सगळ्यांचे मनापासून हे म्हणणे आहे. शंभर टक्के अशी परिस्थिती नाही. मागील काळात काय झाले या विषयात मा.दत्ता साने आम्हाला जायचे नाही. पुढील काळात सर्वसामान्य घरांतील मुलांना चांगले शिक्षण मिळण्यासाठी जे खरोखर शिक्षण समितीत चांगले काम करु शकतात, महापालिकेच्या शाळांचा दर्जा चांगला सुधारण्यासाठी चांगले होतकरु, शिक्षणाची आवड असणा-या नगरसेवकांना संधी द्यावी यासाठी हा विषय मंजूर करावा.

**मा.महापौर** – उपसूचना स्विकारली का.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, मा.योगेश बहल यांनी मांडलेली उपसूचना स्विकारलेली नाही ती वगळून हा विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.महापौर** – हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.भुजिं/२/कावि/१०१/२०१७ दि.२५/४/२०१७

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४६१ दि.३१.५.२०१७

मौजे पिंपरी चिंचवड महानगरपालिका मनपाच्या मालकीचे मौजे सांगवी स.नं.९ पैकी जागेवरील मनपा शाळा इमारत तळमजला वरील १३ व्यापारी गाळे या गाळ्यापैंकी गाळा क्र.५ भाडेपट्टा/लिजने देणेबाबतचे क्षेत्रफळ २३६.८ चौ.फु. ही मिळकत नगररचना विभागाने तीस वर्षासाठी ठरवुन दिलेला लिजदर र.रु.६३४४/-प्रती चौ.फु. नुसार येणारी लिज र.रु.१५,०२,२५९/- प्रमाणे ३० वर्ष कालावधीसाठी ई-निविदा सुचना क्र.७/२०१५-१६ प्रसिध्द करण्यात आले होते. सदरकामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या असुन सर्व निविदा पात्र ठरलेल्या आहेत. सदरकामी निविदामधील सर्व उच्च दर र.रु.१६,०५,५५५/- हा मे.ढोरे ट्रान्सपोर्ट अँन्ड वॉटर सप्लायर्स सौ.सविता रमेश ढोरे यांनी दर सादर केला आहे. मे.ढोरे ट्रान्सपोर्ट अँन्ड वॉटर सप्लायर्स, सौ.सविता रमेश ढोरे या निविदाधारकांची निविदा ही निविदा दरापेक्षा १०६.८७% जास्त रक्कम रुपये १६,०५,५५५/-(अक्षरी रक्कम रुपये सोळा लाख पाच हजार पाचशे पंचावन्न फक्त) दराची व अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेने ३० वर्षे कालावधीसाठी लीज दराने देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.माधुरी कुलकर्णी** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – मा.महापालिका सभेने ठराव क्र. ०९ दि.२०/४/२०१७ अन्वये नविन "ग" व "ह" प्रभाग समित्या निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये समित्यांच्या जागामध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | नाव | मंजूर ठिकाण | फेरबदल करावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | "ग" प्रभाग समिती | करसंकलन कार्यालय इमारत, थेरगाव | करसंकलन कार्यालय व शेजारील माध्यमिक विदयालय नविन इमारत |
| २ | "ह" प्रभाग समिती | करसंकलन कार्यालय इमारत, सांगवी | कासारवाडी येथील महिला आय.टी.आय. इमारत |

तरी वरीलप्रमाणे जागेमध्ये बदल करणेस मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.तुषार कामठे**– मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – हा विषय उपसूचनेसहीत मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक – ३

दिनांक – २०/६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.भुजिं/२/कावि/१०१/२०१७ दि.२५/४/२०१७

२) मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४६१ दि.३१.५.२०१७

मौजे पिंपरी चिंचवड महानगरपालिका मनपाच्या मालकीचे मौजे सांगवी स.नं.९ पैकी जागेवरील मनपा शाळा इमारत तळमजला वरील १३ व्यापारी गाळे या गाळ्यापैंकी गाळा क्र.५ भाडेपट्टा/लिजने देणेबाबतचे क्षेत्रफळ २३६.८ चौ.फु. ही मिळकत नगररचना विभागाने तीस वर्षासाठी ठरवुन दिलेला लिजदर र.रु.६३४४/-प्रती चौ.फु.नुसार येणारी लिज र.रु.१५,०२,२५९/- प्रमाणे ३० वर्ष कालावधीसाठी ई-निविदा सुचना क्र.७/२०१५-१६ प्रसिध्द करण्यात आले होते. सदरकामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या असुन सर्व निविदा पात्र ठरलेल्या आहेत. सदरकामी निविदामधील सर्व उच्च दर र.रु.१६,०५,५५५/- हा मे.ढोरे ट्रान्सपोर्ट अँन्ड वॉटर सप्लायर्स सौ.सविता रमेश ढोरे यांनी दर सादर केला आहे. मे.ढोरे ट्रान्सपोर्ट अँन्ड वॉटर सप्लायर्स, सौ.सविता रमेश ढोरे या निविदाधारकांची निविदा ही निविदा दरापेक्षा ६.८७% जास्त रक्कम रुपये १६,०५,५५५/-(अक्षरी रक्कम रुपये सोळा लाख पाच हजार पाचशे पंचावन्न फक्त) दराची व अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेने ३० वर्ष कालावधीसाठी लीज दराने देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मा.महापालिका सभेने ठराव क्र. ०९ दि.२०/४/२०१७ अन्वये नविन “ग” व “ह” प्रभाग समित्या निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये समित्यांच्या जागामध्ये खालीलप्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | नाव | मंजूर ठिकाण | फेरबदल करावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | “ग” प्रभाग समिती | करसंकलन कार्यालय इमारत, थेरगाव | करसंकलन कार्यालय व शेजारील माध्यमिक विदयालय नविन इमारत |
| २ | “ह” प्रभाग समिती | करसंकलन कार्यालय इमारत, सांगवी | कासारवाडी येथील महिला आय.टी.आय. इमारत |

तरी वरीलप्रमाणे जागेमध्ये बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ४

दिनांक – २०/६/२०१७

विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/BSUPप्र/१९२/२०१७, दि.१९/०५/२०१७

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र. ८ दि.२३/०५/२०१७

केंद्रशासनाने नागरी भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सामिल होणेबाबत महाराष्ट्र शासनाचे दि.०९/१२/२०१५ चे शासन निर्णयानुसार दि.०३/०२/२०१६ चे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे आणि त्या अनुषंगाने योजनेचे बारकावे समजून घेणेसाठी शासनामार्फत दि.२१/०४/२०१६ व दि.१७/०५/२०१६ रोजी मुंबई येथील सह्याद्री अतिथिगृहात याविषयी परिसंवाद आयोजित केला होता. त्यामध्ये महानगरपालिके मार्फत मा.आयुक्त, मा.सह. आयुक्त, मा.सह शहर अभियंता BSUP, मा.सहा. आयुक्त झोनिपु, कार्यकारी अभियंता BSUP हे सहभागी झाले होते व त्यासंबंधी प्रस्ताव सादर करणेसाठी शासनाचे मा.श्री. निर्मलकुमार देशमुख, राज्य अभियान संचालक यांनी दि.०३/०२/२०१६ तसेच दि.१३/०४/२०१६ च्या पत्रामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्रधानमंत्री आवास योजना "सर्वांकरिता घरे २०२२"मध्ये योजना तयार करणे संदर्भात व शहरी गरीब लाभार्थी निश्चित करणे संदर्भात कळविले आहे. तसेच शासनाने म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण समिती म्हणून नेमणूक केली असून त्यांनी दि.०१/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेचा आराखडा DPR(Detailed Project Report) तयार करुन प्रस्तावाच्या छाननी करिता मुख्य अधिकारी पुणे गृहनिर्माण क्षेत्र व क्षेत्र विकास मंडळाच्या कार्यालयाकडे सादर करणेविषयी तसेच दि.१५/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मागणी सर्व्हेक्षण बाबतचा अहवाल देणेबाबत कळविले आहे.

**या योजनेतील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-**

१) सदर योजनेमध्ये केंद्रशासनाचे प्रत्येक घरासाठी र.रु.१.५ लक्ष व राज्य शासनाचे र.रु.१ लक्ष इतके अनुदान आहे व उर्वरित र.रु ५.७७ लाख हिस्सा लाभार्थी यांचा असणार आहे.

२) सदर योजनेमध्ये ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत.

३) या योजनेसाठी शहरातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या नागरिकांचे अर्ज मागवावयाचे आहेत. ज्या व्यक्तीचे उत्पन्न वार्षिक र.रु.३ लाख आहे तोच लाभार्थी पात्र ठरणार आहे.

४) लाभार्थी भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.

५) सदर योजनेतील घरे हे कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील आणि कर्ती महिला सदस्य नसेल तर या ठिकाणी कर्ता पुरुष यांच्या नावे घर राहिल.

६) लाभार्थी कुटुंबामध्ये पति / पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल. या अभियान अंतर्गत केंद्राकडून अनुदान / सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरिता देशातील कोणत्याही भागात लाभार्थी कुटुंबातील व्यक्तीच्या मालकीचे पक्के घर नसावे.

७) अभियान अंतर्गत बांधण्यात येणा-या घरांची सहकारी संस्था स्थापन करणेत येईल.

८) या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची पात्रता प्रधानमंत्री आवास योजना, “सर्वांसाठी घरे” – नागरी च्या मार्गदर्शक सूचना नुसार राहील.

सदरची योजना केंद्रशासनाची असून योजनेस केंद्र व राज्य शासनाने सदर योजनेस आर्थिक मदत दर्शविली आहे. त्याअनुषंगाने सदर योजना नागरी स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयाद्वारे लागू केली असून त्यामुळे सदर योजनेमध्ये महानगरपालिकेने भाग घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार EWS(Economically Weaker Section) च्या आरक्षित जागांवर घरकूल प्रकल्प राबविणेकरिता DPR बनविणेकामी त्या जागेचा सविस्तर सर्व्हे करणे, इमारत बांधकाम नकाशे तयार करणे, मुलभूत सुविधा (Infrastructure) नियोजन करणे, बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पाकरिता पर्यावरण नाहरकत दाखला, शासकीय तसेच निमशासकीय संस्थाकडील नाहरकत प्रमाणपत्रे सादर करणे, प्रकल्पाच्या बांधकामास परवानगी घेणे, निविदा तयार करणे, DPR बनवून तो शासनाकडे सादर करणे, तसेच त्यास केंद्र व राज्य शासनाची मंजुरी तसेच अनुदान मिळविणेकामी वेळोवेळी पाठपुरावा करणे व इतर तदनुषंगिक वास्तुविशारद व अभियांत्रिकीविषयक सल्ला इत्यादी आवश्यक कामे करणेकामी सदर क्षेत्रातील अनुभवी वास्तुविशारद व अभियांत्रिकी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत EWS योजनेच्या घरे बांधणेचे काम करणेसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. इनग्रेन आर्किटेक्ट अँण्ड अर्बन प्लानर यांची नेमणूक केली आहे व त्यांचेमार्फत DPR बनविणेचे काम सुरु आहे.

सध्या महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरे या आरक्षणांतर्गत पुढीलप्रमाणे जागा ताब्यात आलेल्या आहेत.

**तक्ता अ**

| अक्र | गावाचे नाव | आरक्षण क्र. | स.नं./गट नं. | जागेचे एकुण क्षेत्र हे. | मनपाच्या ताब्यात आलेले क्षेत्र | होऊ शकणारी संभाव्य घरे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **EWS आरक्षणे** | | | | |
| १ | च-होली | २/८३ | स.नं.४०८पै, ४०९पै | २.१५ | २.१५ | १४४२ | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. |
| २ | रावेत | ४/१०२ | ९६ पै | १.४६ | ० | १०८० | **सरकारी गायरान जमीन** मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेणेची कार्यवाही चालू आहे. |
| | | DPR ला मान्यता मिळालेनंतर जागा रु १/-प्रति चौ मी दराने PMAY करीता मनपास ताब्यात मिळेल {शासन निर्णय क्रमांक जमीन -२०१६/प्र क्र .२१३/ज -१ दि १९ सप्टेंबर २०१६ नुसार ) | | | | | |
| ३ | डुडुळगांव | १/२३३ | १०५पै, १०७ पै, १०८ पै ते ११२ पै | २.०० | १.६५ | ८९६ | ८२.५०% जागा ताब्यात आली असून उर्वरित १७.५०% जागेपैकी ८ गुंठे जागा खाजगी मालकीची असून ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे व उर्वरित क्षेत्र नाल्याचे आहे. |
| ४ | दिघी | २/१२७ | ६६ पै | १.१४ | ० | ८४० | **सरकारी गायरान जमीन** मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेणेची कार्यवाही चालू आहे |
| | | DPR ला मान्यता मिळालेनंतर जागा रु १/-प्रति चौ मी दराने PMAY करीता मनपास ताब्यात मिळेल {शासन निर्णय क्रमांक जमीन -२०१६/प्र क्र .२१३/ज -१ दि १९ सप्टेंबर २०१६ नुसार ) | | | | | |
| ५ | बो-हाडेवाडी | १/१६२ | १२८५, १२८७, १२९० | २.०० | १.७२ | १४०० | ८६% जागा ताब्यात आली असून उर्वरित १४% जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे. |
| ६ | वडमुखवाडी | २/३१ | २०१पै ते २०५ पै | २.०० | १.२५ | १४०० | ६२.५०% जागा ताब्यात आली असून उर्वरित ३७.५०% जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे. |
| ७ | चिखली | १/९० | १६५३ पै | २.०० | ० | १४०० | **सरकारी गायरान जमीन** मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेणेची कार्यवाही चालू आहे. |
| | | DPR ला मान्यता मिळालेनंतर जागा रु १/-प्रति चौ मी दराने PMAY करीता मनपास ताब्यात मिळेल {शासन निर्णय क्रमांक जमीन -२०१६/प्र क्र .२१३/ज -१ दि १९ सप्टेंबर २०१६ नुसार ) | | | | | |

| HDH आरक्षणे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पिंपरी | ७७ | १०९पै, | ०.६४ | ०.६४ | ३०० | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. |
| ९ | पिंपरी | ७९ | ११०पै | ०.४४ | ०.४४ | २०० | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. |
| १० | आकुर्डी | २८३ | | १.७८ | ०.९५ | ५०० | मनपाच्या अखत्यारितील क्षेत्र ताब्यात आले असून उर्वरित क्षेत्र MIDC च्या ताब्यात आहे. |
| **एकुण** | | | | | | **९४५८** | |

जसजशा जागा ताब्यात येतील तश्या निविदा काढणेत येतील.सदर जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २.५ F.S.I. अपेक्षित धरुन घरकुले बांधणेचे नियोजन खालीलप्रमाणे केलेले आहे.

**तक्ता ब**

| अ. क्र . | आरक्षणाचे ठिकाण | संभाव्य घरांची संख्या |
|---|---|---|
| १ | च-होली | १४४२ |
| २ | रावेत | १०८० |
| ३ | डुडुळगांव | ८९६ |
| ४ | दिघी | ८४० |
| ५ | बो-हाडेवाडी | १४०० |
| ६ | वडमुखवाडी | १४०० |
| ७ | चिखली | १४०० |
| ८ | पिंपरी | ३०० |
| ९ | पिंपरी | २०० |
| १० | आकुर्डी | ५०० |
| | **एकुण** | **९४५८घरे** |

अ.क्र. ८ ते १० मधील जागांवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शासनाकडून लवकरच मंजुरी मिळणार असल्याने सदर जागांवर सुद्धा घरे बंधने बाबत नियोजन करणेत येत आहे.

- **प्रकल्पातील इमारतींविषयी ठळक वैशिष्ट्ये**

१) इमारत पार्किंग + १४ मजली (तळ मजला पुर्णपणे पार्किंगसाठी राखीव). इमारतीभोवती पुरेशी मोकळी जागा

२) दोन लिफ्ट - १.४८ X २.१० मी. (५' X ७')

३) एक स्ट्रेचर लिफ्ट ३.३६ X १.९९ मी. (११' X ६.६')

४) दोन जिने (रुंदी १.५० मी.), जिन्या मध्ये कोटा फरशी.

५) सामाईक पॅसेज (रुंदी १.३५ मी.), Vitrified tiles सुरक्षिततेच्या दृष्टीने १.२ मीटर उंचीची पडदी (Parapet) Oil Paint सह.

६) इमारतीला बाहेरुन Texture Paintव आतून Oil Bound Distemper

७) नियमानुसार आवश्यक ती अग्निशमन व्यवस्था (Fire Fighting).

८) जमिनीखाली व इमारतीवर आवश्यक क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या.

९) प्रत्येक इमारतीस सोलर हिटर सुविधा.

१०) इमारतीचे Aluminum Form Work च्या सहाय्याने एकसंध RCC बांधकाम ( Monolithic Construction).

११) पार्किंगमध्ये Trimix पध्दतीचे Flooring.प्रत्येक इमारतीच्या पार्किंगमध्ये स्वच्छतागृहासह सोसायटी ऑफीस.

१२) प्रत्येक मजल्यावर १६ सदनिका, प्रत्येक सदनिकेला पुरेसा उजेड, हवेशीर अशी व्यवस्था.

१३) इमारतींचा देखभाल - दुरुस्तीचा कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ३ वर्षे व लिफ्ट ची देखभाल दुरुस्तीचा कालावधी ५ वर्षे राहील.

१४) मलशुध्दीकरण केंद्राचा देखभाल दुरुस्तीचे कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ५ वर्षाचा राहील.

- **इमारतीतील सदनिकेची ठळक वैशिष्ट्ये**

१) केंद्र शासनाच्या नियमानुसार एका सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (Carpet Area) ३० चौ.मी.३२२ चौ.फुट

२) बैठकीची खोली (Hall)– ३.०६ X ३.२ मी. (१०'- १ X १०' – ६'')

३) स्वयंपाक गृह (Kitchen)– २.४९ X १.९८ मी. (८'X ६' – ६'')

४) शयनगृह (Bedroom)– २.७४ X ३.२० मी. (९'X १०' – ६'')

५) स्नानगृह (Bathroom)- १.५२ X १.२० मी. (५'X ४')Wash basin सह, स्नानगृहामध्ये Antiskid ceramic tileflooring,४ फुट उंचीचा Glazed Tileमध्ये Dadoव Oil Paint.

६) शौचालय (W.C.)– १.२० X ०.९१ मी. (४'X ३')ओरीसा पध्दतीचे W.C. पॅन, सिरॅमिक टाईल फ्लोरींगव ४ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dadoव ४ फुटाच्या वरील भागास Oil Paint.

७) माळा (Loft)स्वयंपाकगृहामध्ये– ०.६ मी. (२’) रुंदी व ०.७५ मी. (२’ ६’’) उंचीचा.

८) मुख्य दरवाजा व बेडरुम चा दरवाजा - PUF Material मध्ये.

९) स्नानगृह व संडास चा दरवाजा - PVC Material मध्ये.

१०) खिडक्या - Aluminum Slidingव लोखंडी Grill सह.

११) विद्युत तारा– Casingपट्टीमध्ये, PowerPoint, Switches - Anchor कंपनीचे / तत्सम.

१२) Kitchen Otta – Kadappa Platformमध्ये Stainless Steel sink, Platform वर २ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dado.

१३) सदनिकेमध्ये आतील भिंतींना सर्वत्र Oil Bound Distemper.

अशा पध्दतीची इमारतीची व सदनिकेची वैशिष्ट्ये राहतील.

प्रत्येक प्रकल्पासाठी येणारा खर्च (Infra खर्च वगळता) खालीलप्रमाणे:-

**तक्ता क**

| गावाचे नाव | आरक्षण क्र. | होऊ शकणारी संभाव्य घरे | संभाव्य खर्च र.रु. |
|---|---|---|---|
| च-होली | २/८३ | १४४२ | १,१९,३१,७५,६९०.०० |
| रावेत | ४/१०२ | १०८० | ८९,३६,४०,६००.०० |
| डुडुळगांव | १/२३३ | ८९६ | ७४,१३,९०,७२०.०० |
| दिघी | २/१२७ | ८४० | ६९,५०,५३,८००.०० |
| बो-हाडेवाडी | १/१६२ | १४०० | १,१५,८४,२३,०००.०० |
| वडमुखवाडी | २/३१ | १४०० | १,१५,८४,२३,०००.०० |
| चिखली | १/९० | १४०० | १,१५,८४,२३,०००.०० |
| पिंपरी | ७७ | ३०० | २४,८२,३३,५००.०० |
| पिंपरी | ७९ | २०० | १६,५४,८९,०००.०० |
| आकुर्डी | २८३ | ५०० | ४१,३७,२२,५००.०० |
| | | **खर्च र.रु.** | **७,८२,५९,७४,८१०.००** |

म्हणजेच प्रत्येक सदनिकेला येणारा खर्च हा र.रु.८,२७,४४६/- इतका आहे. यामध्ये प्रकल्पासाठी लागणा-या जागेची किंमत, विकास शुल्क, प्रिमिअम शुल्क इत्यादींचा समावेश नाही. इमारतीच्या बांधकाम क्षेत्राप्रमाणे प्रत्येक सदनिकेचा Construction Built up Area हा ५४५ चौ.फुट आहे. म्हणजेच प्रति चौ.फुट बांधकामाचा खर्च र.रु.१५१८/- इतका येत आहे.

सदर प्रकल्पासाठी महानगरपालिकेने टाकावयाच्या हिश्याऐवजी प्रकल्पास निशुल्क जागा उपलब्ध करुन देणार आहे. तसेच प्रकल्पासाठी लागणा-या सध्याच्या रेडीरेकनर नुसार जागेची किंमत, बांधकाम परवानगीचे विकास शुल्क, प्रिमिअमची शुल्क इत्यादी महानगरपालिका लाभार्थ्यांकडून घेणार नाही. त्या आधारे महानरपालिका अप्रत्यक्षरित्यापुढील तक्ता ड नुसार लाभार्थ्यांना मदत करणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेमधील प्रकल्पांचे DPR हे राज्य शासनाच्या SLSMC (State Level Sanctioning & Monitoring Committee) समोर Scrutiny व

Approval साठी सादर केले जाणार आहे. त्यामध्ये DPR Cost मधील DPR Cost व सदनिका खर्चामध्ये बदल होऊ शकते. त्यामुळे लाभार्थ्यांचा हिस्सा हा SLSMC कमिटी मध्ये जो निश्चित करुन दिला जाईल त्यानुसार राहील.

प्रत्येक सदनिकेसाठी रु.१.५ लाख केंद्रशासन, रु.१ लाख राज्य शासन व उर्वरित हिस्सा लाभार्थ्यांकडून घेणेचे नियोजन आहे. प्रकल्पाच्या Infra Work,प्रकल्प भाववाढ व प्रकल्पासाठी अनुषंगिक खर्च ही रक्कम महानगरपालिका स्वतः मनपा फंडातून खर्च करेल.

**तक्ता ड**

| अ.क्र. | गावाचे नाव | आरक्षण क्र. | होऊ शकणारी संभाव्य घरे | क्षेत्र (हेक्टर) | प्रशमन शुल्कर.रु. कोटी | सध्याचे रेडी रेकनर नुसार संपादित जमिनीची किंमतर.रु. कोटी | एकुणमनपा हिस्सा र.रु. कोटी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | च-होली | २/८३ | १४४२ | २.१५ | ११.५८ | १४.५७ | २६.१५ |
| २ | रावेत | ४/१०२ | १०८० | १.४६ | ११.८८ | ०.०० | ११.८८ |
| ३ | डुडुळगांव | १/२३३ | ८९६ | २.०० | १०.६८ | ८.१६ | १८.८४ |
| ४ | दिघी | २/१२७ | ८४० | १.१४ | ६.३७ | ०.०० | ६.३७ |
| ५ | बो-हाडेवाडी | १/१६२ | १४०० | २.०० | ११.७३ | १३.०० | २४.७३ |
| ६ | वडमुखवाडी | २/३१ | १४०० | २.०० | ११.०२ | ७.६८ | १८.७ |
| ७ | चिखली | १/९० | १४०० | २.०० | १२.१४ | ०.०० | १२.१४ |
| ८ | पिंपरी | ७७ | ३०० | ०.६४ | ३.९७ | ५.९७ | ९.९४ |
| ९ | पिंपरी | ७९ | २०० | ०.४४ | २.८२ | ४.१० | ६.९२ |
| १० | आकुर्डी | २८३ | ५०० | १.७८ | ७.९८ | ७.३६ | १५.३४ |
| **एकुण खर्च र.रु. कोटी** | | | | | **९०.१७** | **६०.८४** | **१५१.०१** |

प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम करताना केंद्रशासन, राज्यशासन व लाभार्थी यांचेकडून हिस्सा घेऊन काम करणेत येईल. परंतू प्रकल्प पूर्ण होणेसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च, शासन व लाभार्थी एकुण हिस्सा यामधील फरक व प्रकल्पाचे बांधकाम परवानगीचे छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रशमन शुल्क, अधिमुल्य यांची रक्कम महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून गृहित धरणेत येईल.त्यामुळे सदर प्रकल्पासाठी बांधकाम परवानगीचे सर्व शुल्क माफ करणेचे प्रस्तावित आहे.

SLSMC (State Level Sanctioning & Monitoring Committee)निश्चित केलेला लाभार्थी यांचा स्वहिस्सा पुढीलप्रमाणे जमा करणेत येईल. त्यामध्ये सोडतीमध्ये (Lucky Draw)नाव आल्यानंतर पहिला हप्ता २०%रक्कम, दुसरा हप्ता ४०% रक्कम हा इमारतीचे काम ५०% झाल्यानंतर व तिसरा हप्ता ४०% रकमेचा भरणा ताबा मिळण्यापूर्वी मनपाकडे करणे आवश्यक आहे. सदरची सदनिका मनपा मार्फत बांधून लाभार्थ्यांना त्यांचा हिस्सा भरुन घेतलेनंतर ९९ वर्षाच्या Lease ने देणेत येतील. लाभार्थ्यांना मिळकत कर, वीज बिलइ. बिले स्वतः भरावी

लागतील. प्रत्येक इमारतीची सोसायटी स्वतंत्र करणेत येईल व सोसायटीमार्फत सामाईक वीज बिल, सामाईक पाणी बिलभरावे लागेल.

महानगरपालिका ज्याप्रमाणे मनपा क्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा, दिवा बत्ती, ड्रेनेज, मलशुध्दीकरण केंद्र (STP), घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management)इत्यादी मुलभूत सुविधा (Infrastructure) स्वखर्चाने करते त्याप्रमाणे या प्रकल्पातही महानगरपालिकेने स्वखर्चाने करावे असे वाटते. या सुविधा MPCB पर्यावरण खात्याच्या नियमानुसार करणे आवश्यक आहे. त्या मुलभूत सुविधांचा खर्च खालीलप्रमाणे :-

**तक्ता इ**

| अक्र | ठिकाणाचे नाव | सीमाभिंत | रस्ते | पावसाळी गटर व Rain water harvesting | पा.पु. | ड्रेनेज | मलशुध्दी करण केंद्र (STP) | घनकचरा व्यवस्थापन S.W.M | दिवाबत्ती ट्रान्सफॉर्मर फिडर इ. | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सर्व आकडे लक्ष मध्ये** | | | | | | | | | | |
| १ | च-होली | २७.९२ | २३२.८६ | ९३.८८ | १२.६१ | ४३.३२ | १५१.१५ | १. | २३३.४७ | ७९६.२१ |
| २ | रावेत | २०.९१ | १७४.४ | ७०.३२ | ९.४४ | ३२.४४ | ११३.२१ | ०.७५ | १७४.८६ | ५९६.३३ |
| ३ | डुडुळगांव | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ४ | दिघी | ९.५५ | ६५. | २८.३ | ७.५ | २७. | ६५. | ०.५५ | १२५. | ३२७.९ |
| ५ | बो-हाडेवाडी | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ६ | वडमुखवाडी | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ७ | चिखली | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ८ | पिंपरी | ७.५ | १०. | १२. ५० | ५.५ | २२. | ३५. | ०.४५ | ०.३५ | ८०.८ |
| ९ | पिंपरी | ५.५ | ८. | ९.२५ | ४.५ | १८. | ३०. | ०.४ | ०.३ | ७५.९५ |
| १० | आकुर्डी | २३.१२ | १२५. | ७८.३२ | १३.५ | ३६.२३ | ११९. | ०.७८ | १८२. | ५७७.९५ |
| **एकुण** | | | | | | | | | **र.रु.लक्ष** | **४४३४.१** |

एकंदरीत वरील सर्व ठिकाणी मुलभूत सुविधा (Infrastructure) पुरविणेकामी रु.४४३४. १० लक्ष इतका खर्च येईल. सदर प्रकल्पातील इमारतींचे काम सुरु झालेनंतर मुलभूत सुविधा (Infrastructure) करिता निविदा काढण्यात येतील.

सदर प्रकल्पासाठी खालील बाबींची मंजूरी आवश्यक आहे.

१) प्रस्तावास प्रशासकीय मान्यता
२) बांधकाम परवानगी
३) पर्यावरण खात्याकडील नाहरकत दाखला (Environmental Clearance Certificate)
४) राज्य शासनाच्या “केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती”(CSMC)ची मान्यता

प्रशासकीय मान्यतेनंतर बांधकाम परवानगी साठी व पर्यावरण व ईतर दाखल्यासाठी अर्ज दाखल करणेत येईल. प्रस्तावास मनपाची मान्यता मिळालेनंतर सदर योजना म्हाडा मार्फत राज्य शासनाच्या "केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती"(CSMC)ची मान्यता घेवून प्रकल्पाच्या इमारतीच्या बांधकामांच्या सर्व निविदा काढणेत येतील.

**पंतप्रधान आवास योजनेकरिता**प्रशासकीय मान्यतेकरिता खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**तक्ता ई**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **खर्च** |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा एकुण खर्च | ७,८२,५९,७४,८१० |
| २ | ५% Contingencies सह | ८,२१,७२,७३,५५१ |
| ३ | २% Work charges establishment Charges सह | ८,३८,१६,१९,०२२ |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | ४६,९५,५८,४८९ |
| **एकुण (३ + ४)** | | ८,८५,११,७७,५१० |
| **Say एकुणरु.** | | **८८५.१२कोटी** |

महानगरपालिकेमार्फत मुलभूत सुविधा पुरविणे (Infra) कामांचा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

**तक्ता –फ**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **खर्च** |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा एकुण खर्च | ४४,३४,१०,००० |
| २ | ५% Contingencies | ४६,५५,८०,५०० |
| ३ | २% Work charges establishment | ४७,४८,९२,११० |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | २,६६,०४,६०० |
| **एकुण (३ + ४)** | | **५०,१४,९६,७१०** |
| **Say एकुणरु.** | | **५०. १५कोटी** |

**तक्ता - ई** नुसार केंद्र शासन, राज्य शासन व मनपा यांचे संयुक्त निधी मधून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत ९४५८ सदनिका बांधणेकामी **र.रु.८८५.१२कोटी**चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे व सदर प्रकल्पाचे साईटवर मुलभूत सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी **तक्ता – फ** नुसार येणा-या **र.रु.५०.१५ कोटी** चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा.माधुरी कुलकर्णी** – मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचे तर्फ केंद्रशासन, राज्यशासन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांचे संयुक्त विदयमानाने स्वारगेट-पुणे ते पिंपरी पर्यंत मेट्रोचे काम सुरु होत आहे. त्या अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये पिंपरी ते दापोडी कोरोडोर (१) येथे स्ट्रीट लाईटचे पोल मधे येत असून ते काढून दुस-या ठिकाणी शिफ्ट करावे लागणार आहे त्या करीता र.रु.३,६१,००,०००/- इतका खर्च येणार असून प्रस्तुतचे काम निविदा काढून करणेत येत आहे. प्रस्तुतची रक्कम र.रु.३,६१,००,०००/- महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन महानगरपालिकेस देणार आहे. सबब प्रस्तुतची रक्कम जमा करुन घेणे करिता सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकात भाग-२ भांडवली जमा मध्ये “महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचे कडून जमा” स्वतंत्र निधी निर्माण करुन र.रु.३,६१,००,०००/- जमा दर्शवणेत यावे व त्यातुन खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देणेत यावी तसेच लेखाशिर्षकावर यापुढे महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचेकडून जमा करणेस व खर्च करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.तुषार कामठे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.दत्ता साने-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मी जे काही बोलतोय ते स्वतःसाठी बोलत नाहीतर समाजासाठी, शहरासाठी बोलतोय. आपण मला बोलायची संधी दिलीत त्यासाठी आपले अभिनंदन. हा चिखली भागातील विषय आला आहे. त्यामुळे आपल्याला माहित आहे. चिखली भागात जेएनएनयूआरएमचे काम होऊ नये, यापुर्वी सुध्दा सभागृहात विषय आला होता त्यामध्ये चिखली वगळून हा विषय व्हावा असा आपण विषय मांडलेला होता. याला कारण सांगतो, पिंपरी चिंचवड महापालिका जेएनएनयूआर अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी ईडब्ल्यूएस, चिखली सेक्टर क्र.१७ व १९ मध्ये घरे बांधणेबाबत, कमीत कमी १३२५० सदनिका बांधण्याबाबत, मा.आयुक्त साहेब, मी विरोध का करतोय. कारण आमच्याकडे या आधीच एक स्किम चालू आहे. अर्धी चालू आहे आणि अर्धी बंद होण्याच्या मार्गावर आहे आणि अर्धी कोर्टात आहे. एक स्किम होत असताना सेक्टर ३० आर मध्ये आमच्या चिखली परीसरामध्ये जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून घरकुल योजना चालू आहे. ही होत असताना एकाच गावात दोन-दोन वेळा या स्किम आणून हा नक्कीच आमच्या गावावर अन्याय होतो आहे. यापूर्वी आम्ही हा विषय मी मांडला होता. हा विषय वगळून बाकी गावांसाठी स्किम करावी. आमच्याकडे २ हेक्टर जागा आहे. त्या गायरानात त्या आरक्षणाच्या बाजूला खूप मोठे काम तुकाराम महाराज संतपीठ उभारायचे प्रस्तावित केले आहे. या आरक्षणाच्या माध्यमातून घेतो आहे. त्याच आरक्षणाच्या बाजूला तिथेच भामा-आसखेड प्रकल्प आणतोय. हे सगळे आणत असताना चांगले प्रोजेक्ट आणण्यापेक्षा परत हे घरकूल. त्यावेळी आदरणीय पवार साहेबांना घरकूल योजनेचे उद्घाटन न करु देणारा मी आहे. त्यावेळी मा.वैशाली घोडेकर या महापौर होत्या. मी त्यावेळी पवार साहेबांना घरकूलचे उद्घाटन करु दिले

नव्हते. कारण आख्ख्या शहरातील लोकं एकाच ठिकाणी आणून ठेवायची. आम्ही त्यावेळीही सांगितले होते की, वेगवेगळ्या ठिकाणची ईडब्ल्यूएस आरक्षणे आहेत ती विभागून त्या-त्या ठिकाणी अ,ब,क,ड अशी प्रभागनिहाय करा. प्रभागनिहाय लोक त्या-त्या ठिकाणी डिव्हाईड करा असे सांगितले होते. आजही घरकुल बाबतची परिस्थिती त्या भागातील नगरसेवकांना माहिती आहे. रोज आमच्या नगरसेवकांना काय त्रास होतो ते त्या भागातले नगरसेवक जाणो आणि नागरीक जाणो. आम्हाला माहित आहे. मी घरकुल विरोधात नाही. तिथले लोक चांगले आहेत. परंतू तिथली जी सेकण्ड पिढी आहे, तिथले जे तरुण आहेत. तिथे जो प्रकार आहे. एका ठिकाणी पंधरा/सोळा हजार घरे देऊन तिथली लोकसंख्या वाढतेय. एका ठिकाणी तीस/बत्तीस हजार लोकं एका ठिकाणी आणणे हेही तसं गैर आहे. आम्ही त्यावेळी सांगितले होते, शहरात विभागनिहाय करा. म्हणजे एकाला कोणाला त्रास होणार नाही.

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून ६,१७४ घरे बांधायचे ठरले होते. मी त्याकाळात प्रशासनाकडून काही माहिती मागीतली. चिखली भागातील प्राधिकरणातील आरक्षण क्र.५२० होता. जागेचे क्षेत्रफळ २५ हेक्टर ३० आर., सदनिका चटई क्षेत्रफळ २६.७४ चौ.मी. म्हणजे ४०० चौ.फूट बिल्डअप एरिया, २.५ एफ.एस.आय. मिळाला. घराची किंमत रु.३.७६ लाख रुपये होती. त्याकाळात २००८ मध्ये ही योजना चालू केली. साधारणतः दि.१५/७/२००७ ला योजना चालू केली. याचिका दाखल केली, ही योजना बंद करायचे काम कोणीतरी सारंग कामतेकर यांनी मा.उच्च न्यायालयात जाऊन त्यास स्थगिती मिळवली. २०१३ ते २०१६ या काळात अडीच एफ.एस.आय.च्या माध्यमातून बिल्डींग बांधल्या. मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यानंतर दरम्यानच्या काळात २०१३ पासून २०१६ मध्ये ती घरे बंद पाडली. माझी आपल्याला आग्रहाची व कळकळीची विनंती आहे. आता मा.उच्च न्यायालयाचा स्थगिती आदेश उठलेला आहे. हे सगळे होत असताना सुधारीत बांधकाम प्रकल्पाच्या एकूण इमारती १५८ आहेत. सदनिका ६६३६ आहेत. बांधकाम पूर्ण झालेल्या १०३ इमारती आहेत. ४३२६ सदनिका अजून देण्याचे पेंडींग आहे. ५ इमारती बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळण्यासाठी तयार आहेत. २१० सदनिका तिथे तयार आहेत. आरसीसी बांधकाम पूर्ण झालेल्या, पेंटींग झालेल्या किती इमारती आहेत, असे मी विचारले होते. तर मला सांगितले की, अशा ३१ इमारती तयार आहेत. अजून १३०२ घरे पेंटींग होऊन आपल्या हातात आहेत. आरसीसी बांधकाम झालेल्या किती इमारती तयार आहेत तर अश्या ४ इमारती तयार आहेत असे मला सांगितले होते. १२८ सदनिका तयार आहेत. जर सुधारीत बांधकाम परवानगी मिळाल्यानंतर अजून अडीच एफएसआयचा विषय कोर्टात गेला आहे, तो सुधारीत करुन मिळालातर आपल्याला अजून १५ इमारती, जवळपास ६२० सदनिका वाढवून मिळणार आहेत. मा.आयुक्त साहेब, तुम्ही त्या भागात अजून आला नाहीत. पण तिथे २००७ पासून आजपर्यंतच्या बिल्डींग अर्धवट पडलेल्या आहेत. स्टील अर्धवट पडलेले आहे. ते गंजलेले आहे.

त्याची कपॅसिटी संपलेली आहे. असे असताना पहिला १६००० घरांचा तो प्रकल्प पूर्ण करण्याऐवजी हा विषय आणला आहे. मी या प्रकल्पाचे शंभर टक्के स्वागत करतो. त्या १६००० लोकांच्या कागदपत्रांची पूर्तता झाली आहे तर त्या लोकांना घरे मिळावीत. दोन/तीन वर्षांपासून लोकांकडून पैसे घेतलेले आहेत त्यांना अजून घरांचा ताबा दिलेला नाही. मी माहिती अधिकारच्या माध्यमातून माहिती विचारली होती की, केंद्र शासनाच्या जेएनएनयूआरएम योजनेअंतर्गत पिंपरी चिंचवडमधील आर्थिक दुर्बल घटकांतील लोकांसाठी १३२५० सदनिका बांधायची योजना टाकली. ती ऑक्टोबर २००७ मध्ये या योजनेला मंजूरी दिली. डीपीआर कॉस्टनुसार ७४९.७२ कोटी इतका खर्च येणार होता. ५० टक्के शासन अनुदान, ३० टक्के केंद्र सरकारचे अनुदान व २० टक्के महापालिकेचा स्वहिस्सा होता. असे असताना मी शेवटचा प्रश्न विचारला होता की, या कामाला वेळ का झाला. यात असे लिहिले होते की, प्रशासनाच्या काही चूकांमुळे, प्राधिकरणाच्या काही एनओसी न घेतल्यामुळे या प्रकल्पाची वाट लावायचे काम, ज्यांनी हा प्रकल्प उभा केला त्यांच्या नावाची बदनामी करायचे काम अधिका-यांनी केले आहे. हे सर्व करत असताना काही गोष्टींच्या अटी-शर्तींची पूर्तता करता न आल्यामुळे काहीजण कोर्टात गेले. त्यामुळे चुकीच्या कामाला स्टे मिळाला. त्यातून हे सगळे घडले आहे. जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून त्याठिकाणी घडले आहे. च-होली, चिखली, मोशी,डूडूळवाडी, रावेत, पिंपरी, आकुर्डी इथे घडले आहे. याठिकाणच्या जागा पहिल्या आपल्या ताब्यात आल्या आहेत का. या जागांचा नीट अभ्यास केला आहे का. २००८ ला स्किम बंद पडली. त्यानंतर आपण पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून योजना राबविणार आहोत तर आपण त्या स्किमचा त्यापद्धतीने अभ्यास केला आहे का? त्या जागा ताब्यात आहेत का? त्या जागा ताब्यात असतील तर किती एफ.एस.आय. अलॉट करणार आहोत? आधीच्या योजनेत आम्ही अडीच एफएसआय टाकला आणि त्यानंतर आम्हाला जो त्रास झाला, आपण तसे उद्या करणार आहेत का? साहेब, याची सुद्धा शहानिशा करणे गरजेचे आहे. प्रत्येकाला सोयीचे व्हावे म्हणून आपण काही पैसे घेणार आहेत. त्या घरांत राहणारा जो नागरीक आहे, तो कोणी ऐशआरामात राहणार नागरीक नाही. इथे येणारा माणूस हा मिडल क्लासमधील, सर्वसामान्य घरांतील गरीबातील गरीब माणूस आहे. आपण २००७ पासून २०१७ पर्यंत बघतोय की, त्या नागरीकांची देखील आपण फसवणूक केली आहे. कारण त्यांचे पैसे आपल्याकडे आहेत. म्हणून आपल्याला विनंती आहे की, चिखलीमध्ये आमच्याकडे हा विषय होऊ नये. या विषयात चिखली भाग वगळून हा विषय मंजूर करावा अशी माझी विनंती राहील. पूर्वी ज्या-ज्या चूका झाल्या आहेत, ज्या-ज्या घटना घडलेल्या आहेत. तसे पुढील योजनेत होऊ नये. मा.महापौर साहेब, आपण यात लक्ष घालून काम करावे अशी विनंती करतो. चिखली भागात ही योजना होऊ नये, चिखलीमध्ये अगोदरच एक योजना चालू आहे. म्हणून चिखलीचे नाव वगळून आपण पहिला प्रस्ताव मंजूर केला होता. पुन्हा एकदा चिखली इथे दूसरा कुठला प्रोजेक्ट करायचा असेलतर

तुम्ही करु शकता. एकदा चिखलीकरांनी जागा दिली आहे. चिखलीमध्ये ईडब्ल्यूएस योजना करण्याला माझा शंभर टक्के विरोध असणार आहे. परत दुस-या वेळी आमच्यावर ही योजना लादू नये, अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दूर्बळ घटकांसाठी घरे बांधायचे उद्दीष्ट आहे. त्यामध्ये क्रमनिहाय पाहिलेतर २०१७-२०१८,२०१८-२०१९,२०१९-२०२०,२०२०-२०२१ आणि २०२१-२०२२ या पाच वर्षांत ७२३२६ घरे बांधण्याच्या अनुषंगाने आणि मान्यतेसाठी हा विषय आमच्यासमोर आला आहे. मा.दत्ता साने यांनी त्यांची खंत, त्यांच्या अडचणी बोलून दाखवल्या. ईडब्ल्यूएसच्या आरक्षणावर घरे बांधायचे नियोजन आहे. आपण या विषयात पाहिलेतर रावेतमधील जागा अजून आपल्या ताब्यात आलेली नाही. सरकारी गायरान जमिन जिल्हाधिकारी यांच्याकडून घेण्याची कार्यवाही चालू आहे. दिघी इथली जागा आपल्या ताब्यात नाही. चिखली इथली जागा आपल्या ताब्यात नाही. आकुर्डी इथली जागा मनपाच्या ताब्यात आली आहे. उर्वरित जागांवर एमआयडीसीचा ताबा आहे. अशा पद्धतीने आपण मान्यता घेण्यासाठी घाई करतोय.

वास्तविक पाहता, बीएसयूपीची घरे असतील, ईड्ब्लूएसची घरे असतील, १३००० घरे बांधायचा संकल्प जेएनएनयूआरएम मधून झाला होता. त्यात बीएसयूपी होते, ईडब्ल्यूएस होते, पत्राशेडपण होते. त्यातील काही प्रकरणे अजूनही प्रलंबित आहेत. अजूनही लाभार्थ्यांना लाभ मिळालेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे आत्ता मा.दत्ता साने यांनी उल्लेख केला. एक एफएसआय करताना रद्द झालेली ऑर्डर, पुढील एफएसआय मिळाला तरी प्राधिकरणाकडून अजूनही नकाशा मंजूर करुन मिळाला नाही. त्यामुळे आपल्याला वाटप करता येत नाही. असे घोंगडे भिजत ठेवलेले आहे. मग प्रशासन काय प्रयत्न करतेय. नेमक्या तिथे अडचणी काय आहेत. आपण पहिली जी घरे बांधली आहेत, ती अजूनही देता येत नाहीत. या विषयाच्या अनुषंगाने अनेक प्रश्न उपस्थित होतात. आत्तासुद्धा हा विषय देत असताना याची किंमत, लाभार्थ्यांना लाभ देत असताना महापालिका हिस्सा याकडे पाहिलेतर पूर्वीच्या तुलनेत आत्ता लाभार्थ्यांना अधिक पैसे टाकावे लागत आहेत. आणि त्यांना छोटे घर मिळतेय. ही वस्तुस्थिती असेलीतरी या विषयाला माझा विरोध नाही. परंतू आर्थिकदृष्ट्या दूर्बळ घटकांसाठी ही घरे करतोय. ही घरे वेळेत पूर्ण व्हावीत. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे जो घोटाळा, किंवा ज्या चूका मागे झाल्या आहेत, त्या भविष्यात होऊ नयेत तसे आत्ता मा.दत्ता साने यांनी सांगितले. करताना प्रशासन काम करते. यात भरपूर चूका व उणिवा मागील वाटपात सुद्धा झाल्या आहेत. योजनेची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे हे इथे जे म्हटले आहे. हे सर्वचजण वाचत नाहीत. यातील ६ क्रमांक आहे, यात म्हटले आहे, लाभार्थी कुटुंबामध्ये पति/पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल. या अभियान अंतर्गत केंद्राकडून अनुदान/सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरिता देशातील कोणत्याही भागात लाभार्थी कुटुंबातील व्यक्तीच्या मालकीचे पक्के घर नसावे. हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. अशाच प्रकारेच मागील वेळी जेव्हा ईडब्ल्यूएस स्किम राबवली, बीएसयूपी स्किम राबवली, त्यावेळी सुद्धा लोकांनी ॲफेडेव्हीट दिले होते.

आपले लोक छाननी व्यवस्थित करत नाहीत. त्यावेळी इथे बसलेल्या अनेक मान्यवरांनी टिकाटिप्पणी केली होती. त्यावेळच्या सत्ताधा-यांना बदनाम करायचे काम केले आहे. आत्ताच्या सत्ताधा-यांना बदनाम करण्यात आम्हाला रस नाही. परंतू प्रशासनाकडून ही चूक होऊ नये याची दक्षता आपण घेतली पाहीजे. कारण मागील वेळी ज्या लोकांना घरे दिली त्यांच्याकडून खोटी माहिती संकलित केली गेली. चुकीच्या लोकांना घरे दिली गेली. त्यांनी खोटे ॲफेडेव्हिट दिले आहेत. घर भाड्याने देणे, घर विकणे असा सर्व प्रकार मागील प्रकरणात झाला आहे. असे भविष्यात होऊ नये. या प्रकारात सुद्धा प्रशासनाने कठोर कारवाई करावी. ती लोकं शोधून काढावीत. चुकीच्या पद्धतीने घरे हडपलेली आहेत,त्यांना घराबाहेर काढावे. चुकीच्या पद्धतीने घर भाड्याने दिले आहे, त्या लोकांना दंड असेल,शास्ती असेल, फौजदारी कारवाई असेल ती आपण केली पाहीजे. हे सर्व करणे अपेक्षित आहे. त्यामुळे माझा या विषयाला विरोध नाही. परंतू जी बाकी गावे आहेत. त्या गावांतील जी काही आरक्षणे आपल्या ताब्यात आहेत. काही आरक्षणे पार्टली ताब्यात आहेत, काही शेतक-यांच्या ताब्यात आहेत. जोपर्यंत तुम्हाला शंभर टक्के आरक्षणे ताब्यात येत नाहीत, तोपर्यंत तुम्हाला ही योजना सुद्धा राबविता येणार नाही. तुम्हाला केंद्र सरकारचे, राज्य सरकारचे अनुदान घेता येणार नाही. आमची साधारण धारणा हीच आहे. या योजना व्हाव्यात. आमचा कुठल्याही प्रकारचा विरोध नाही. संपूर्ण योजना होत असताना बीएसयूपी घरांचे वाटप राहीले आहे,कोर्टात प्रकरणे प्रलंबित आहेत, जे प्रकरण प्राधिकरणाच्या अधिका-यांकडून मान्यता मिळत नाही. यासाठी मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, आपण प्रयत्न करावते. पूर्वीच्या लाभार्थ्यांना ती घरे द्यावीत. प्रतिक्षा यादीतील लोकांना सुद्धा न्याय मिळावा. मा.महापौर साहेब, ही जी नवीन योजना करत असताना जे बारकावे सांगितलेले आहेत. आपण त्या गोष्टींचे भूसंपादन युद्धपातळीवर करावे. त्याच पद्धतीने ही योजना कटाक्षाने राबवित असताना प्रशासनाकडून ही चूक होणार नाही याची कृपया आपण सर्वांनी दक्षता घ्यावी. धन्यवाद!

**मा.राहूल कलाटे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पूर्वी या शहरात घरकुल योजना राबविली होती. त्या योजनेत १३५०० पात्र केले होते. त्यानंतर ५५०० लोकांना कॅन्सल केले. चार/पाच दिवस हे लोक लाईनमध्ये थांबत होते. प्रत्येकाने हजारो रुपये खर्च केले. पुढे ही योजना झाली नाही. आपण या ५५०० लोकांचे काय करणार आहोत. घरकुलमध्ये ३७ स्क्वे.मी. चे घर दिले होते. पंतप्रधान आवास योजनेत ३० स्क्वे. मी. इतके घर देतोय. घरकूल योजनेच्या तुलनेत पाहिले तर या योजनेत घराचा एरिया कमी होतो आहे. आपण जेव्हा गोरगरीबांच्या घराचा विचार करतो. आजच्या वर्तमानपत्रात पीएमआरडीए यांची दोन लाख घरे बनवायची योजना आली आहे. कुठेतरी तुमचा आणि त्यांचा समन्वय आहे की नाही. त्या योजनेला सुद्धा पंतप्रधान आवास योजना असेच नाव आहे. गोरगरीबांना परवडणारी घरे आपण देतोय. आपण क्वालिटी कंट्रोल मॅनेजमेंटच्या माध्यमातून २.८५ इतकी फी दिली आहे. आपण पूर्ण प्रोजेक्ट पाहीलातर, फीचा विचार केलातर कन्सल्टंट यांना चांगली फी जाते आहे. आपण सांगितले,३० स्क्वे. मीटरच्या रेशियोने ९४५८ घरे आहेत. याचा कार्पेट एरिया पकडलातर

आपणच हे डॉकेट मांडले आहे. घर देणारे बांधकाम, ३० लाख स्क्वे. फूटाचे बांधकाम होते आहे. यावरुन आपण त्याचा सेलेबल एरिया लक्षात घेतला आहे. ५४५ स्क्वे. फूटाच्या हिशोबाने ९४५८ स्क्वे.फूटाचे घर पाहिलेतर ५१ लाख स्क्वे.फूटाचे टेंडर फ्लोट केले आहे. जर आपण पाहिलेतर आपण व्यवसाय करत असताना ३५ ते ४० टक्के लोडींग करतो. इथे ७० टक्के लोडींग आहे. १.६८७ एवढे लोडींग का दिले गेले. मा.आयुक्त साहेब, मा.महापौर साहेब, आपण यात देखील व्यवस्थितरित्या लक्ष देण्याची गरज दिसते आहे. एक लाख प्रमाणे ९५ कोटी राज्य सरकारचे, दीड लाख प्रमाणे १४२ कोटी केंद्र सरकारचे, आणि ५४५ कोटी योजनेत घर घेणा-या व्यक्ती स्वहिस्सा असे आपण म्हणतोय. आपण प्रत्येकाकडून रु.५.७७ लाख इतके घेतोय. असे असताना आपण प्रोजेक्ट कॉस्ट रु.८८५ कोटी इतकी पकडली. साईड डेव्हलपमेंट यासाठी रु.५० कोटी पकडले असताना यातून प्रत्येक घरावर शंभर ते एकशे सोळा रुपये प्रत्येक घरावर जास्त दिसत आहेत. म्हणजे एकूण कॉस्ट ९३५ कोटी होते आहे. मा.महापालिका सभेसमोर हे डॉकेट ठेवले आहे. या हिशोबाने पाहिलेतर १५३ कोटी इतके महापालिकेचे जात आहेत. हे जात असताना यात कुठल्याही प्रकारचा प्रिमियम नाही. ही जागेची कॉस्ट नाही. आपण च-होलीची घरे पाहिलीतर पाच एकरात १४०० घरे केली. म्हणजे तिथे तुम्ही चार एफ.एस.आय. पकडला आहे. डुडूळगाव इथे दोन एकरांत ८९६ घरे केली आहेत. म्हणजे तिथे तीन एफ.एस.आय. पकडला आहे. आपण या बारीक-बारीक गोष्टींमध्ये लक्ष घालण्याची गरज इथे दिसते आहे.

रु.५,७७,०००/- हा जो लाभार्थ्यांच्या हिस्सा दिसतो आहे,आपण पाहिलेतर दहा वर्षांसाठी ८ टक्के प्रमाणे लोन घेतलेतरी त्यांना सहा ते सात हजार इतका बँकेचा हप्ता येईल. चौदा माळ्याची बिल्डींग बांधली असताना बिल्डींग मेंटेनन्स कॉस्ट आपण विचारात घेतली का नाही. आपण राज्यात फिरत असताना मुंबई सोडलेतर पुण्यात देखील चौदा माळ्यांची बिल्डींग कुठेही नाही. कारण १४ माळ्यांच्या बिल्डींगचा खर्च, त्या बिल्डींगची कॉस्ट, बिल्डींगचा मेंटेनन्स, कन्सल्टंट यांनी इथे रिपोर्ट ठेवला आहे. यात गार्बेज सोडून जनरेटर बॅकअप असे काहीही यात दिसत नाही. यात बारीक-बारीक गोष्टींचा अभ्यास केला, नाही केला हे देखील सभागृहाला कळाले पाहिजे. १४ माळ्यांची एकच बिल्डींग, पौड फाटा इथे कुमार बिल्डर यांनी बांधली आहे. तिथे राहणा-या लोकांचा वाद चालू आहे. पहिला मजलावाला म्हणतो की, मी काही लिफ्ट वापरत नाही. मी मेंटेनन्स कॉस्ट देणार नाही. आजही त्या बिल्डींगचे मेंटेनन्स होत नाही. मग आपण चौदा माळ्यांची बिल्डींग करायचा आग्रह का धरला? कदाचित जागा कमी असेल म्हणून आपण असे ठरवले असेल. सर्व प्लॉट पाहिलेतर प्रत्येक प्लॉटची किंमत ही कन्स्ट्रक्शनपेक्षा जास्त आहे. ही योजना राबवत असताना आपण हा विचार केला का नाही केला, का केवळ लोकांना घरे द्यायची म्हणून टेंडर करायचे. पूर्वी आपल्याकडे घरकूल सारखा प्रकल्प केला आहे. गोरगरीब लोकांना आशेला लावले आहे. आजही हे लोक तुमच्याकडे आशेने पाहत आहेत की, आमची घरे कधी मिळतील. असे असताना आपण नवीन ९४५८ घरे देतोय. तुम्ही त्या बिल्डींगचा डिटेल्ड प्लॅन पाहून देखील सभागृहासमोर, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब

आपण त्याचा अभ्यास केला पाहीजे. १४ माळ्यांची एक बिल्डींग, एका मजल्यावर १६ फ्लॅट, २२४ फ्लॅट होत आहेत. आपण पाहत असालतर एका टू व्हिलरच्या पार्किंगसाठी डी.सी. रूल प्रमाणे ३ स्क्वे.मी. इतकी जागा लागते. म्हणजे २२० फ्लॅटधारकांना ६६० स्क्वे. मी. इतकी जागा लागते. जवळजवळ साडे सात हजार स्क्वे.मी. जागेत फक्त टू व्हिलरचे पार्किंग बसवले आहे. टेम्पो, रिक्शा असतील त्या कुठे लावायच्या. तुम्ही मांडलेल्या डॉकेटमध्ये अशा त्रुटी दिसत आहेत. त्याच्या डिटेल्ड प्लॅनचा अभ्यास सर्वांनी करावा. त्याची कॉपी सर्वांना द्यावी. आपण जागा ताब्यात नसताना एकत्रित टेंडर केले आहे. प्रत्येक जागेचे वेगवेगळे टेंडर का केले नाही. प्रत्येक जागेचे वेगवेगळे टेंडर केले असतेतर सर्वांना पारदर्शकता हवी आहे ती देखील निश्चितच येईल. काही ठिकाणी जागा ताब्यात नाही. काही ठिकाणी पार्टली जागा ताब्यात नाही. तरीदेखील टेंडर काढायची घाई आणि लोकांच्या भावनेचा खेळ असे याठिकाणी दिसतेय.
लोकांनी लाईनीत उभे राहून याचे फॉर्म घेतले आहेत. पुन्हा एकदा लोकांच्या भावनांशी खेळू नये. ही योजना करत असताना घरकुल योजनेसारखी एकत्रित मंजूरीची घाई कुठेही न करता आपण याचा नीट अभ्यास करावा. डिटेल्ड प्लॅन सभागृहासमोर ठेवावा. आपण ही घरे कुणासाठी बांधतोय तर ज्यांना घर घेणे परवडत नाही त्यांच्यासाठी. ज्याची महिन्याची मिळकत २५,०००/- आहे, वार्षिक मिळकत ३ लाख आहे, तो यासाठी पात्र होणार आहे. त्याला रु.५,७७,०००/- चे लोन दिलेतर हे २५,००० तो तुम्हालाच देतोय. त्याचा मेंटेनन्स कॉस्ट काढलातर तो तिथे राहील का ते घर भाड्याने देईल. आणि आहे त्या ठिकाणी परत रहायला जाईल. या सगळ्या बारीक गोष्टींचा आपण विचार करावा. एकंदरीत पाहिलेतर असे वाटते की, ही घाई का, कोणासाठी आणि कशासाठी. टेंडर काढले असेलतर सर्वांनी मिळून त्याचा नीट अभ्यास करावा. त्या-त्या एरीयातील,त्या-त्या बिल्डींगचे टेंडर काढावे. एक गोष्ट याठिकाणी निदर्शनास आणून द्यायला हरकत नाही. असे प्रोजेक्ट अनेक ठिकाणी आहेत. ठाण्यासारख्या ठिकाणी आहे, पुण्यापासून शिरवळ इथे आहे. आपण त्यांच्याशी याबाबत चर्चा केली का, तुम्ही सात माळ्यांची बिल्डींग बांधताय का चौदा माळ्यांची बिल्डींग बांधताय. चौदा माळ्यांची बिल्डींग काढली तर निश्चितच लॅंड कॉस्टपेक्षा तुमची कॉस्ट जास्त होणार आहे. आपण म्हणतो, परवडणारी घरे. लोकांच्या भावनांशी न खेळता आपण व्यवस्थित अभ्यास करुन आम्हाला त्याचा अहवाल द्यावा. धन्यवाद!

**मा.स्वीनल म्हेत्रे -**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, नगरसदस्य मा.दत्ता साने यांनी सांगितले की चिखली वगळून अन्य ठिकाणी हा प्रकल्प राबवावा. घरकूल योजना व पंतप्रधान आवास योजना या दोन योजना पूर्णपणे वेगळ्या आहेत. देशातील कोणताही बेघर नागरीक ज्याचे स्वतःचे घर नाही, ज्याचे नाव डिमाण्ड सर्वेमध्ये आहे. अशा सर्वांना अडीच लाख सबसिडी किंवा शासनाकडून सूट मिळू शकते. इतका चांगला उपक्रम होत असेलतर चिखली भागातही जिथे ही घरे होणार आहेत, आणि माझ्या भागातही गोरगरीबांना ही घरे

मिळावीत. हा उपक्रम चांगला असल्याने मी असे म्हणेन की, चिखली भाग या उपक्रमात ताबडतोब करावा. चिखली वगळून हा उपक्रम होऊ नये.

**मा.वैशाली घोडेकर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, पहिल्यांदा मी महापौरांचे आभार मानते की मला बोलू दिले. मी याठिकाणी हे नमूद करेन की, सभागृहाने यापेक्षाही चांगली योजना या शहरात राबवलेली आहे. ७० टक्के लोकांना घरे दिली आहेत. या योजनेत ३३ स्क्वे.मी.चे घर घरकुल योजनेत दिले होते. त्यावेळी लोकांना ३.७६ लाख भरावे लागले. आत्ता याठिकाणी जे प्रपोजल मांडले आहे, त्यात ३० स्क्वे. मी. जागा आपण लाभार्थ्यांना देत आहोत आणि त्यांना रु.५,७७,०००/- द्यावे लागत आहेत. आपण याठिकाणी या लाभार्थ्यांची फसवणूक करतोय. यापेक्षाही चांगली योजना आपण याआधी केलेली आहे. आत्ता लाभार्थ्यांना माहितच नाही की, आपण जास्त पैसे देतोय. पण कमी स्क्वे.फूटाचे घर इथे घेत आहेत. यात मी एवढेच सांगेन की, आपण एचडीएफचा प्लॉट इथे घेतला आहे. एचडीएफ म्हणजे बेघरांसाठी घरे. ज्या लोकांना पीसीएमसी हद्दीत घरे नाहीत, त्यांना घरे दिली पाहीजेत. परंतू या बेघरांना रु.५.७७ लाखांत घरे देणे परवडेल का, देता येईल का. पिंपरीमधील सर्वे क्र.१०९, ११० हे माझ्या वॉर्डमधील आहेत. त्याठिकाणी आसपास एक/दीड कि.मी.च्या आत ज्या झोपडपट्ट्या आहेत, त्यांचे फोटोपास आहेत. त्यांना त्याठिकाणी डेव्हलप करता येणार नाही. यशवंतनगर ही ओपन स्पेसमध्ये जागा आहे. त्याठिकाणी ती आपल्याला डेव्हलप करता येणार नाही कारण आपला प्लॅन ओपनस्पेसमध्ये पास होणार नाही. त्या सर्व झोपडपट्टीवासियांना घरे देणार होतो. तसे बोलणे सुद्धा झाले होते. परंतु आता याठिकाणी या प्रपोजलमध्ये घेतल्यामुळे त्यांना ५.७७ लाख मध्ये घर देणे योग्य राहील का, किंवा त्यांच्याकडून आपण घेणे योग्य राहील का, किंवा त्यांना ते देता येईल का. एचडीएफ प्लॉट यातून वगळले गेले पाहीजेत. ज्या लोकांचे फोटोपास आहेत. जे लोक झोपडपट्टीत राहतात. परंतू ते त्याठिकाणी डेव्हलपमेंटमध्ये बसू शकत नाहीत. अशा लोकांना एचडीएफमध्ये घर दिली गेली पाहिजेत. त्यासाठीच हे आरक्षण आहे. हे आरक्षण तुमच्या पंतप्रधान आवास योजनेसाठी नाही. त्याच्यामुळे हे एचडीएफचे आरक्षण यातून वगळावी. पिंपरी चिंचवडमध्ये जे खरोखर बेघर आहेत, त्यांना ही घरे फ्री मध्ये द्यावी. जसे अजंठानगर, विठ्ठलनगरचे पुनर्वसन केले असेल. आणखी एक गोष्ट सांगते की, ३० स्क्वे.मी. हे कोणीही मान्य करणार नाही. नाहीतर या योजनेचा फज्जा उडेल. हेच मी याठिकाणी जाहीर करते व थांबते.

**मा.उषा मुंढे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, पंतप्रधान आवास योजना ही गोरगरीब जनतेसाठी असलेली आवास योजना आहे. या योजनेचा पालिकेशी काही संबंध नाही. संपूर्ण पंतप्रधान आवास योजना ही केंद्र सरकारची योजना आहे. सध्या घर घ्यायचे तर ४५०० असा स्क्वे.फूटाचा दर आहे. परंतू पंतप्रधान आवास योजनेत रु.१५००/- असा दर आहे. शहरातील किती लोकांना घरे पाहिजेत, याचा डिमांड सर्वे शासन निकषांप्रमाणे चालू असून

त्याप्रमाणे लोकांकडून फॉर्म भरून घेतले होते. ज्या लोकांकडून फॉर्म भरुन घेतले होते, त्या योजनेसाठी जे पात्र आहेत, अशा लोकांनाच आपण घरे देणार होतो. पंतप्रधान आवास योजनेतून असे फॉर्म भरुन घेतले गेले की, स्वतः नागरीकांनी जाऊन ज्याप्रमाणे आपण आता पालिकेत येताना थम्ब करतो, त्याप्रमाणे स्वतः जाऊन फॉर्म भरुन घेतले होते. पंतप्रधान आवास योजना ही शासनाची योजना आहे. घरकुल योजनेशी याचा काही संबंध नाही. फक्त पंतप्रधान आवास योजनेवरच बोलावे.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,अधिकारी वर्ग व पत्रकार बंधू, खरेतर महापौर साहेब, आज आपण सगळ्यांना बोलू देत आहात. खरेतर मला सभागृहाचे कौतुक करावेसे वाटतेय. अनेकांनी अनेक विषयांवर बोलत असताना कळत न कळत का होईना मागील वीस वर्षांत ज्या चूका केल्या असतील त्या स्वतः मान्य केल्या. ही मानसिकता ऐकून बरे वाटले. मोठेपण नक्की असावे पण चूका करायला मर्यादा पण असायला हव्या होत्या. त्या आम्हाला दिसल्या नाहीत. हरकत नाही. तुम्हाला आमच्याकडून ज्या अपेक्षा आहेत त्या पाहून बरे वाटले. मा.महापौर साहेब, ९५०० घरे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत देतोय. जी नियमावली असते, कोणतीही योजना राबवित असताना ज्या पद्धतीने आपण जायचे असते, ती सगळी पद्धत आपण इथे चांगल्या प्रकारे राबवतोय. यासाठी सन्मा.महापौर असतील, सन्मा.आयुक्त असतील,या सगळ्यांचे मनापासून कौतुक. आत्ता अनेक जण बोलत असताना, घरकुल योजनेचा संदर्भ दिला. त्यात काही चुकीचे नाही. आपण घरकुल योजनेत १३२५० घरे बांधणार होतो. आता ७७२० चं घरे बांधली. काय झाले ते आख्ख्या शहराला काय झाले ते माहित आहे. जागा ताब्यात नसताना. नियम काय सांगतो, कोणतीही योजना राबवित असताना जागेचा शोध झाला पाहिजे. जागा ताब्यात आहे का हे बघितले पाहिजे. ताब्यात असलेल्या जागेचा डिमाण्ड सर्वे झाला पाहिजे. डीमाण्ड सर्वे झाल्यानंतर त्याचा डीपीआर तयार होतो त्यानंतर सँक्शन रिपोर्ट तयार होऊन तो मा.महापालिका सभेपुढे ठराव येणे, नंतर टेंडर प्रोसेस होणे अशी पद्धत असते. जेव्हा घरकुल योजना बांधली तेव्हा मा.महापौर साहेब, दि.२८/०५/२००९ ला घरकुलची जागा ताब्यात आली. परंतू त्याआधीच म्हणजे मा.राहूल कलाटे याकडे तुमचेही लक्ष वेधू इच्छिते की, दि.१०/१०/२००८ लाच त्याचे टेंडर फ्लोट केले होते. तुम्ही चुकून म्हणाला होता की, टेंडर काढले आहे. परंतू अजूनही टेंडर काढलेले नाही. डिमाण्ड सर्वे आत्ता केला. या डिमाण्ड सर्वेमध्ये शहरातील १,०२,७५७ लोकांनी अर्ज भरला आहे. ऑफ लाईन, ऑन लाईन अशी मिळून ही संख्या आहे. शहरात घर घेणे अजिबात सोप्पे राहीलेले नाही. कुठेतरी ४०/४५ लाखाला घर घेणे हे सर्वसामान्य माणसाचे स्वप्नच राहीले आहे. कुठेतरी अशी अवस्था असताना पंतप्रधान आवास योजना याठिकाणी आणली गेली. खरेतर शासनात या योजनेचा जो काही निर्णय होता तो दि.९/१२/२०१५ रोजी सगळ्या महापालिकांना कळविण्यात आला होता. परंतू श्रेयाची लढाई. कितीही म्हटले, काहीही म्हटले तरी ही फॅक्ट आहे, पंतप्रधान आवास योजना ही योजना दोन वर्षांत जाहीर करण्यात आली

नाही. कोणत्याही प्रकारची माहिती घेण्यात आली नाही. कोणत्याही प्रकारचा डिमाण्ड सर्वे करण्यात आला नाही. कारण केंद्र शासनाला याचे श्रेय जाईल, योगदान जाईल, अशा प्रकारची भावना तत्कालिन असणा-या सत्ताधा-यांची होती. त्यामुळे सत्ताबदल झाल्यानंतर अवघ्या चार महिन्यांत ज्याप्रकारे वेगाने कामकाज सुरु केले, त्यासाठी सर्व अधिकारी वर्गाचे त्याचबरोबर काम करणारे जे लोक आहेत, त्यांचे मनापासून इथे कौतुक करते. खरेतर मघाशी बोलत असताना काही जण म्हणाले, ही घरे आमच्या इथे नकोत, हे आरक्षण आमच्या इथे नको. आमच्याइथे, तुमच्याइथे काय विषय आहे. तुम्ही त्या परीसराचे, त्या एरीयाचे प्रतिनिधित्व करता, म्हणजे तुम्ही त्या एरीयाचे मालक होत नाही. प्रत्येक ठिकाणी प्रत्येक नागरीकाला वाटते की, पंतप्रधान आवास योजनेतले घर माझ्यासुद्धा वाट्याला आले पाहिजे. मलाही आठ लाख इतका स्वहिस्सा भरायचा आहे. तेवढ्या कमी किंमतीत त्याला घर मिळाले पाहिजे. मागील सर्व योजनांमध्ये केंद्र शासन, राज्य शासन, महापालिका यांचा हिस्सा व चौथा हिस्सा हा त्या लाभार्थ्याचा असायचा. परंतू या योजनेत कोणत्याही प्रकारे महापालिकेच्या अंगावर किंवा महापालिकेवर कोणतेही बर्डन न आणता आणलेली ही योजना आहे. त्यामुळे पुन्हा एकदा मनापासून या योजनेचे कौतुक वाटते. त्याचबरोबर मघाशी एकजण बोलता बोलता म्हणाले की, आम्ही घर घेतले त्यावेळी काहीजण कोर्टात गेले, काही जणांनी असे केले, तसे केले. सन्मा.महापौर साहेब, मी सभागृहाला सांगतेय की, पुन्हा-पुन्हा जुन्या गोष्टी उगाळायची हौस असेलतर आमचे त्याबद्दल दुमत नाही. त्याठिकाणी प्रशासनालाही दोष देऊन चालणार नाही. त्यावेळचे सत्ताधारी तेवढेच दोषी होते. आमच्याकडे त्याचे रेकॉर्डींग आहे की, त्यावेळी तुम्ही कसे पैसे घेतले, कसे अपात्रचे पात्र झाले, या सगळ्या घडामोडी घडल्या. परंतू त्याचबरोबर ही सूचनाही तितकीच महत्वाची आहे की, यावेळी काम करत असताना पंतप्रधान आवास योजना सक्सेसफूल योजना म्हणून आपल्या सभागृहाच्या माध्यमातून, नगरसेविका नगरसेवकांच्या माध्यमातून चालवली पाहीजे. मघाशी एक माजी महापौर सदस्य म्हणाले की, तुमचे पंतप्रधान. मला वाटते, पंतप्रधान हे कोणाचे एकट्याचे नसतात, संपूर्ण देशाचे पंतप्रधान असतात. त्यामुळे बोलताना भान असले पाहिजे की, आपण सुद्धा सभागृहात एक चांगले पद उपभोगलेले आहे. आणि आपण ज्या देशात राहतो, ते कोणत्याही पक्षाचे असलेतरी त्यांच्यावर बोलायची आपली कोणाचीच खरेच कुवत नाही. आपण इतक्या चांगल्या प्रकारे कोणत्याच पक्षाचे म्हणून बोलत नाही. ज्यांना आख्या जगात एक सन्मान मिळाला. त्यांच्यामुळे आपल्या देशाची प्रतिमा चांगली झाली आहे. देशाची प्रतिमा उंचावणे, देशाचा क्रमांक वर नेण्यासाठी चांगल्या प्रकारचे समाधान त्याठिकाणी मिळाले. मग महापालिका असलीतरी मा.वैशाली घोडेकर यांनी आपला शब्द माघारी घ्यावा. तुमचे पंतप्रधान हा शब्द सभा कामकाजातून काढण्यात यावा, अशी मी मा.महापौर यांना विनंती करते. ही योजना एक एक प्रकारे प्रयत्न करत इथपर्यंत आणली.

अशाच प्रकारे पारदर्शक कारभार आपल्या माध्यमातून झाला पाहिजे अशी मी अपेक्षा व्यक्त करते. व थांबते. धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,याठिकाणी जो अतिशय महत्वाचा विषय, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आपल्या पिंपरी चिंचवड शहरात खूप मोठ्या प्रमाणात राहणारा जो गरीब नागरीक आहे, त्याचे उत्पन्न तीन लाखापेक्षा कमी आहे. अशा नागरीकांना शहरात घरे बांधून द्यायची. त्याअनुषंगाने एक टार्गेट आपल्या महापालिकेला केंद्रशासनाने करुन दिले आहे. आपल्या महापालिकेप्रमाणे इतर शहरांना सुद्धा अशाच पद्धतीने या योजनेअंतर्गत त्या त्या महापालिकेच्या क्षेत्रात राहणा-या नागरीकांना ही घरे द्यायची आहेत. मागील काळात जेएनएयूआरएमच्या अंतर्गत ईडब्ल्यूएसच्या माध्यमातून घरे देण्याचे काम मागील केंद्र सरकारने संपूर्ण देशात करायचा प्रयत्न तिथे केला. त्या प्रयत्नांतून आपल्या शहरात आपण काही प्रमाणात त्याठिकाणी लोकांना घरे देण्यासाठी निश्चितपणे यशस्वी झालो. परंतू अपेक्षित टार्गेट होते ते पूर्ण करता आले नाही त्यामागील काही कारणे मा.दत्ता साने यांनी प्रश्न विचारले. आणि यासंदर्भातील माहिती प्रशासनाकडून मिळवली होती. मागील काळात ज्या त्रुटी राहील्या आहेत, त्या त्रुटी या कामातून निश्चितपणे दूर केल्या पाहीजेत. मागील काळात अडीच एफएसआय गृहीत धरुन त्याचे तिते प्लॅनिंग केले. प्रत्यक्षात तो अडीच एफएसआय नव्हता. त्यामुळे प्रत्यक्षात काम करताना अडचणी निर्माण झाल्या आणि तो प्रोजेक्ट डिले झाला. तो प्रोजेक्ट का डिले झाला त्याची कारणे याठिकाणी आमच्यासमोर प्रशासनाने दिलेली आहेत. त्यात मुख्यतः प्लॅनिंग ऑथोरीटी होते, ते प्राधिकरणाकडून ते हॅंडओव्हर झाल्यामुळे एफएसआय वाढवण्याच्या दृष्टीकोणातून आपल्याला राज्य सरकारकडे प्रयत्न करावे लागले. त्यालाही दिरंगाई झाली. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात अपेक्षित टार्गेट साध्य करता आले नाही. मा.आयुक्त साहेब, या निमित्तने माझी आपल्याला विनंती आहे, जेएनएनयूआरएमच्या योजनेपेक्षा ही योजना वेगळी असलीतरी सभागृहातील सगळ्या नगरसेवकांची विनंती असणार आहे की, कारण शेवटी ज्या लोकांना घरे देणार आहोत, ते लोकं या शहरातील गरीब घरांतले लोक असणार आहेत. अनेक वर्षे त्यांना या योजनेत वेटींग लिस्टला ठेवण्यात आले. योजना पूर्ण न करता आल्यामुळे या लोकांना याच्यापासून वंचित रहावे लागले आहे. मा.आयुक्त साहेब, यात या लोकांचा अंतर्भाव यात कसा करता येईल या दृष्टिकोणातून प्रशासनाने यात टेक्निकली तपासून पहावे. त्याही लोकांना यात प्राधान्य देता आलेतर, तेही यात बसत असतीलतर निश्चितपणे या दृष्टिकोणातून मा.आयुक्त साहेब आपण प्रयत्न केला पाहिजे. बोलताना अनेक जणांकडून काही शब्द गेले असतील. हा श्रेयाचा विषय नाही. अतिशय चांगला विषय आहे. खरेतर केंद्र सरकारने सुद्धा चांगला विषय आणला आहे. मागील केंद्र सरकारने सुद्धा चांगला विषय आणला होता. यात भूमिका एवढीच आहे. आपण सर्व नगरसेवक म्हणून निवडून आलो आहोत. आणि शेवटी आपल्या भागातील मतदारांच्या अपेक्षा आहेत त्या पूर्ण करायचे आपले

काम आहे. निश्चितपणे ज्याची सत्ता आहे त्याला श्रेय मिळत असते. परंतू विरोधी पक्ष म्हणून विरोधकांनी सुद्धा त्यातील जे बारकावे आहेत, ज्या चूका आहेत ते शोधायचे काम केले पाहिजे. परंतू शोधत असताना सत्ताधा-यांनी त्यात नकारात्मक दृष्टिकोणातून न पाहता त्यात सुधारणा कशी करता येईल, आणि एखादी चूक दाखवली म्हणजे आम्ही वेगळे काही करतो अशाप्रकारची भावना सत्ताधा-यांनी सुद्धा ठेवू नये. पुढील काळात एकत्र येऊन आपल्याला काम करायचे आहे. आणि मला वाटते, एकत्र येऊन काम करत असताना निश्चितपणे शहराचा जो चांगला विकास झाला आहे. त्यात अधिकची भर आपल्याला आगामी काळात टाकता येईल.

याठिकाणी मा.राहूल कलाटे यांनी जे मुद्दे मांडले. मा.आयुक्त साहेब, यात एस्टीमेट करताना यात ज्या काही चूका झाल्या आहेत. बरेचवेळा अशा चूका होत असतात. लोडींग फॅक्टर सांगितला आहे तो जवळपास १.७० एवढे लोडींग त्यात होते आहे. म्हणून आपल्याला मुळातच कॉस्टमध्ये तपासणी करायची गरज आहे. त्यासाठी कन्सल्टंट अपॉईंट केले आहेत. हे करत असतानी कुठेतरी भविष्यात कोणीतरी आरोप करणार, भ्रष्टाचार झाला अशी भूमिका मांडणार, कोणीतरी कोर्टात जाईल. भविष्यकाळात याला आळा घालायचा असेलतर मुळात एस्टीमेट करण्यासाठी यात बारीक लक्ष घालावे. मा.आयुक्त साहेब आपण स्वतः व प्रशासनाने यात बारीक लक्ष घातले पाहीजे. नुसतेच कन्सल्टंट यांच्यावर अवलंबून न राहता बारकाईने लक्ष घालून प्रयत्न केले पाहीजेत. जी आरक्षणे ताब्यात आली नाहीत, त्यांच्यावर विचार केला पाहीजे. आरक्षणे ताब्यात येण्याच्या दृष्टीकोणातून आपल्याला प्रयत्न करावे लागतील. मा.आयुक्त साहेब, आगामी काळात टीडीआरच्या मोबदल्यात जागा ताब्यात येण्याचे प्रमाण कमी होत चालले आहे. कारण टीडीआरचे मार्केट कुठेतरी ढासळलेले आहे. त्यामुळे लोकांची मानसिकता आज अशी झाली आहे की ते टीडीआरच्या मोबदल्यात जागा देण्यास तयार नाहीत. यापुढील काळात आपल्याला अशी भूमिका घ्यावी लागेल की, भूसंपादन करुन जागामालकाला पैसे द्यावे लागतील. आपल्या बजेटमध्ये तशी तरतूद करावी लागेल. प्राधान्याने या जागा ताब्यात घेण्यासाठी आपल्याला प्रयत्न करावे लागतील. मा.वैशाली घोडेकर यांनी एचडीएफ बाबत मुद्दे मांडले. त्यांचे म्हणणे आहे की, ही आरक्षणे याबाबतीत वापरू नयेत. त्यांनी मांडलेले मुद्दे तपासून घ्यावेत. मुळात आपले टार्गेट खूप मोठे आहे. आपण एवढे मोठे टार्गेट आपल्या डोळ्यासमोर ठेवले नाही. ते करायचा प्रयत्न आपण या कामात करतोय. दूसरी एक गोष्ट मला निदर्शनास आणून द्यायची आहे की, मा.दत्ता साने यांनी जे मुद्दे मांडले होते. मागील काळात चिखली गावात योजना केली होती. त्यावेळी मा.दत्ता साने यांची भूमिका अशी होती की, आमच्या चिखलीकरांवर कुठेतरी अन्याय होतो आहे. आपण तिथे फिरून पाहिले असेलतर निश्चितपणे त्या परीसरात एकाच ठिकाणी ती घरे दिली गेल्यामुळे काय झालेय की, त्या परिसरातील जागांचा भाव, त्या परीसरात ज्या प्रॉपर्टी आहेत त्यांची व्हॅल्यू फार कमी झाली आहे. हा एकप्रकारे त्या परीसरात जे लोक राहतात, ज्यांच्या ज्यांच्या जागा आहेत, त्यांच्यावर

अन्याय झाला आहे. ही सगळी आरक्षणे पाहिलीतर हा सगळा ग्रामीण भाग आहे हा नंतर पिंपरी चिंचवड शहरात समाविष्ट झाला आहे. या भागातील जी सगळी आरक्षणे आहेत, ती ताब्यात घ्यायची आहेत. त्यामुळे ग्रामीण भागावर कायम अन्याय होत आला आहे. इथे आरक्षण असल्यामुळे इथे प्रकल्प राबवावा लागतो आहे. त्यांच्या सूचनांचा जरूर विचार करावा. ही योजना दूसरीकडे राबवता आलीतर निश्चितपणे तसा विचार झाला पाहीजे. आणि जर तसे होणार नसेलतर त्या भागात अधिकचे बजेट आपण ठेवले पाहीजे. आम्ही प्रत्येक वेळी बोलत असताना हिच मागणी केली आहे. त्या भागातील नगरसेवकांनी देखील हिच मागणी केली आहे. इतर भागांतील नगरसेवकांनी सुद्धा अशीच मागणी केली आहे. कारण सुरुवातीच्या काळात ही गावे ठेवायची का वगळायची यात पाच/सहा वर्षांचा काळ गेला आहे. आणि पुन्हा ही गावे महापालिकेतच ठेवायचा निर्णय झाला. हा विकासाचा बॅकलॉग कुठेतरी भरुन पूर्ण करावा लागेल. विशेषतः दिघी असेल,च-होली असेल,मोशी असेल,डुडूळगाव असेल,तळवडेपर्यंतची गावे आहेत, तिथे अधिकचे बजेट आपल्याला द्यावे लागणार आहे. हे करत असताना एवढ्या मोठ्या प्रमाणात योजना राबवतोय. त्या बाजूला इन्फ्रास्ट्रक्चर द्यायची गरज आहे. पिंपरी चिंचवड शहराचा विचार केलातर लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढतेय. त्यासाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर द्यायला आपण भविष्यकाळात कुठेतरी कमी पडणार आहोत. त्या दृष्टिकोणातून विचार करावा लागेल. या ठिकाणी योजना होणार असेलतर या ठिकाणचा पाणीपुरवठा असेल, ड्रेनेज सिस्टीम असेल, आपल्याला त्या दृष्टिकोणातून तयार रहावे लागणार आहे. पवना धरणातून पाणी येते आहे. आज आपण त्या पवना धरणावर अवलंबून आहोत. आंदरा,भामा-आस्केड मधून लवकरात लवकर पाणी आणण्यासाठी पाऊले उचलली गेली पाहिजेत. आणि मला वाटते, या योजनेसारखेच किंवा किमान त्या पाणीपुरवठ्याच्या योजनेला अधिक महत्व असले पाहीजे. जेणेकरुन आपण चिखली गावात जे पाणी आणणार आहोत, आपण ते पाणी इथे रहायला येणा-या नागरीकांसाठी सुविधा निर्माण करुन देणार आहोत. या दृष्टिकोणातून आगामी काळात जास्त लक्ष देऊन लवकरात लवकर या पिंपरी चिंचवड शहरात हा पाणीपुरवठा सुरळीत व्हावा. पवना धरणातून बंद पाईप योजना आहे, यात आपण लक्ष घालावे. जेणेकरुन पाण्याचे लिकेजेस थांबतील. शहरातील वाढत्या लोकसंख्येला जास्त व चांगले, मुबलक पाणी देता येईल. आपण या दृष्टिकोणातून प्रयत्न केला पाहीजे. हा अतिशय चांगला विषय आहे. परंतू यात ज्या त्रुटी आहेत त्या तपासून घ्याव्यात. मा.आयुक्त साहेब, मुळात याच्या एस्टीमेटमध्ये आपण जावे. मा.राहूल कलाटे यांनी जो मुद्दा मांडला होता, लोडींग बाबतीत आपण यात लक्ष घालावे. यात त्रुटी राहू नयेत. आपण अतिशय चांगल्या पद्धतीने ही योजना राबवावी. भविष्यात विरोध असलातरी नागरीकांच्या दृष्टिकोणातून चांगल्या कामाला आमचा कायम पाठिंबा राहील. याठिकाणी मी भाषण करुन इथे थांबतो.

**मा.सिमा सावळे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,पंतप्रधान आवास योजनेचा आजचा विषय डीपीआर मंजूर करण्याचा आहे. मा.राहूल कलाटे हे स्वतः एक व्यावसायिक असल्यामुळे त्यांनी व्यवसायाचे गणित खूप सुंदर मांडले आहे. आपल्याला अडीच एफएसआय मंजूर आहे. तुमचे काय गणित असेल, पण निश्चितपणे आज आम्ही तुमच्या गणितावर खूप खूष आहोत. परंतू आपण जे शब्द वापरले की, टेंडरींगसाठी विषय आणला का. तर मी त्यासंदर्भात असे सांगेन की, आजचा विषय हा डिपीआर मंजूर करण्याचा आहे. मला तर वाटतेय की, अशा प्रकारचा स्वयंस्पष्ट ठराव, हा सभागृहातील पहिलाच ठराव असेल. मा.योगेश बहल असतील, मा.अजित गव्हाणे असतील, मी तुमच्या सर्वांचे मनापासून अभिनंदन करेन की, एका चांगल्या योजनेला आपण सर्वांनी पाठिंबा दर्शविला. बोलण्याच्या ओघात काही शब्द इकडे-तिकडे होत असतात. शब्द कमी जास्त झाले म्हणून. तुम्ही बोललात, आम्ही बोललो, विषय मिटला, पण या योजनेबद्दलची आत्मियता किंवा शहराबद्दलची आत्मियता याने कमी होणार नाही. हे स्पष्टपणे जाणवले आहे. या शहरात आजपर्यंत ज्या काही योजना झाल्या. मा.दत्ता काका साने असतील, मा.अजित गव्हाणे असतील, मा.योगेशभाई बहल असतील, आमचे मा.राहूल दादा कलाटे असतील, अगदी मोठ्या मनाने सगळ्यांनी चूका कबूल केलेल्या आहेत. आपण जी चूकांची कबूली दिलीत, त्याचे मनमोकळेपणाने स्वागत करते. अशाप्रकारच्या योजनांना जेव्हा मूर्त स्वरुप देण्यासाठी पुढे जाणार आहोत. तुमच्या ज्या काही सगळ्या सूचना असतील त्यांवर अंमलबजावणी झालीच पाहिजे. नव्हे त्यासाठी आम्ही सुद्धा खूप आग्रही असणार आहोत. कारण अशा प्रकारच्या चूका दुरुस्त न करता पुढे गेलोतर त्यासंदर्भात वेगवेगळे आक्षेप किंवा वेगवेगळे वाद निर्माण होऊ शकतात. आणि त्या योजना पुढे जात नाहीत. म्हणून याठिकाणी या सगळ्यांनी ज्या सूचना मांडल्या त्यांचे मी स्वागत करते. आपल्या शहरात पंतप्रधान आवास योजनेचे जवळपास ७२००० घरांचे टार्गेट आहे. पहिला टप्पा ९५०० घरांचा घेतो आहोत. योजना कुठल्या भागात व्हावी कशी व्हावी यासाठी निश्चितपणे काही मतभेद असू शकतात. परंतू त्याठिकाणी सुद्धा मघाशी काकांनी सांगितले की ही योजना चिखली गावात होऊ नये. कारण त्याठिकाणी जागेचे रेट कमी झालेले आहेत. परंतू त्याचबरोबर दुसरीकडे विषय असा आहे की, जो ग्रामिण भाग आहे. तिथे जिथे जिथे आरक्षणे आहेत, तिथेच घरांची योजना करता येण्यासारखे आहे. सन्मा.महापौर, आपल्या वॉर्डमध्ये सुद्धा जवळपास १४०० घरे होणार आहेत. आणि मला वाटते, महापौर खूप खुष आहेत की, माझ्या भागात गरीबांना घरे देणार आहोत. आमची जेव्हा बैठक झाली तेव्हा महापौरांनी त्या विषयाचे स्वागत केले होते. मला असे वाटते की, आपण थोडं मन मोठं ठेवलं, जे आज एवढ्या मोठ्या पैशांत घर घेऊ शकत नाहीत. त्यांची परिस्थिती आमच्यासारखी नाही, त्यांना घरे मिळावीत म्हणून ही योजना आहे. तरीसुद्धा आपल्या योजना स्वागतार्ह असतील, निश्चितपणे बदल घडणार असेल तर त्याचा निश्चित विचार करणार आहोत. ज्या चौदा, पंधरा टक्के जागा

ताब्यात घ्यायच्या आहेत. त्याची सुद्धा कार्यवाही प्रशासनाकडून मोठ्या स्वरुपात चालू आहे. लवकरच त्या जागा ताब्यात घेणार आहोत. यापूर्वी मेंटेनन्सची तरतूद दहा वर्षांकरिता ठेवली होती. परंतू ती पाळली गेली नाही. म्हणून या योजनेत निश्चितपणे पाच वर्षे मेंटेनन्सची तरतूद आहे. ती याठिकाणी पूर्णपणे पाळण्यासाठी याच सभागृहात आम्ही पाच वर्षे असणार आहोत. त्यामुळे निश्चितपणे त्यावर आमचा भर असणार आहे. योजना कशी असावी, काय योजना असावी, त्यात कुठे, कशा टाईल्स वापरणार आहोत, ओट्यासाठी काय वापरणार आहोत. हे सगळे त्या योजनेत स्वयंस्पष्टता भरपूर असणार आहे. मा.महापौर साहेब, मला असे वाटतेय की, मा.नामदेव ढाके यांनी जी उपसूचना दिली. त्या उपसूचनेसह हा विषय मंजूर करावा, अशी मी विनंती करते.

**मा.भाऊसाहेब भोईर**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,मी प्रथम आपल्याला धन्यवाद देतो. आपण मला बोलायला संधी दिलीत. याठिकाणी मा.सिमाताई सावळे यांचे भाषण ऐकल्यानंतर खूप आनंद वाटला. कारण एवढ्या मृदूमध्ये ऐकायची ही पहिलीच अनुभूती मिळाली. मी त्यांना धन्यवाद देतो. कदाचित हा सत्तेचा करिष्मा असेल. कायम असाच स्वभाव असू द्यात. याठिकाणी मा.महापौर साहेब, कोणत्याही केंद्र शासनाच्या किंबहूना राज्याच्या घरकुल विषयासंदर्भात कोणत्याही डायरेक्शन्स नसताना या शहरात पहिली घरकुल योजना प्राचार्य कै.रामकृष्ण मोरे यांनी आणली. भाटनगर असेल, किंबहुना ओटा स्किम प्रकल्प त्या कालखंडात गरीबांसाठी राबविला आहे. घरकुल योजनेसंदर्भात इथे सर्वांनी त्यांचे मतप्रदर्शन केले. याठिकाणी अनेकांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. किंबहुना, उत्तरे देखील दिलीत. मी त्याचा पुर्नउल्लेख याठिकाणी करत नाही. घरकुल योजना करत असताना ज्या त्रुटी आपल्या समोर आल्या. बरेच वेळा याठिकाणी ऐकताना किंवा बोलताना आपण इतिहासात झालेल्या चूकांवर पुन्हा-पुन्हा चर्चा करत असतो. परंतू इतिहासात झालेल्या चुकांची पुनरावृत्ती भविष्यात होऊ नये, झालेल्या चांगल्या गोष्टींचे अनुकरण वर्तमानात व्हावे म्हणून इतिहास वाचायचा असतो. पुन्हा पुन्हा त्याच चूका करुन प्रकल्प अडचणीत आणून नंतर त्याचे परिणाम तुम्हाला आम्हालाच नाहीतर संपूर्ण शहराला भोगावे लागतात. घरे बांधून विकावीत किंवा त्यातून काहीतरी करावे हा महापालिकेच्या घरकूल योजनेचा मुळात उद्देश्यच नाही. आम्ही पूर्वीदेखील असेच सांगितले होते. त्यासाठी हुडको आहे, सिडको आहे, म्हाडा आहे, प्राधिकरण आहे. त्याची वर्गवारी केली, अशा योजना जर त्यांना सुपूर्द केल्यातर, जेव्हा आपण सार्वजनिक कोणती गोष्ट करतो. मग तो व्यवसाय असू द्यात. जेव्हा तो सार्वजनिक होतो, त्या गोष्टीवर, त्या वास्तूवर प्रत्येकाचा बोट ठेवण्याचा अधिकार असतो. मग राजकीयदृष्ट्या निवडणूक आल्या की, आपण त्रुटी शोधून त्यावर शाब्दिक अतिक्रमण करुन तो प्रकल्प बदनाम करायचा प्रयत्न करत असतो. परंतू या सगळ्या गोष्टी सविस्तर, खुलासावार झाल्यानंतर त्याचा साकल्याने विचार करावा. जागा ताब्यात नसताना आज हजार बाराशे कोटी खर्च करावे लागणार आहेत. एस्टीमेट करत

असताना जागा शंभर टक्के ताब्यात आहेत का. यासंदर्भात आपण अभ्यासपूर्ण काम केले पाहिजे. तो प्रकल्प उशीरा चालू होऊ द्यात. त्याची एस्टीमेट कॉस्ट जास्त आहे, बांधकाम कॉस्ट जास्त आहे. जेव्हा भूमिपूजन होते, त्यावेळची जी कॉस्ट असते. त्यानंतर तीन वर्षे चार वर्षे पाच वर्षे प्रकल्प राबल्यानंतर त्याची कॉस्ट किमान २० टक्केने वाढत असते. त्यामुळे हे साडेपाच, साडेसात, मागील वेळी हाच गोंधळ झाला होता. पन्नास हजार वाढवा, साठ हजार वाढवा, सत्तर हजार वाढवा. या गोष्टींना आपण सामोरे जात असतो. म्हणून मला असे वाटते की, या संपूर्ण प्रकल्पासंदर्भात मा.महापौर साहेब आपण स्वतः लक्ष घालावे. जागा ताब्यात घेतल्या आहेत का नाहीत ते पहिले पहावे. मग तो प्रकल्प अर्धवट अवस्थेत रेंगाळल्यानंतर काय परिणाम भोगावे लागतात. मग तो साडेतीनशे, चारशे कोटींचा प्रकल्प किती कोटींवर जातो. आणि मग नंतर आपणच सभागृहात भाषण करणार, त्याठिकाणी एवढे नुकसान झाले होते. म्हणून मी मा.महापौर साहेब आपल्याला विनंती करतो की, जागा ताब्यात आहे का याची पूर्ण शहानिशा केल्यानंतर हा प्रकल्प पूर्ण करावा.

**मा.नामदेव ढाके**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, खरेतर पंतप्रधान आवास योजना याठिकाणी डीपीआरच्या माध्यमातून सभागृहासमोर आणली आहे. मला वाटते आपण जर पिंपरी चिंचवड शहराच्या संदर्भात बोलायचे झालेतर पिंपरी चिंचवड शहर हे औद्योगिक शहर आहे. आणि या शहरात येणारा कामगार वर्ग मोठ्या संख्येने हा सगळ्या महाराष्ट्रातून नव्हेतर देशाच्या कानाकोप-यातून येतो. आज सर्वसामान्य कामगाराला आज इंटर्नशीपची परिस्थिती बघितलीतर कंत्राटी पद्धतीवर किंवा स्मॉल स्केलमध्ये छोट्या छोट्या कारखान्यांमध्ये काम करणा-यांची संख्या या शहरात वाढते आहे. गेल्या दहा पंधरा वर्षांत शहराची लोकसंख्या नागरीकरण मोठ्या प्रमाणात झपाट्याने वाढते आहे. एका बाजूला नागरीकरण वाढते आहे. शहरातील वाढती लोकसंख्या, वाढते नागरीकरण लक्षात घेता याठिकाणी पंतप्रधान आवास योजना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून राबविली जाते आहे. मला वाटते, या योजनेचा ख-या अर्थाने या शहरात या शहराचे वैभव वाढवण्यात या कामगारांचे योगदान मोठे आहे. अशा सर्वसामान्य,कष्टकरी आणि वंचित कामगारांना या योजनेचा लाभ अधिक होणार आहे. म्हणून अनेक सदस्यांनी इथे त्यांचे मत मांडले. घरकुल योजनेसंदर्भात त्याठिकाणी सर्वेक्षण न करता टेंडरींग केले गेले. या योजनेच्या माध्यमातून अनेक त्रुटी राहील्या. अनेक परमिशन असतील, प्राधिकरणाच्या संदर्भातील, पर्यावरणाच्या संदर्भातील असतील, त्यामुळे हा प्रोजेक्ट इथे लांबणीवर गेला. मी त्यासंदर्भात बोलणार नाही. कारण प्रशासन असेल, त्यावेळचे तत्कालिन सत्ताधारी मंडळी असतील, परंतू हा प्रोजेक्ट पिंपरी चिंचवड मधील नागरीकांसाठी एक वेलफार्मिंग व्हावा. या डीपीआरमध्ये अनेक बारीकसारीक गोष्टीबद्दल इथे लिहीले गेले आहे. मला वाटते, दहा/बारा ठिकाणचे भूखंड या प्रकल्पासाठी वापरले जाणार आहेत. दहा ते बारा टक्के जागा ताब्यात घेणे बाकी आहे. मला वाटते की, ज्या

पद्धतीने मागील कालखंडात सर्वेक्षण केले गेले नव्हते. परंतू पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून या योजनेचे सर्वेक्षण केले गेले. शहरात किती लोकांना किती नागरीकांना या संदर्भात घराची आवश्यकता आहे याचे सर्वेक्षण याठिकाणी केले गेले. म्हणून मा.महापौर साहेब, यासंदर्भात ही योजना आहे. आपण आज बघितलेतर पिंपरी चिंचवड शहरामध्ये घराची किंमत बघितली असेलतर रु.८ लाखांमध्ये ५२५ स्क्वे.फूटाचा बिल्डअप एरिया असलेले घर सर्वसामान्य नागरीकांना या योजनेच्या माध्यमातून मिळणार आहे. मी याठिकाणी अभिनंदन करेन की, ही जी काही योजना केंद्र सरकारने आणली आहे. जवळपास २०१५ ला ही योजना आणल्यानंतर मागील दोन वर्षांच्या कालखंडात ही योजना ख-या अर्थाने त्यावेळी सुरु झाली असतीतर आज यासंदर्भातील टेंडरींग झाले असते. परंतू मागील कालखंडात न जाता ही योजना उशीरा का होईना पिंपरी चिंचवडकरांसाठी पंतप्रधान आवास योजना आणली. याचा डिपीआर लवकरता लवकर करुन टेंडरींग करण्यासाठी जागा ताब्यात घेण्यासंदर्भात मा.महापौर साहेब व मा.आयुक्त साहेब आपण यात लक्ष घालावे असे मला वाटते. खरेतर मला वाटते, ज्या ज्या वेळेला घरकुल योजनेसंदर्भात, या किंमतीसंदर्भात किंवा कॉस्ट बजेट याठिकाणी काढले गेले, त्यावेळी या कॉस्टसंदर्भात बरेच व्हेरीफीकेशन आले. सन्मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या योजनेत जे काही टेंडरींग करणार आहोत, लाभार्थ्यांचा स्वहिस्सा याठिकाणी नमूद केला गेला आहे. यात कुठल्याही प्रमाणात बदल होऊ नये. ख-या अर्थाने लोकांनी महापालिकेच्या माध्यमातून, या योजनेच्या माध्यमातून अपेक्षा व्यक्त केली आहे, त्यांचा अपेक्षाभांग या योजनेच्या माध्यमातून होणार नाही. प्रशासनाच्या माध्यमातून, आयुक्तांच्या माध्यमातून त्याचे तंतोतंत पालन केले जाईल असे मला वाटते. खरेतर आम्ही मागील कालखंडाबद्दल बोलायचे म्हटलेतर आपण बघितले असेलतर घरकुल योजनेच्या माध्यमातून, जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून महापालिकेत जो काही फंड आला तो आपल्याला परत करावा लागणार आहे. अशा पद्धतीने येणा-या या योजनेत सुद्धा त्याचा कुठेतरी उल्लेख करुन, केंद्र व राज्य सरकारचा या प्रोजेक्टमधील जो हिस्सा आहे,तो परत जाणार नाही व चांगल्या पद्धतीचे सर्वसामान्य कामगारांना त्यांच्या हक्काचे घर, शहरात राहणा-या नागरीकांनी हे स्वप्न बधितले आहे. त्यांना या योजनेच्या माध्यमातून हे घर मिळाले पाहिजे. मा.महापौर साहेब, मागे जो घरकुलचा प्रोजेक्ट झाला, त्यासंदर्भात आपण बघितले असेलतर आपली कॉस्ट किंवा राज्य सरकार, केंद्र सरकारच्या माध्यमातून मिळालेली जी रक्कम असेल, ती अनेक त्रुटींच्या माध्यमातून लाभार्थ्यांना आपल्याला देता आली नाही. परंतू ज्या लाभार्थ्यांनी लकी-ड्रॉच्या माध्यमातून घरकुल मागितलेले आहे. मला वाटते की, त्या बिचा-यांनी त्या लाभार्थ्यांनी खरेतर आशा व्यक्त केली आहे, आशा ठेवली आहे. कुठेतरी स्वतःच्या आवास योजनेतून घर मिळेल का. नागरीकांनी सुद्धा यासंदर्भात मागणी केली आहे. मला वाटते की, घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना सुद्धा या येणा-या योजनेत समाविष्ट करुन घ्यावे अशी मी विनंती करतो. चांगल्या

पद्धतीने ही योजना लवकरात लवकर या शहरातील लाभार्थ्यांना मिळावी अशी मी विनंती करतो.

**मा.सचिन चिखले**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह,या योजनेत ७२३२६ लोकांना घरे देणार आहोत. प्रथमतः मी या योजनेचे मनःपूर्वक हार्दीक स्वागत करतो. मा.महापौर साहेब, मी आपल्याला एक सूचना देतोय. आपण ज्यावेळी घरकुल योजना केली, घरकुल योजनेचे वाटप होत होते, त्यावेळी सर्व गोरगरीब जनता या योजनेचा लाभ घेत होती. प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या बँकेत फिरत होती. मा.आयुक्त साहेब, मी आपल्याला विनंती करतो की, सगळ्या बँकांना लोन देण्यासाठी अधिकार द्यावेत. तुम्हाला मला एक घटना सांगायची आहे. पंजाब नॅशनल बँकेत अजूनही काही प्रकरणे प्रलंबित आहेत. ज्या घरांतील लोकांना घरे अलॉट केली आहेत. परंतू पंजाब नॅशनल बँक त्यांना लोन देत नाही. माझी आयुक्त साहेबांना नम्र विनंती आहे की, सर्व बँकांना हे अधिकारी देण्यात यावेत. दुसरी गोष्ट म्हणजे आत्ता सर्व नगरसेवकांनी जेएनएनयूआरएम योजनेबाबत सर्व गोष्टी आपल्याला सांगितल्या. घरकुल प्रकल्पाबाबतीत सांगितले. माझी आपणास नम्र विनंती आहे, सेक्टर २२ मध्ये जो प्रकल्प उभा केला गेला, काही कारणास्तव रेडझोनमध्ये आल्यामुळे हा प्रकल्प थांबवला गेला. हा प्रकल्प अर्धवट अवस्थेत आहे. त्यात ७ ते ८ बिल्डींग पूर्णपणे तयार अवस्थेत आहेत. गेले पाच वर्षापासून त्या तयार अवस्थेत पडल्या आहेत. ज्यांना घरे देण्यात आली आहेत. ते घराबाहेर झोपड्या टाकून राहीले आहेत. ते चातक पक्षाप्रमाणे त्या घरांची वाट पाहत आहेत. आपण हा ही प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा. आपण प्रधानमंत्री आवास योजना करत असताना ही योजना कुठेतरी फसणार नाही. या योजनेत कोणतेही संघटना असेल, कोणतेही नगरसेवक असतील, कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेणार नाहीत, पुन्हा कोणी कोर्टात जाणार नाही याची आपण दखल घ्यावी. ७२३२६ लोकांना पूर्णपणे घरे मिळावीत एवढी आशा व्यक्त करतो व थांबतो.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, माझी याठिकाणी आपल्याला विनंती आहे की, या विषयावर भरपूर, साधकबाधक चर्चा झाली आहे. प्रोजेक्ट चांगला व्हावा, चांगल्या पद्धतीने व्हावा असा सर्वांचाच मानस आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, मा.राजन पाटील यांना खुलासा करायला सांगावा. एकतर चौदा मजली इमारत आहे. त्याची कॉस्ट जीएसटी लागून होणार आहे का यात एक्झम्पशन आहे का. कारण आता जीएसटी लागू झाल्यावर आपल्याला कस्टमरकडून १२ टक्के घ्यायचे आहेत. यात आपल्याला सवलत आहे का. माझा दूसरा प्रश्न असा आहे की, आपण इतर बिल्डरकडून काम करताना डेव्हलपमेंट चार्जेस घेतो. यात तसे डेव्हलपमेंट चार्जेस घ्यायचे आहेत का. कॉस्टवाईज हे

इफेक्टीव्ह वाटत नाही. माझ्या या तीन प्रश्नांची उत्तरे दिलीतर मला वाटते काम चांगल्या पद्धतीने करण्यासाठी पुन्हा अडचण होऊ नये म्हणून खुलासा करण्यास सांगावे.

**मा.माई ढोरे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, पंतप्रधान आवास योजनेचा विषय इथे आलेला आहे. मी सभागृहाला नशिबवान समजते. मा.महापौर आपण देखील नशिबवान आहात. पंतप्रधान आवास योजना कशी राबवणार आहोत. घरकुल किती स्क्वे.फूटाचे असणार आहे, जीएसटी असणार आहे का, याबद्दल मी काहीच बोलणार नाही. खरेतर हा पंतप्रधान आवास योजनेतील प्रकल्प आहे. पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी प्रथमच ही स्कीम राबवायचे ठरवले आहे. कारण पंतप्रधान हे अभ्यासू व गरीबीतून मोठे झालेले पंतप्रधान आहेत. म्हणूनच गोरगरीबांचे घर होतच नाही याचा पंतप्रधानांना पुरेपूर अनुभव आलेला आहे. म्हणून ही स्किम राबविण्याकरीता पिंपरी चिंचवड शहरात हा प्रकल्प त्यांनी पाठवला आहे. मा.महापौर साहेब, मी पहिल्यांदात म्हटले की आपण नशिबवान आहात. शहरात जागांचे वेगवेगळे स्पॉट दिले आहेत. या जागांमध्ये आपण हा प्रकल्प राबवणार आहोत. ज्यांना स्वतःचे घर नाही, अशा भाडेकरूंनी इथे अर्ज केला आहे. अर्ज करत असताना माझ्या महिला भगिनींनी स्वतःच्या नावावर अर्ज केला आहे. त्यामध्ये जिला घर मिळत नाही असे कुटूंब कुठल्या पद्धतीचे असते. ते सर्वसामान्य नसून खूप गरीब असतात. तिचा पती कुठल्यातरी वचनात गुंतलेला असतो. ही महिला संसाराकरीता सतत झटत असते. मुलांकरीता कष्ट करीत असते. काम करीत असते. मुलांच्या शिक्षणाकरीता काम करुन त्यांची फी भरत असते. अशा ब-याचशा महिलांनी अर्ज केले आहेत. आणि अशा कुटूंबाला घर देत असताना त्याबद्दल या योजनेचे कौतुक करण्याबरोबर घर किती स्क्वे.फूटांचे आहे. याआधी झोपडपट्टी पूनर्वसन योजनेत जेएनएनयूआरएम योजनेत महापालिकेने जी घरे उभी केली होती. ती उभी करत असताना ते ३७ स्क्वे.फूटाचे घर होते. आता ३० स्क्वे. फूट असणार आहे. यावर बरीच चर्चा झाली आहे. मला त्यात जायचे नाही. परंतू स्वतःचे घर, स्वतःच्या घरात असणारा स्वतःचा हॉल, छोटेसे किचन, बेडरुम, जाण्यायेण्याकरीता जागा, १२ मजली इमारत असल्यामुळे तिथे लिफ्ट आहे. असे स्वप्न पाहणा-या नागरीकांना ९५०० घरे देणार आहोत. त्याचे सर्वेक्षण फॉर्म आपल्याकडे जमा झालेले आहेत. मा.महापौर साहेब, टप्पा १ चे काम लवकरात लवकर पूर्ण करावे. झोपडपट्टीतील लोकांना घरे दिलीत ती प्रकरणे कशी आहेत की झोपडी तिथेच जागेवर आहे. तिथले भाडयाने जातेय. घरकुलमध्ये घर घेतले आहे. त्यातले काही तिथेल राहतात, काहींनी घरे भाड्याने दिली आहेत. परत त्यांनी कुठेतरी झोपडी टाकली आहे. आणि शहराचा विकृतपणा काहीही करुन कमी झालेला नाही. उलट तो कमी झाला पाहीजे. आज वेगवेगळे प्रोजेक्ट राबवितोय, मोठमोठे रस्ते करतोय. बजेट मंजूर करताना अतिशय चांगल्या प्रकारे इथे प्रकल्प उभा करणार आहोत. अशा सुंदर शहरात असे कोणी करत असेलतर ते चूकीचे आहे. चांगल्या गोष्टी करण्याकरीता आपल्याला आयुक्त सुद्धा अतिशय चांगले लाभलेले आहेत. आयुक्तांची मदत घेऊन, आमच्यासारख्यांचे सहकार्य घेऊन, चेअरमन इथे आहेत. लवकरात लवकर हा प्रोजेक्ट अंमलात आणला पाहीजे. जेणेकरुन पुढील वर्षी दुसरा प्रोजेक्ट राबविता येईल. निवडून आल्यानंतर पाच वर्षांची मुदत असते. या ठराविक मुदतीत प्रकल्प राबविला गेला तरच काम केले असे म्हटले जाते. मा.अजित गव्हाणे, मा.राहूल कलाटे हे चांगले बोलले. मा.योगेश बहल

चांगले बोलले. मा.नामदेव ढाके सुद्धा चांगले बोलले. मा.दत्ता साने इथे बोलले आहेत. ख-या अर्थाने हा प्रोजेक्ट शहरात झाला पाहीजे. हिच भावना सगळ्यांची आहे. पंतप्रधान तुमचे आमचे आहेत. भारताचे पंतप्रधान आहेत. नरेंद्र मोदी हे सगळ्यांचे आहेत. घराघरातील व्यक्तीचे सभासदाचे नरेंद्र मोदी हे पंतप्रधान आहेत. म्हणून ही आवास योजना अंमलात आली पाहीजे. हे पंतप्रधानांचे स्वप्न आहे. ते साकार करण्यासाठी पिंपरी चिंचवड शहर सक्षम आहे. नशिबाने इथे आपली सत्ता आहे. आपले महापौर, चेअरमन इथे आहेत. म्हणून मला आनंद होतो आहे की, ज्या महिलांनी त्यांच्या नावाने अर्ज भरले आहेत. काही महिलांना कुठेही घर नाही. स्वतःचे सासू सासरे नाहीत. छोटी मुले घेऊन आपल्या शहरात राहतात. त्यांना तर अत्यानंद झाला आहे. त्या म्हणतात, माई आमची पाच हजार भाडे भरायची पण ऐपत नाही. तरीसुद्धा मुलांच्या शिक्षणाकरीता विद्येच्या माहेरघरात आम्ही राहतो. म्हणून आम्ही रात्रंदिवस काम करतो. धुणीभांडी करतो. अक्षरशः हाताला खड्डे पडले आहेत. अशा महिला शहरात रहात असताना त्यांना पंतप्रधान आवास योजनेतून घर मिळत असेलतर यासारखा आनंद आणि यासारखा आशिर्वाद नाही. शहरात वेगवेगळे प्रकल्प राबवित असताना महापालिकेच्या माध्यमातून वेगवेगळे प्रकल्प आपण राबविणार आहोत. पण त्याचबरोबर पंतप्रधान आवास योजना राबविताना आपल्याला हा देखील मोठा सन्मान मिळणार आहे. मा.आयुक्त साहेब आपण अभ्यासू व हुशार असल्यामुळे व मा.महापौर आपण देखील याठिकाणी महापौर असल्यामुळे तुमच्या कारकीर्दीत असा प्रकल्प राबविताना महिलांच्या दृष्टीने ज्या महिलांनी फॉर्म भरले आहेत, त्याबद्दल मी कळकळीने सांगू इच्छिते की, प्रकल्प राबविताना तो महापालिकेचा व पंतप्रधान आवास योजना म्हणून राबविला जाणार आहे. त्याची क्वालिटी अतिशय सुंदर राहणार आहे. यात कुणीही शंका घ्यायची नाही. ही स्किम राबवित असताना क्वालिटी राहणार आहे. पाटील साहेब ही स्किम राबविणार आहेत. या विषयावर खूप चर्चा झाली आहे. चर्चा करत असताना मी एवढेच सांगू इच्छिते की, मा.महापौर साहेब, पुढील वर्षी पंतप्रधान आवास योजनेचा प्रकल्प राबविण्याकरीता आणि अडीच वर्षांत दूसरा प्रकल्प राबविण्याकरीता आपण तयार व्हायचे आहे. म्हणून या वर्षीचे काम वेळेत पूर्ण करावे अशी अपेक्षा करते. आपण मला बोलायला संधी दिल्याबद्दल मी धन्यवाद मानते.

**मा.एकनाथ पवार**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, दीड दोन तासांपासून सभागृहामध्ये चर्चा चालू आहे. वेगवेगळ्या नेत्यांनी वेगवेगळी मते व्यक्ती केली आहेत. खरेतर एक वाईट अनुभव आपल्या सगळ्यांच्या समोर आहे. ईडब्ल्यूएसच्या माध्यमातून जेएनएनयूआरएम पुर्ननिर्माण योजनेच्या माध्यमातून घरकुल योजनेच्या माध्यमातून १३५०० घरे देऊ असे आठ वर्षापूर्वी म्हटले होते. हा प्रोजेक्ट पहिल्या दिवसापासून वादात सापडला होता. मागच्या सगळ्या नेत्यांनी खरं कबूल केले, मला खूप आनंद वाटला. मा.योगेशभाई बहल यांनी मनापासून सांगितले, यात आमच्या काही चूका झाल्या. मा.दत्ताकाका साने यांनी सांगितले की, आमचे काहीतरी चुकले. चूक कबूल करणे हे सुद्धा खूप मोठे लक्षण आहे. मा.अजित गव्हाणे हे बांधकाम व्यावसायिक असल्यामुळे त्यांना माहित आहे की, कुठला टिडीआर वापरला जातो. काय केले पाहीजे. काय नाही केले पाहीजे. मा.राहूल कलाटे सुद्धा खूप

चांगले बोलले. माझी खरोखर सगळ्यांना विनंती आहे की, हा प्रोजेक्ट पंतप्रधान यांचा प्रोजेक्ट आहे. ज्या पद्धतीने २०२२ पर्यंत ज्या बेघरांना घरे नाहीत, त्यांना घरे दिली पाहीजेत. हा प्रामाणिक प्रयत्न, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील हे घर आहे. मला दुःख एवढ्याच गोष्टीचे वाटते की, या महापालिकेत आमची सत्ता आल्यानंतर या प्रोजेक्टची ख-या अर्थाने सुरुवात झाली. पंतप्रधान यांनी प्रोजेक्ट जाहीर केला, त्या दिवसापासून या प्रोजेक्टचे काम सुरु केले असते तर मला वाटते, आजपर्यंत तो प्रोजेक्ट चालू झाला असता. मला माहित नाही. पंतप्रधानांचे आदरणीय हे इथल्या लोकांना माहित आहे. पंतप्रधान कुठल्या एका पक्षाचे नसतात, ते देशाचे पंतप्रधान असतात. त्यांच्या स्वप्नातील, या देशातील सर्वसामान्य माणसाला घर दिले पाहीजे. ही प्रामाणिक भावना पंतप्रधानांची आहे. श्रीमंत महापालिका म्हणून आपण ऊर बडवून घेतो. टाळ्या वाजवतो. आणी पंतप्रधानांनी एखादा प्रोजेक्ट आणल्यानंतर आपण दूर्लक्ष करतो. हे अत्यंत चुकीचे आहे. जे झाले ते आम्ही विसरून गेलो. आम्ही एखादी गोष्ट कधीच मनात धरुन बसत नाही. परंतू घरकूलमध्ये जो कुटाणा केला गेला. मा.योगेश बहल यांचे मी एवढ्यासाठी अभिनंदन करेन की, घरकुलमध्ये बोगस लाभार्थी आहेत हे त्यांनी कबूल केले. हे खरे आहे. आपण ज्यावेळी १३५०० लोकांना घरे देण्याचे स्वप्न दाखवतो. फक्त ७५०० लोकांना घरे दिली ही शोकांतिका आहे. माझ्या अगोदरच्या सर्व वक्त्यांनी सांगितले की, दुस-या लाभार्थ्यांचे काय करायचे. दत्ताकाका, जर ही योजना नीटपणे पूर्णपणे राबवली गेली असती. तर मला माहित आहे की तो प्रोजेक्ट माझ्या प्रभागात आहे. मला खरोखर आनंद झाला असता. मी मनापासून इथे सांगतो की, हा प्रोजेक्ट पंतप्रधान यांच्या स्वप्नातील प्रोजेक्ट आहे. एखाद्या कामाची सुरुवात जेव्हा एखाद्या गोष्टीने होते, मा.भाऊसाहेब भोईर मी मनापासून सांगतो, २०१९च्या अगोदर हा प्रोजेक्ट शंभर टक्के संपवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. तुम्ही सांगितले की, जागा ताब्यात येईल का नाही, कुठल्या जागेत काय प्रॉब्लेम आहे. तोपर्यंत हा प्रोजेक्ट राबविला गेला नाही पाहिजे. सभागृहाने हे ठरवले पाहिजे की, ज्या ज्या ठिकाणची आरक्षणे शंभर टक्के ताब्यात आहेत, त्याठिकाणी आपण योजना चालू करणार आहोत. ज्याठिकाणी ८० टक्के जागा ताब्यात आहे, तिथे ८० टक्केच करु. १०० टक्यांचा विचार आपण तिथे करणार नाही. मला असे वाटतेय की, कुणीतरी सांगितले की, केंद्रात आहेत, राज्यात आहेत. तुम्ही सरकारची चिंता करु नका. आम्ही जिल्हाधिका-यांना सांगून गायराने ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. नगररचना काय करतेय. पण नगररचनाच्या मागे लावून आरक्षणे लवकर कशी ताब्यात येतील. जवळपास ९५०० घरे देऊन शहरातील घरांचा प्रश्न सुटणार नाही. हे लक्षात ठेवा. वेगवेगळ्या झोपडपट्या आहेत. खरेतर अनेक लाभार्थ्यांना घरकुलच्या माध्यमातून खरे दिली गेली नाहीत. आपल्याला या सगळ्यांना न्याय देण्यासाठी काम करावे लागणार आहे. माझ्याआधी मा.वैशालीताई घोडेकर या चांगल्या बोलल्या. तेव्हा रु.३,७५,०००/- घरकुलसाठी दिले गेले आणि आता रु.५,७७,०००/- दिले जाताहेत. खरेतर

दोन्ही वेगवेगळ्या स्किम आहेत. मला माहित आहे,तुम्ही घरकुलमध्ये काय केले आहे. पण मला घरकुलमध्ये जायचे नाही. कारण दीड लाखाचे घर पाऊणे चार लाखांवर गेले. त्यात आम्ही पडलो नसतो तर अकारण त्याचा बोजा त्या लाभार्थ्यावर पडला असता. अजून सव्वा लाख रुपयाचे बर्डन त्या घरकुलधारकावर केले गेले. एखादी फसवी घोषणा आणायची, त्याचा बोजवारा करायचा. अशा प्रकारची परिस्थिती नाही. आम्ही सभागृहात जे बोलू, तेच काम करु. मी या निमित्ताने एवढेच सांगेन की, ही जी योजना आहे. मा.राहूल कलाटे यांनी सांगितले, टेंडर झाले आहे. अजून टेंडरला ३/४ महिन्यांचा कालावधी शंभर टक्के लागणार आहे. महापालिका सभेत विषय मंजूर झाल्यानंतर टेंडर निघतेय. एवढे आपण पुढील काळात मनापासून ठरवले तरी या निमित्ताने सभागृहात एक दीड तास चर्चा केली. मी मा.महापौर साहेबांना विनंती करतो की, हा विषय मंजूर करुन पुढील विषय घेण्यात यावा.

**मा.महापौर** – हा विषय मंजूर करण्यात येत आहे. संबधित अधिका-यांनी खुलासा करावा.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, मा.नामदेव ढाके यांनी जी उपसूचना मांडली आहे, ती स्विकारली आहे. या उपसूचनेसह हा विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.महापौर** – उपसूचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**मा.राजन पाटील (सह शहर अभियंता,स्थापत्य)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, मा.योगेश बहल यांनी आत्ता जे दोन प्रश्न विचारले होते, त्यात यात डेव्हलपमेंट चार्जेस इन्क्लूड केले आहेत का. तर विषयपत्रातच नमूद केले आहे की, या योजनेसाठी मनपाने डेव्हलपमेंट चार्जेस माफ केले आहेत. आणि जीएसटीचा जो मुद्दा आहे, महापालिकेने सध्याचे जे अंदाजपत्रक केले आहे. त्यात सध्याची जी करप्रणाली आहे. पीडब्ल्यूडीच्या डीएसआरप्रमाणे केले आहे. पीडब्ल्यूडी ज्याप्रमाणे चेंजेस करेल, जे सर्क्युलर काढेल, त्याप्रमाणे त्यात इकॉर्पोरेट करुन त्यावेळची परिस्थिती बघून त्यात बदल केले जातील.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, रु.१५१८/- जे तुम्ही सांगितले आहेत. कॉस्टींगचा जो विषय तुम्ही सांगितला आहे. ते इफेक्टीव्ह नाही. त्यामुळे त्यात गोंधळ होईल. म्हणून तुम्ही ते परत एकदा करा. नाहीतर पुन्हा प्रॉब्लेम होईल. तुम्ही १४ मधील रु.१५१८/- कॉस्ट काढली आहे. आत्ता मा.राहूल कलाटे आणि मा.अजित गव्हाणे यांनी पार्किंगचा जो विषय काढला आहे. या दोन गोष्टी तुम्ही चेक करा.

**मा.राजन पाटील (सह शहर अभियंता,स्थापत्य)**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, आम्ही पार्कींग चेक केले आहे. बांधकाम परवानगी विभागाकडून अभिप्राय घेतला आहे. यामध्ये फोर व्हिलर पार्किंग अपेक्षित नाही. फक्त टू व्हिलर पार्किंग अपेक्षित आहे. पार्किंगमध्ये काहीही अडचण येणार नाही. घरकुल योजनेत जे नॉर्मस् आहेत तेच या योजनेत घेतले आहेत. आपण म्हणताय त्याप्रमाणे परत एकदा चेक करतो.

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा. सभागृह, कॉस्ट व मेंटेनन्सचे पुन्हा एकदा बघा. धन्यवाद.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ३९ विषय क्रमांक – ४
दिनांक – २०/६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/BSUPप्र/१९२/२०१७, दि.१९/०५/२०१७
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.८ दि.२३/०५/२०१७

केंद्रशासनाने नागरी भागाकरिता प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने सामिल होणेबाबत महाराष्ट्र शासनाचे दि.०९/१२/२०१५ चे शासन निर्णयानुसार दि.०३/०२/२०१६ चे पत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे आणि त्या अनुषंगाने योजनेचे बारकावे समजून घेणेसाठी शासनामार्फत दि.२१/०४/२०१६ व दि.१७/०५/२०१६ रोजी मुंबई येथील सह्याद्री अतिथिगृहात याविषयी परिसंवाद आयोजित केला होता. त्यामध्ये महानगरपालिके मार्फत मा.आयुक्त, मा.सह. आयुक्त, मा.सह शहर अभियंता BSUP, मा.सहा. आयुक्त झोनिपु, कार्यकारी अभियंता BSUP हे सहभागी झाले होते व त्यासंबंधी प्रस्ताव सादर करणेसाठी शासनाचे मा.श्री. निर्मलकुमार देशमुख, राज्य अभियान संचालक यांनी दि.०३/०२/२०१६ तसेच दि.१३/०४/२०१६ च्या पत्रामार्फत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस प्रधानमंत्री आवास योजना “सर्वांकरिता घरे २०२२”मध्ये योजना तयार करणे संदर्भात व शहरी गरीब लाभार्थी निश्चित करणे संदर्भात कळविले आहे. तसेच शासनाने म्हाडाची राज्यस्तरीय सुकाणू अभिकरण समिती म्हणून नेमणूक केली असून त्यांनी दि.०१/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेचा आराखडा DPR(Detailed Project Report) तयार करुन प्रस्तावाच्या छाननी करिता मुख्य अधिकारी पुणे गृहनिर्माण क्षेत्र व क्षेत्र विकास मंडळाच्या कार्यालयाकडे सादर करणेविषयी तसेच दि.१५/०६/२०१६ चे पत्रान्वये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मागणी सर्व्हेक्षण बाबतचा अहवाल देणेबाबत कळविले आहे.

**या योजनेतील ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-**

१) सदर योजनेमध्ये केंद्रशासनाचे प्रत्येक घरासाठी र.रु.१.५ लक्ष व राज्य शासनाचे र.रु.१ लक्ष इतके अनुदान आहे व उर्वरित र.रु ५.७७ लाख हिस्सा लाभार्थी यांचा असणार आहे.

२) सदर योजनेमध्ये ३० चौ.मी. चटई क्षेत्रापर्यंतची घरकुले अनुज्ञेय आहेत.

३) या योजनेसाठी शहरातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या नागरिकांचे अर्ज मागवावयाचे आहेत. ज्या व्यक्तीचे उत्पन्न वार्षिक र.रु.३ लाख आहे तोच लाभार्थी पात्र ठरणार आहे.

४) लाभार्थी भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.

५) सदर योजनेतील घरे हे कुटुंबातील कर्त्या महिलेच्या किंवा कुटुंबातील कर्ता पुरुष व महिला यांच्या संयुक्त नावावर असतील आणि कर्ती महिला सदस्य नसेल तर या ठिकाणी कर्ता पुरुष यांच्या नावे घर राहिल.

६) लाभार्थी कुटुंबामध्ये पति / पत्नी व अविवाहित मुले यांचा समावेश असेल. या अभियान अंतर्गत केंद्राकडून अनुदान / सहाय्य प्राप्त करुन घेण्याकरिता देशातील कोणत्याही भागात लाभार्थी कुटुंबातील व्यक्तीच्या मालकीचे पक्के घर नसावे.

७) अभियान अंतर्गत बांधण्यात येणा-या घरांची सहकारी संस्था स्थापन करणेत येईल.

८) या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांची पात्रता प्रधानमंत्री आवास योजना, “सर्वांसाठी घरे” – नागरी च्या मार्गदर्शक सूचना नुसार राहील.

सदरची योजना केंद्रशासनाची असून योजनेस केंद्र व राज्य शासनाने सदर योजनेस आर्थिक मदत दर्शविली आहे. त्याअनुषंगाने सदर योजना नागरी स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयाद्वारे लागू केली असून त्यामुळे सदर योजनेमध्ये महानगरपालिकेने भाग घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार EWS(Economically Weaker Section) च्या आरक्षित जागांवर घरकूल प्रकल्प राबविणेकरिता DPR बनविणेकामी त्या जागेचा सविस्तर सर्व्हे करणे, इमारत बांधकाम नकाशे तयार करणे, मुलभूत सुविधा (Infrastructure) नियोजन करणे, बांधकाम खर्चाचे अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पाकरिता पर्यावरण नाहरकत दाखला, शासकीय तसेच निमशासकीय संस्थाकडील नाहरकत प्रमाणपत्रे सादर करणे, प्रकल्पाच्या बांधकामास परवानगी घेणे, निविदा तयार करणे, DPR बनवून तो शासनाकडे सादर करणे, तसेच त्यास केंद्र व राज्य शासनाची मंजुरी तसेच अनुदान मिळविणेकामी वेळोवेळी पाठपुरावा करणे व इतर तदनुषंगिक वास्तुविशारद व अभियांत्रिकीविषयक सल्ला इत्यादी आवश्यक कामे करणेकामी सदर क्षेत्रातील अनुभवी वास्तुविशारद व अभियांत्रिकी सल्लागार संस्थेची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत EWS योजनेच्या घरे बांधणेचे काम करणेसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. इनग्रेन आर्किटेक्ट अँण्ड अर्बन प्लानर यांची नेमणूक केली आहे व त्यांचेमार्फत DPR बनविणेचे काम सुरु आहे.

सध्या महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) घरे या आरक्षणांतर्गत पुढीलप्रमाणे जागा ताब्यात आलेल्या आहेत.

**तक्ता अ**

| अक्र | गावाचे नाव | आरक्षण क्र. | स.नं./गट नं. | जागेचे एकुण क्षेत्र हे. | मनपाच्या ताब्यात आलेले क्षेत्र | होऊ शकणारी संभाव्य घरे | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **EWS आरक्षणे** | | | | | | | |
| १ | च-होली | २/८३ | स.नं.४०८पै, ४०९पै | २.१५ | २.१५ | १४४२ | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. |
| २ | रावेत | ४/१०२ | ९६ पै | १.४६ | ० | १०८० | **सरकारी गायरान जमीन** मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेणेची कार्यवाही चालू आहे. |
| | | DPR ला मान्यता मिळालेनंतर जागा रु १/-प्रति चौ मी दराने PMAY करीता मनपास ताब्यात मिळेल {शासन निर्णय क्रमांक जमीन -२०१६/प्र क्र .२१३/ज -१ दि १९ सप्टेंबर २०१६ नुसार ) | | | | | |
| ३ | डुडुळगांव | १/२३३ | १०५पै, १०७ पै, १०८ पै ते ११२ पै | २.०० | १.६५ | ८९६ | ८२.५०% जागा ताब्यात आली असून उर्वरित १७.५०% जागेपैकी ८ गुंठे जागा खाजगी मालकीची असून ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे व उर्वरित क्षेत्र नाल्याचे आहे |
| ४ | दिघी | २/१२७ | ६६ पै | १.१४ | ० | ८४० | **सरकारी गायरान जमीन** मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेणेची कार्यवाही चालू आहे |
| | | DPR ला मान्यता मिळालेनंतर जागा रु १/-प्रति चौ मी दराने PMAY करीता मनपास ताब्यात मिळेल {शासन निर्णय क्रमांक जमीन -२०१६/प्र क्र .२१३/ज -१ दि १९ सप्टेंबर २०१६ नुसार ) | | | | | |
| ५ | बो-हाडेवाडी | १/१६२ | १२८५, १२८७, १२९० | २.०० | १.७२ | १४०० | ८६% जागा ताब्यात आली असून उर्वरित १४% जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे. |
| ६ | वडमुखवाडी | २/३१ | २०१पै ते २०५ पै | २.०० | १.२५ | १४०० | ६२.५०% जागा ताब्यात आली असून उर्वरित ३७.५०% जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | आहे. |
| ७ | चिखली | १/९० | १६५३ पै | २.०० | ० | १४०० | **सरकारी गायरान जमीन** मा.जिल्हाधिकारी यांचेकडून ताब्यात घेणेची कार्यवाही चालू आहे. |
| | | DPR ला मान्यता मिळालेनंतर जागा रु १/-प्रति चौ मी दराने PMAY करीता मनपास ताब्यात मिळेल {शासन निर्णय क्रमांक जमीन -२०१६/प्र क्र .२१३/ज -१ दि १९ सप्टेंबर २०१६ नुसार ) | | | | | |

| **HDH आरक्षणे** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पिंपरी | ७७ | १०९पै, | ०.६४ | ०.६४ | ३०० | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. |
| ९ | पिंपरी | ७९ | ११०पै | ०.४४ | ०.४४ | २०० | मनपाच्या पुर्णपणे ताब्यात आली आहे. |
| १० | आकुर्डी | २८३ | | १.७८ | ०.९५ | ५०० | मनपाच्या अखत्यारितील क्षेत्र ताब्यात आले असून उर्वरित क्षेत्र MIDC च्या ताब्यात आहे. |
| **एकुण** | | | | | | **९४५८** | |

जसजशा जागा ताब्यात येतील तश्या निविदा काढणेत येतील.सदर जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत २.५ F.S.I. अपेक्षित धरुन घरकुले बांधणेचे नियोजन खालीलप्रमाणे केलेले आहे.

**तक्ता ब**

| **अ. क्र .** | **आरक्षणाचे ठिकाण** | **संभाव्य घरांची संख्या** |
|---|---|---|
| १ | च-होली | १४४२ |
| २ | रावेत | १०८० |
| ३ | डुडुळगांव | ८९६ |
| ४ | दिघी | ८४० |
| ५ | बो-हाडेवाडी | १४०० |
| ६ | वडमुखवाडी | १४०० |
| ७ | चिखली | १४०० |
| ८ | पिंपरी | ३०० |

| | | |
|---|---|---|
| ९ | पिंपरी | २०० |
| १० | आकुर्डी | ५०० |
| | **एकुण** | **९४५८घरे** |

अ.क्र. ८ ते १० मधील जागांवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शासनाकडून लवकरच मंजुरी मिळणार असल्याने सदर जागांवर सुद्धा घरे बंधने बाबत नियोजन करणेत येत आहे.

**प्रकल्पातील इमारतींविषयी ठळक वैशिष्ट्ये**

(१) इमारत पार्किंग + १४ मजली (तळ मजला पुर्णपणे पार्किंगसाठी राखीव). इमारतीभोवती पुरेशी मोकळी जागा

(२) दोन लिफ्ट - १.४८ X २.१० मी. (५' X ७')

(३) एक स्ट्रेचर लिफ्ट ३.३६ X १.९९ मी. (११' X ६.६')

(४) दोन जिने (रुंदी १.५० मी.), जिन्या मध्ये कोटा फरशी.

(५) सामाईक पॅसेज (रुंदी १.३५ मी.), Vitrified tiles सुरक्षिततेच्या दृष्टीने १.२ मीटर ऊंचीची पडदी (Parapet) Oil Paint सह.

(६) इमारतीला बाहेरुन Texture Paintव आतून Oil Bound Distemper

(७) नियमानुसार आवश्यक ती अग्निशमन व्यवस्था (Fire Fighting).

(८) जमिनीखाली व इमारतीवर आवश्यक क्षमतेच्या पाण्याच्या टाक्या.

(९) प्रत्येक इमारतीस सोलर हिटर सुविधा.

(१०) इमारतीचे Aluminum Form Work च्या सहाय्याने एकसंध RCC बांधकाम ( Monolithic Construction).

(११) पार्किंगमध्ये Trimix पध्दतीचे Flooring.प्रत्येक इमारतीच्या पार्किंगमध्ये स्वच्छतागृहासह सोसायटी ऑफीस.

(१२) प्रत्येक मजल्यावर १६ सदनिका, प्रत्येक सदनिकेला पुरेसा उजेड, हवेशीर अशी व्यवस्था.

(१३) इमारतींचा देखभाल - दुरुस्तीचा कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ३ वर्षे व लिफ्ट ची देखभाल दुरुस्तीचा कालावधी ५ वर्षे राहील.

(१४) मलशुध्दीकरण केंद्राचा देखभाल दुरुस्तीचे कालावधी सदर योजनेच्या ठेकेदारामार्फत ५ वर्षाचा राहील.

**इमारतीतील सदनिकेची ठळक वैशिष्ट्ये**

१) केंद्र शासनाच्या नियमानुसार एका सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (Carpet Area) ३०

चौ.मी.३२२ चौ.फुट

२) बैठकीची खोली (Hall)– ३.०६ X ३.२ मी. (१०'- १ X १०' – ६'')

३) स्वयंपाक गृह (Kitchen)– २.४९ X १.९८ मी. (८’X ६’ – ६’’)

४) शयनगृह (Bedroom)– २.७४ X ३.२० मी. (९’X १०’ – ६’’)

५) स्नानगृह (Bathroom)- १.५२ X १.२० मी. (५’X ४’)Wash basin सह, स्नानगृहामध्ये Antiskid ceramic tileflooring,४ फुट उंचीचा Glazed Tileमध्ये Dadoव Oil Paint.

६) शौचालय (W.C.)– १.२० X ०.९१ मी. (४’X ३’)ओरीसा पध्दतीचे W.C. पॅन, सिरॅमिक टाईल फ्लोरींगव ४ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dadoव ४ फुटाच्या वरील भागास Oil Paint.

७) माळा (Loft)स्वयंपाकगृहामध्ये– ०.६ मी. (२’) रुंदी व ०.७५ मी. (२’ ६’’) उंचीचा.

८) मुख्य दरवाजा व बेडरुम चा दरवाजा - PUF Material मध्ये.

९) स्नानगृह व संडास चा दरवाजा - PVC Material मध्ये.

१०) खिडक्या - Aluminum Slidingव लोखंडी Grill सह.

११) विद्युत तारा– Casingपट्टीमध्ये, PowerPoint, Switches - Anchor कंपनीचे / तत्सम.

१२) Kitchen Otta – Kadappa Platformमध्ये Stainless Steel sink, Platform वर २ फुट उंचीचा Glazed Tile मध्ये Dado.

१३) सदनिकेमध्ये आतील भिंतींना सर्वत्र Oil Bound Distemper.

अशा पध्दतीची इमारतीची व सदनिकेची वैशिष्ट्ये राहतील.

प्रत्येक प्रकल्पासाठी येणारा खर्च (Infra खर्च वगळता) खालीलप्रमाणे:-

**तक्ता क**

| गावाचे नाव | आरक्षण क्र. | होऊ शकणारी संभाव्य घरे | संभाव्य खर्च र.रु. |
|---|---|---|---|
| च-होली | २/८३ | १४४२ | १,१९,३१,७५,६९०.०० |
| रावेत | ४/१०२ | १०८० | ८९,३६,४०,६००.०० |
| डुडुळगांव | १/२३३ | ८९६ | ७४,१३,९०,७२०.०० |
| दिघी | २/१२७ | ८४० | ६९,५०,५३,८००.०० |
| बो-हाडेवाडी | १/१६२ | १४०० | १,१५,८४,२३,०००.०० |
| वडमुखवाडी | २/३१ | १४०० | १,१५,८४,२३,०००.०० |
| चिखली | १/९० | १४०० | १,१५,८४,२३,०००.०० |
| पिंपरी | ७७ | ३०० | २४,८२,३३,५००.०० |
| पिंपरी | ७९ | २०० | १६,५४,८९,०००.०० |
| आकुर्डी | २८३ | ५०० | ४१,३७,२२,५००.०० |
| | | **खर्च र.रु.** | **७,८२,५९,७४,८१०.००** |

म्हणजेच प्रत्येक सदनिकेला येणारा खर्च हा र.रु.८,२७,४४६/- इतका आहे. यामध्ये प्रकल्पासाठी लागणा-या जागेची किंमत, विकास शुल्क, प्रिमिअम शुल्क इत्यादींचा समावेश नाही. इमारतीच्या बांधकाम क्षेत्राप्रमाणे प्रत्येक सदनिकेचा Construction Built up Area हा ५४५ चौ.फुट आहे. म्हणजेच प्रति चौ.फुट बांधकामाचा खर्च र.रु.१५१८/- इतका येत आहे.

सदर प्रकल्पासाठी महानगरपालिकेने टाकावयाच्या हिश्याऐवजी प्रकल्पास निशुल्क जागा उपलब्ध करुन देणार आहे. तसेच प्रकल्पासाठी लागणा-या सध्याच्या रेडीरेकनर नुसार जागेची किंमत, बांधकाम परवानगीचे विकास शुल्क, प्रिमिअमची शुल्क इत्यादी महानगरपालिका लाभार्थ्यांकडून घेणार नाही. त्या आधारे महानरपालिका अप्रत्यक्षरित्यापुढील तक्ता ड नुसार लाभार्थ्यांना मदत करणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेमधील प्रकल्पांचे DPR हे राज्य शासनाच्या SLSMC (State Level Sanctioning & Monitoring Committee) समोर Scrutiny व Approval साठी सादर केले जाणार आहे. त्यामध्ये DPR Cost मधील DPR Cost व सदनिका खर्चामध्ये बदल होऊ शकते. त्यामुळे लाभार्थ्यांचा हिस्सा हा SLSMC कमिटी मध्ये जो निश्चित करुन दिला जाईल त्यानुसार राहील.

प्रत्येक सदनिकेसाठी रु.१.५ लाख केंद्रशासन, रु.१ लाख राज्य शासन व उर्वरित हिस्सा लाभार्थ्यांकडून घेणेचे नियोजन आहे. प्रकल्पाच्या Infra Work,प्रकल्प भाववाढ व प्रकल्पासाठी अनुषंगिक खर्च ही रक्कम महानगरपालिका स्वतः मनपा फंडातून खर्च करेल.

**तक्ता ड**

| अ.क्र. | गावाचे नाव | आरक्षण क्र. | होऊ शकणारी संभाव्य घरे | क्षेत्र (हेक्टर) | प्रशमन शुल्कर.रु. कोटी | सध्याचे रेडी रेकनर नुसार संपादित जमिनीची किंमतर.रु. कोटी | एकुणमनपा हिस्सा र.रु. कोटी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | च-होली | २/८३ | १४४२ | २.१५ | ११.५८ | १४.५७ | २६.१५ |
| २ | रावेत | ४/१०२ | १०८० | १.४६ | ११.८८ | ०.०० | ११.८८ |
| ३ | डुडुळगांव | १/२३३ | ८९६ | २.०० | १०.६८ | ८.१६ | १८.८४ |
| ४ | दिघी | २/१२७ | ८४० | १.१४ | ६.३७ | ०.०० | ६.३७ |
| ५ | बो-हाडेवाडी | १/१६२ | १४०० | २.०० | ११.७३ | १३.०० | २४.७३ |
| ६ | वडमुखवाडी | २/३१ | १४०० | २.०० | ११.०२ | ७.६८ | १८.७ |
| ७ | चिखली | १/९० | १४०० | २.०० | १२.१४ | ०.०० | १२.१४ |
| ८ | पिंपरी | ७७ | ३०० | ०.६४ | ३.९७ | ५.९७ | ९.९४ |
| ९ | पिंपरी | ७९ | २०० | ०.४४ | २.८२ | ४.१० | ६.९२ |
| १० | आकुर्डी | २८३ | ५०० | १.७८ | ७.९८ | ७.३६ | १५.३४ |
| **एकुण खर्च र.रु. कोटी** | | | | | **९०.१७** | **६०.८४** | **१५१.०१** |

प्रत्यक्ष प्रकल्पाचे काम करताना केंद्रशासन, राज्यशासन व लाभार्थी यांचेकडून हिस्सा घेऊन काम करणेत येईल. परंतू प्रकल्प पूर्ण होणेसाठी येणारा प्रत्यक्ष खर्च, शासन व लाभार्थी एकुण हिस्सा यामधील फरक व प्रकल्पाचे बांधकाम परवानगीचे छाननी शुल्क, विकास शुल्क, प्रशमन शुल्क, अधिमुल्य यांची रक्कम महानगरपालिकेचा हिस्सा म्हणून गृहित धरणेत येईल.त्यामुळे सदर प्रकल्पासाठी बांधकाम परवानगीचे सर्व शुल्क माफ करणेचे प्रस्तावित आहे.

SLSMC (State Level Sanctioning & Monitoring Committee)निश्चित केलेला लाभार्थी यांचा स्वहिस्सा पुढीलप्रमाणे जमा करणेत येईल. त्यामध्ये सोडतीमध्ये (Lucky Draw)नाव आल्यानंतर पहिला हप्ता २०%रक्कम, दुसरा हप्ता ४०% रक्कम हा इमारतीचे काम ५०% झाल्यानंतर व तिसरा हप्ता ४०% रकमेचा भरणा ताबा मिळण्यापूर्वी मनपाकडे करणे आवश्यक आहे. सदरची सदनिका मनपा मार्फत बांधून लाभार्थ्यांना त्यांचा हिस्सा भरुन घेतलेनंतर ९९ वर्षाच्या Lease ने देणेत येतील. लाभार्थ्यांना मिळकत कर, वीज बिलइ. बिले स्वतः भरावी लागतील. प्रत्येक इमारतीची सोसायटी स्वतंत्र करणेत येईल व सोसायटीमार्फत सामाईक वीज बिल, सामाईक पाणी बिलभरावे लागेल.

महानगरपालिका ज्याप्रमाणे मनपा क्षेत्रामध्ये सार्वजनिक ठिकाणी रस्ते, पाणीपुरवठा, दिवा बत्ती, ड्रेनेज, मलशुध्दीकरण केंद्र (STP), घनकचरा व्यवस्थापन (Solid Waste Management)इत्यादी मुलभूत सुविधा (Infrastructure) स्वखर्चाने करते त्याप्रमाणे या प्रकल्पातही महानगरपालिकेने स्वखर्चाने करावे असे वाटते. या सुविधा MPCB पर्यावरण खात्याच्या नियमानुसार करणे आवश्यक आहे. त्या मुलभूत सुविधांचा खर्च खालीलप्रमाणे :-

**तक्ता इ**

| अक्र | ठिकाणाचे नाव | सीमाभिंत | रस्ते | पावसाळी गटर व Rain water harvesting | पा.पु. | ड्रेनेज | मलशुध्दी करण केंद्र (STP) | घनकचरा व्यवस्थापन S.W.M | दिवाबत्ती ट्रान्सफॉर्मर फिडर इ. | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **सर्व आकडे लक्ष मध्ये** | | | | | | | | | | |
| १ | च-होली | २७.९२ | २३२.८६ | ९३.८८ | १२.६१ | ४३.३२ | १५१.१५ | १. | २३३.४७ | ७९६.२१ |
| २ | रावेत | २०.९१ | १७४.४ | ७०.३२ | ९.४४ | ३२.४४ | ११३.२१ | ०.७५ | १७४.८६ | ५९६.३३ |
| ३ | डुडुळगांव | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ४ | दिघी | ९.५५ | ६५. | २८.३ | ७.५ | २७. | ६५. | ०.५५ | १२५. | ३२७.९ |
| ५ | बो-हाडेवाडी | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ६ | वडमुखवाडी | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ७ | चिखली | १७.३५ | १४४.६९ | ५८.३३ | ७.८४ | २६.९२ | ९३.९२ | ०.६२ | १४५.०७ | ४९४.७४ |
| ८ | पिंपरी | ७.५ | १०. | १२. ५० | ५.५ | २२. | ३५. | ०.४५ | ०.३५ | ८०.८ |
| ९ | पिंपरी | ५.५ | ८. | ९.२५ | ४.५ | १८. | ३०. | ०.४ | ०.३ | ७५.९५ |
| १० | आकुर्डी | २३.१२ | १२५. | ७८.३२ | १३.५ | ३६.२३ | ११९. | ०.७८ | १८२. | ५७७.९५ |
| **एकुण** | | | | | | | | | **र.रु.लक्ष** | **४४३४.१** |

एकंदरीत वरील सर्व ठिकाणी मुलभूत सुविधा (Infrastructure) पुरविणेकामी रु.४४३४. १० लक्ष इतका खर्च येईल. सदर प्रकल्पातील इमारतींचे काम सुरु झालेनंतर मुलभूत सुविधा (Infrastructure) करिता निविदा काढण्यात येतील.

सदर प्रकल्पासाठी खालील बाबींची मंजूरी आवश्यक आहे.

१) प्रस्तावास प्रशासकीय मान्यता

२) बांधकाम परवानगी

३) पर्यावरण खात्याकडील नाहरकत दाखला (Environmental Clearance Certificate)

४) राज्य शासनाच्या "कैंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती"(CSMC)ची मान्यता

प्रशासकीय मान्यतेनंतर बांधकाम परवानगी साठी व पर्यावरण व ईतर दाखल्यासाठी अर्ज दाखल करणेत येईल. प्रस्तावास मनपाची मान्यता मिळालेनंतर सदर योजना म्हाडा मार्फत राज्य शासनाच्या "कैंद्रीय मान्यता व संनियंत्रण समिती"(CSMC)ची मान्यता घेवून प्रकल्पाच्या इमारतीच्या बांधकामांच्या सर्व निविदा काढणेत येतील.

**पंतप्रधान आवास योजनेकरिता** प्रशासकीय मान्यतेकरिता खर्चाचा तपशिल

खालीलप्रमाणे :-

**तक्ता ई**

| अ.क्र. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा एकुण खर्च | ७,८२,५९,७४,८१० |
| २ | ५% Contingencies सह | ८,२१,७२,७३,५५१ |
| ३ | २% Work charges establishment Charges सह | ८,३८,१६,१९,०२२ |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | ४६,९५,५८,४८९ |
| **एकुण (३ + ४)** | | ८,८५,११,७७,५१० |
| **Say एकुणरु.** | | **८८५.१२कोटी** |

महानगरपालिकेमार्फत मुलभूत सुविधा पुरविणे (Infra) कामांचा खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

**तक्ता –फ**

| अ.क्र. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचा एकुण खर्च | ४४,३४,१०,००० |
| २ | ५% Contingencies | ४६,५५,८०,५०० |
| ३ | २% Work charges establishment | ४७,४८,९२,११० |
| ४ | ६% भाववाढ (Escalation) | २,६६,०४,६०० |
| **एकुण (३ + ४)** | | **५०,१४,९६,७१०** |
| | | |
| **Say एकुणरु.** | | **५०. १५कोटी** |

**तक्ता - ई** नुसार केंद्र शासन, राज्य शासन व मनपा यांचे संयुक्त निधी मधून पंतप्रधान आवास योजने अंतर्गत ९४५८ सदनिका बांधणेकामी **र.रु.८८५.१२कोटी**चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे व सदर प्रकल्पाचे साईटवर मुलभूत सुविधा मनपामार्फत पुरविणेकामी **तक्ता – फ** नुसार येणा-या **र.रु.५०.१५ कोटी** चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचे तर्फ केंद्रशासन, राज्यशासन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका यांचे संयुक्त विदयमानाने स्वारगेट-पुणे ते पिंपरी पर्यंत मेट्रोचे काम सुरु होत आहे. त्या अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये पिंपरी ते दापोडी कोरोडोर (१) येथे स्ट्रीट लाईटचे पोल मधे येत असून ते काढून दुसऱ्या ठिकाणी शिफ्ट करावे लागणार आहे त्या करीता र.रु.३,६१,००,०००/- इतका खर्च येणार असून प्रस्तुतचे काम निविदा काढून करणेत येत आहे. प्रस्तुतची रक्कम र.रु.३,६१,००,०००/- महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन महानगरपालिकेस देणार आहे. सबब प्रस्तुतची रक्कम जमा करुन घेणे करिता सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकात भाग-२ भांडवली जमा मध्ये "महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचे कडून जमा" स्वतंत्र निधी निर्माण करुन र.रु.३,६१,००,०००/- जमा दर्शवणेत यावे व त्यातुन खर्च करण्यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे तसेच लेखाशिर्षकावर यापुढे महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचेकडून जमा करणेस व खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २०/६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.उदयान/३/कावि/३५३/२०१७ दि.१७/०४/२०१७

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.३१ दि.१९/०५/२०१७

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 व सुधारित नियम 2009 सह शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्र.शहव 1004/प्र.क. 137/नवि-20 दिनांक 24 नोव्हेंबर 2005, शासन अधिसूचना नगरविकास विभाग क्र.टीपीबी 4395/45/प्र.क्र.22/भाग-4/95 नवि-11 दिनांक 31 नोव्हेंबर-1996 अन्वये प्रकरण दोन 3 (1) नुसार वृक्षाधिकरणाची स्थापना करणे आवश्यक आहे.

महापालिकेची सन-2017 मध्ये सार्वत्रिक निवडणुक झालेली असुन नव्याने वृक्षप्राधिकरणाची रचना/ स्थापना उक्त अधिनियम प्रकरण 2 कलम 3 (1) अन्वये नव्याने वृक्षप्राधिकरण गठीत करणे आवश्यक आहे.

सदर अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (1) अन्वये नागरीक्षेत्रात हा अधिनियम अमलात आणल्यानंतर शक्य तितक्या लवकर नागरी स्थानिक प्राधिकरण आपल्या सदस्यामधून ते प्राधिकरण ठरवील अशारितीने व अशा मुदतीत नेमणेत आलेल्या, (अध्यक्ष व इतर यांसह) कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 व्यक्तीचे मिळून बनलेले वृक्षप्राधिकरण गठीत करील. सदर अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (2) अन्वये वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष हे मा.महापालिका आयुक्त हे असतील.सदर अधिनियमातील प्रकरण 3 कलम 5 (1) अन्वये आपल्या एका किंवा अधिक अधिका-यांची या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी वृक्षअधिकारी म्हणुन नेमणूक करील. व हा अधिकारी सहाय्य्क नगरपालिका आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा असणार नाही.

सदर अधिनियमातील प्रकरण 3 कलम 5 (1) अन्वये मुख्य उदयान अधिक्षक यांना वृक्षअधिकारी म्हणुन नेमणूक करणेस व अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (2) अन्वये वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष मा.आयुक्त असतात.व त्याच्यासह कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 सदस्य मिळून वृक्षप्राधिकरणाची रचना केली जाते. त्यासाठी महापालिका सदस्यांमधून अध्यक्षांसह कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 सदस्य संख्या असलेली समिती गठीत करावयाची आहे. तरी वृक्षअधिकारी व वृक्षप्राधिकरण सदस्यांची नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.माधुरी कुलकर्णी** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समिती सदस्यपदी १३ पालिका सदस्यांची नियुक्ती करणेत येत आहे.

मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खुलासा करण्याआधी जी नावे आहेत ती वाचून दाखवतो - १)मा.नवनाथ दत्तू जगताप २) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे ३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव ४) मा.कामठे तुषार गजानन ५) मा.तुषार रघुनाथ हिंगे ६) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश ७) मा.शाम गणपतराव लांडे ८) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर ९) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे १०) मा.बारसे प्रियांका प्रविण ११) मा.वसंत प्रभाकर बोराटे १२) मा.साधना अंकुश मळेकर आणि १३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर.

**मा.नामदेव ढाके** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.शितल शिंदे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - मा. वृक्षप्राधिकरण समितीची स्थापना करावयाची आहे त्यानुसार अधिनियमातील प्रकरण ३ कलम ५ (१) अन्वये

मुख्य उदयान अधिक्षक यांना वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करणे असा विषय आहे. उदयान आणि वृक्षसंवर्धन दोन विभाग असल्यामुळे ती स्वतंत्र करण्यात यावे व मा.मुख्य उदयान अधिक्षक यांचेकडे उदयान विभागाचे कामकाज असल्यामुळे व त्यांना अतिरिक्त वृक्षसंवर्धनाच्या कामामुळे जास्त वेळ देता येत नसल्यामुळे आपल्या महापालिकेमध्ये उदयान अधिक्षक (वृक्ष) यांना वृक्षअधिकारी पदाची जबाबदारी देऊन मनपा मधील वृक्ष संवर्धनाचे काम चांगल्या प्रकारे करुन घेता येईल.

तरी मा.वृक्षप्राधिकरण समितीची स्थापना करुन व वृक्षाधिकारी या पदासाठी उदयान अधिक्षक या पदाचे अधिकारी यांची पदोन्नती करुन त्यांना वृक्षाधिकारी पदावर नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी. ठराव कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.राहूल जाधव** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, उपसूचना दिली त्याबद्दल दुमत नाही. अशी तरतूद आहे का. उपसूचनेद्वारे अधिकारी नेमता येतो का याचा खुलासा झाला पाहीजे. माझ्या माहितीप्रमाणे वृक्ष अधिकारी बोलले. असा अधिकारी उपसूचनेद्वारे नेमता येतो का. सभागृहातून असा अधिकारी नेमता येतो का हे आम्हाला कळाले पाहीजे. मा.आयुक्त साहेब आपण खुलासा करावा.

**मा.महापौर** – याबाबत प्रशासन काय करायचे ते ठरवेल.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, असे नसते. हे सभागृह आहे. प्रशासन नंतर कसे काय ठरवेल. त्यांनी ती उपसूचना पूर्ण वाचली नव्हती. मला असे वाटले की, वृक्षप्राधिकरण समितीची लिस्ट त्यांच्या हातात आहे. पक्षनेत्यांनी उपसूचना मांडली. मग यांनी कशी वाचली म्हणून शंका आली. असे होत नाही. हे सभागृह आहे.

**मा.महापौर** – विषय वृक्षप्राधिकरणाचा आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, विषय कसाही असू दयात. पण अधिकारी नेमता येतो का कळले गेले पाहीजे. अशा चुकीच्या उपसूचना देऊ नका.

**मा.महापौर** – प्रशासनाने खुलासा दयावा. प्रशासनाने यावर योग्य ती कार्यवाही करावी. योग्य नसेलतर तो विषय फेटाळला जाईल.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, नाही असे चालणार नाही. नाहीतर आम्ही मतदानाची मागणी करु.

**मा.महापौर** – मी काय म्हटले हे तुम्ही ऐकले नाही का. हा विषय योग्य नसेलतर फेटाळला जाईल.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, आम्ही याबाबत खुलासाच करायला सांगितले आहे.

**मा.महापौर** – मी काय सांगितलेय, खुलासा करु द्यात. तो विषय योग्य नसेलतर फेटाळला जाईल. विषय कायदेशीर नसेलतर फेटाळून टाकू.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.शितल शिंदे यांनी उपसूचना मांडली आहे. सन्मा.मंगलाताई कदम यांनी यास आक्षेप घेतला आहे. मला हेच विचारायचे आहे की, दोन पदे करत असताना तो क्लास वन अधिकारी आहे का. ती जबाबदारी क्लास वनची आहे का क्लास टूची आहे. क्लास वन का क्लास टू आहे याचा खुलासा करावा.

**मा.राहूल कलाटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, मा.एकनाथ पवार यांनी जी नावे वाचली यात आमचे एक नाव आहे. त्यांनी ते कोणाला विचारुन घेतले. मी तुम्हाला साहेबांचे पत्र सुद्धा दिले आहे. आमच्या पक्षाचा निर्णय पण तुम्हीच घेणार. हे काय चालले आहे आमच्या पक्षाचे निर्णय पण तुम्हीच घ्यायचे.

**मा.एकनाथ पवार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, खरेतर मा.शितल शिंदे यांनी किंवा मी उपसूचना मांडली. मा.शितल शिंदे यांची उपसूचना कायदेशीर नसेलतर प्रशासन शंभर टक्के त्याच्यावर कार्यवाही करणार नाही. त्याची चिंता नका करु. माझे मित्र मा.राहूल कलाटे यांनी सांगितले की, शिवसेनेची नावे कशी द्यायची. या समितीत पक्षीय बलाबलाचा संबंधच नाही. इतकेच नाहीतर पुढील विषयात सुद्धा नाही. आपण एवढाच प्रयत्न केला की, एखाद्या समितीत चांगले काम करण्यासाठी सर्व पक्षांचे सर्व सन्माननीय असेल पाहीजेत. त्या सदस्यत्वाचा मान राखला पाहीजे. तुमची इच्छा, तुमच्या पक्षाचे मला माहित नाही. मला वाटले, शिवसेनेचा एखादा सदस्या या समितीत असला पाहीजे. राष्ट्रवादीचे असले पाहीजेत, काँग्रेसचे असले पाहीजेत. मनसे यांना कुठेतरी दुसरीकडे संधी मिळेल. विनाकारण नाही त्या गोष्टीचे आपण राजकारण केले नाही पाहीजे. ज्या गोष्टी गटनेत्यांना विचारून करायच्या असतील त्या शंभर टक्के गटनेत्यांना विचारून केल्या जातील. पण या महासभेला त्या त्या विषयाचे निश्चितपणे अधिकार आहेत. ते ते अधिकार वापरून ही महासभा शंभर टक्के निर्णय देते.

**मा.राहूल कलाटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, गटनेत्यांना काय अधिकार आहेत हे सुद्धा यांनी सांगावे. नगरसचिव यांना विचारा, कायदा सल्लागार यांना विचारा.

**मा.महापौर** – आपण प्रथम अभिप्राय घेऊ त्यानंतर या विषयावर बोलू.

**मा.अति.आयुक्त**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, उपस्थित सर्व पत्रकार मित्र आणि या शहरातील सर्व प्रतिष्ठित नागरीक बंधू आणि भगिनींनो, विषयपटलावरील आजचा वि.क्र.५ हा वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करण्याचा विषय आहे. या विषयाच्या शेवटी आपण जी प्रस्तावना दिलेली आहे. ती मी थोडक्यात वाचून दाखवतो. (प्रस्तावना वाचून दाखवली) आज आपल्यासमोर जो विषय आला आहे, तो वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करायचा विषय आहे. त्यात किमान सदस्यसंख्या ५ असली पाहीजे. आणि जास्तीत जास्त सदस्यसंख्या १५ असली पाहीजे. हा अधिकारी सन्मा.सभागृहाला आहे. ही संख्या किती ठरवायची आणि संख्या ठरवून यात कोण सन्मा.सदस्य आणि वृक्षांवर प्रेम करणारे नागरीक अशांतून सदस्य घेण्याची तरतूद आहे. मा.मंगलाताई कदम यांनी जो प्रश्न विचारला होता, त्याबद्दल शेवटच्या पॅरॅग्राफमध्ये प्रस्तावना दिली आहे. यात म्हटले आहे, सदर अधिनियमातील प्रकरण ३ कलम ५ (१) अन्वये, उद्यान अधिक्षक यांना वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करणे अधिनियमातील प्रकरण ३ कलम २ अन्वये प्राधिकरणाचे अध्यक्ष मा.आयुक्त असतात. त्यांच्यासह कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ सदस्य मिळून वृक्षप्राधिकरणाची रचना केली जाते. त्यासाठी महापालिका सदस्यांमधून अध्यक्षांसह कमीत कमी ५ व जास्तीत जास्त १५ सदस्य संख्या असलेली समिती गठीत करायची आहे. तरी वृक्ष अधिकारी व वृक्ष प्राधिकरण सदस्यांची नेमणूक करण्यास मान्यता देण्याबाबत विचारविनिमय करणे. आपण असे म्हटले होते की उपसूचनेद्वारे करता येईल. पण विषयपटलावर हा विषय आहे की वृक्ष प्राधिकरण अधिका-यांची नेमणूक करण्याबाबत. आत्ता जो कायदा आहे, महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण, जतन अधिनियम १९७५, यामध्ये वृक्ष अधिका-याची नेमणूक करणे हे कलम ५ दिले आहे. यात कोणत्याही नागरी क्षेत्रात हा अधिनियम अंमलात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर संबंधित स्थानिक नागरी प्राधिकरण पोट कलम २ ला अधिन राहून एका किंवा अधिक अधिका-याची वृक्ष अधिकारी म्हणून अधिनियमाच्या परीचलनासाठी वृक्षअधिकारी म्हणून नेमणूक करील. बृहन्मुंबई वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात घ्यावयाचा कोणताही अधिकारी हा प्रभाग अधिका-याहून कमी दर्जाचा असणार नाही. बाकी महापालिका क्षेत्रांत सहा.आयुक्तापेक्षा कमी दर्जाचा असणार नाही. मुंबई महापालिकेसाठी म्हटले आहे हा अधिकारी प्रभाग अधिका-याहून कमी दर्जाचा असणार नाही. बाकी महापालिका म्हटले आहे तो सहा.आयुक्तापेक्षा कमी दर्जाचा असणार नाही. सन्मा.सभागृहाने ठरवावे कोणाची नेमणूक करावयाची आहे.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह,उपसूचनेत नाव वाचलेले आहे का. नाही. मग यात कुठल्याही अधिका-याचा अपमान होऊ नये. म्हणजे कुठले तरी नाव दिले गेले पाहीजे. अधिकारी घेण्याबद्दल आमचे दुमत नाही. शंभर टक्के कामाचे

बायफरकेशन झालेतरच शंभर टक्के चांगले काम होते. पण त्यांनी ज्या अधिका-याचे नाव टाकले आहे,तो अधिकारी त्यात बसतो का हे सुद्धा आपण बघितले पाहिजे. अन्यथा त्या अधिका-याचा पण अपमान आहे की नाव दिल्यानंतर कॉलिफीकेशन नाही म्हणून त्याचे नाव निघणार का हे सुद्धा बघितले गेले पाहीजे. कारण त्यांनी त्यात सहाय्यक आयुक्त दर्जाचा असे सांगितले आहे. खुलासा झाला त्यात सांगण्यात आले, सहाय्यक आयुक्त दर्जाचा अधिकारी असला पाहिजे. तर तसे नाव दिले आहे का. कुठले नाव दिले आम्हाला नाव कळालेले नाही. आम्ही हेच विचारतोय. तुम्ही म्हणताय उपसूचनेत नाव दिले आहे. या उपसूचनेत त्या अधिका-याचे नाव नाही. हे मिनिटस् मध्ये घ्या नाहीतर आमचे काहीच ऑब्जेक्शन नाही. उलट माझे म्हणणे आहे, आपल्या एखाद्या अधिका-याचा अपमान होता कामा नये. त्या अधिका-याचे नाव टाकून उपसूचना दिली होती का.

**मा.आरती चोंधे-**मा.महापौर साहेब, मा.एकनाथ पवार व मा.शितल शिंदे यांनी मांडलेल्या दोनही उपसूचना स्विकारल्या आहेत. हा विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब, आम्हाला त्या उपसूचनेत अधिका-याचे नाव आहे का नाही ते फक्त सांगा.

**मा.महापौर** – नाव नाही हे त्यांनी उपसूचना वाचतानाच सांगितले होते.

**मा.मंगलाताई कदम**-मा.महापौर साहेब, मिनिटस् मध्ये हे घ्या की, त्या उपसूचनेत अधिका-याचे नाव नाही म्हणून. आमचा विषयाला विरोध नाही. अधिका-याचा अपमान होता कामा नये. ज्या पद्धतीचा अधिकारी तिथे पाहिजे, तसा अधिकारी शंभर टक्के घ्या.

**मा.महापौर** – नाव न घेता हा विषय मंजूर करण्यात येत आहे. त्यानंतर प्रशासन योग्य ती काय कार्यवाही करायची ते ठरवेल.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक – ४० | विषय क्रमांक – ५ |
| दिनांक – २०/६/२०१७ | विभाग – मा.आयुक्त |

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील क्र.उदयान/३/कावि/३५३/२०१७ दि.१७/०४/२०१७

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.३१ दि.१९/०५/२०१७

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 व सुधारित नियम 2009 सह शासन परिपत्रक नगरविकास विभाग क्र.शहव 1004/प्र.क. 137/नवि-20 दिनांक 24 नोव्हेंबर 2005, शासन अधिसूचना नगरविकास विभाग क्र.टीपीबी 4395/45/प्र.क्र.22/भाग-4/95

नवि-11 दिनांक 31 नोव्हेंबर-1996 अन्वये प्रकरण दोन 3 (1) नुसार वृक्षाधिकरणाची स्थापना करणे आवश्यक आहे.

महापालिकेची सन-2017 मध्ये सार्वत्रिक निवडणुक झालेली असुन नव्याने वृक्षप्राधिकरणाची रचना/ स्थापना उक्त अधिनियम प्रकरण 2 कलम 3 (1) अन्वये नव्याने वृक्षप्राधिकरण गठीत करणे आवश्यक आहे.

सदर अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (1) अन्वये नागरीक्षेत्रात हा अधिनियम अमलात आणल्यानंतर शक्य तितक्या लवकर नागरी स्थानिक प्राधिकरण आपल्या सदस्यामधून ते प्राधिकरण ठरवील अशारितीने व अशा मुदतीत नेमणेत आलेल्या, (अध्यक्ष व इतर यांसह) कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 व्यक्तीचे मिळून बनलेले वृक्षप्राधिकरण गठीत करील. सदर अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (2) अन्वये वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष हे मा.महापालिका आयुक्त हे असतील.सदर अधिनियमातील प्रकरण 3 कलम 5 (1) अन्वये आपल्या एका किंवा अधिक अधिका-यांची या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी वृक्षअधिकारी म्हणुन नेमणूक करील. व हा अधिकारी सहाय्य्क नगरपालिका आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा असणार नाही.

सदर अधिनियमातील प्रकरण 3 कलम 5 (1) अन्वये मुख्य उदयान अधिक्षक यांना वृक्षअधिकारी म्हणुन नेमणूक करणेस व अधिनियमातील प्रकरण 2 कलम 3 (2) अन्वये वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष मा.आयुक्त असतात.व त्याच्यासह कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 सदस्य मिळून वृक्षप्राधिकरणाची रचना केली जाते. त्यासाठी महापालिका सदस्यांमधून अध्यक्षांसह कमीत कमी 5 व जास्तीत जास्त 15 सदस्य संख्या असलेली समिती गठीत करावयाची आहे. तरी वृक्षअधिकारी व वृक्षप्राधिकरण सदस्यांची नेमणूक करणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समिती सदस्यपदी खालील पालिका सदस्यांची नियुक्ती करणेत येत आहे. १)मा.नवनाथ दत्तू जगताप २) मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे ३) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव ४) मा.कामठे तुषार गजानन ५) मा.तुषार रघुनाथ हिंगे ६) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश ७) मा.शाम गणपतराव लांडे ८) मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर ९) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे १०) मा.बारसे प्रियांका प्रविण ११) मा.वसंत प्रभाकर बोराटे १२) मा.साधना अंकुश मळेकर १३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर तसेच मा. वृक्षप्राधिकरण समितीची स्थापना करावयाची आहे त्यानुसार अधिनियमातील प्रकरण ३ कलम ५ (१) अन्वये मुख्य उदयान अधिक्षक यांना वृक्ष अधिकारी म्हणून नेमणूक करणे असा विषय आहे. उदयान आणि वृक्षसंवर्धन दोन विभाग असल्यामुळे ती स्वतंत्र करण्यात यावे व मा.मुख्य उदयान अधिक्षक यांचेकडे उदयान विभागाचे कामकाज असल्यामुळे व त्यांना अतिरिक्त वृक्षसंवर्धनाच्या कामामुळे जास्त वेळ देता येत नसल्यामुळे आपल्या महापालिकेमध्ये उदयान अधिक्षक (वृक्ष) यांना वृक्षअधिकारी पदाची जबाबदारी देऊन मनपा मधील वृक्ष संवर्धनाचे काम चांगल्या प्रकारे करुन घेता येईल.

तरी मा.वृक्षप्राधिकरण समितीची स्थापना करुन व वृक्षाधिकारी या पदासाठी उदयान अधिक्षक या पदाचे अधिकारी यांची पदोन्नती करुन त्यांना वृक्षाधिकारी पदावर नेमणूक

करणेस मान्यता देणेत येत आहे. ठराव कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६

दिनांक – २०/६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.नरवि/कावि/१५/१८२/२०१७ दि.३१/०५/२०१७

मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं. १०३/१ब , १०४/१ब, १०४/२ब, १०५, १०६/१ब, १६८/२, १६९/२अ पैकी सुमारे ६९.३३ आर क्षेत्राची जमीन भूसंपादनाने मे. हिंदुस्थान एंटीबायोटिक्स लिमिटेड, पिंपरी यांचे ताब्यात आहे. मे. हिंदुस्थान एंटीबायोटिक्स लिमिटेड कंपनी सध्या तोट्यात चालु असल्याने कंपनीच्या ताब्यातील अतिरिक्त असलेली ६६ एकर जमीन खुल्या बाजारात विक्री करण्यास कंपनीने शासनाकडे परवानगी मागितली होती. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाने दिः- १४/३/२००१ रोजीचे निर्णयाव्दारे कंपनीस ताब्यात दिलेल्या जमिनीपैकी अतिरिक्त ५९एकर जमीन भूसंपादन नियम पुस्तिकेतील परिच्छेद ३२६ मधील तरतुदीनुसार विक्री करण्यास अटी व शर्तीवर आणि मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना योग्य वाटतील अशा इतर अटी शर्तीवर परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जून्या हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस १८९३/१२७६/प्र.क्र.१७४/९३/नवि-१३, दिः- १८/९/१९९५ अन्वये मंजूर असून एच.ए. कंपनीचे ताब्यातील जमिनीपैकी अतिरिक्त ५९ एकर जमीन ही निवासी विभागात समाविष्ट आहे. एच.ए. कंपनीचे उक्त जमीनीमध्ये प्रस्तावित अभिन्यासास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने क्र. बीपी/लेआऊट/पिंपरी/६६/२०१०, दिः- ३१/१२/२०१० अन्वये सूधारित परवानगी मंजूर केली आहे. तसेच कंपनीचे वतीने ला. आ. यांनी दिः- ०४/३/२०१४ अन्वये नव्याने अभिन्यास सुधारित करण्याचा प्रस्ताव दाखल केला असून त्यास अद्याप मनपाची मंजूरी प्राप्त नाही.

पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एच.ए. कंपनीची विषयांकित ५९ एकर जागा स्थित असून वाहतुकीचे / रस्त्यांचे जाळ्याने ( Road Network) देखील सोईस्करपणे जोडली गेलेली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांसाठी शहर स्तरावरील (City Level) सार्वजनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उक्त जागा ही सोईस्कर आहे.

विषयांकित जागा मंजूर विकास योजनेत "बहुउद्येशिय सार्वजनिक मैदान" (Multi – functional Public Ground)म्हणून आरक्षित केल्यास नागरिकांना विविधोपयोगी सोई सुविधांसाठी उदा. प्रदर्शन भरविण्यासाठी, सर्कस, लोक उपक्रमांसाठी, क्रीडा विषयक विविध स्पर्धा / कार्यक्रमांसाठी, सांस्कृतिक / धार्मिक / आध्यात्मिक कार्यक्रमांसाठी, व्याख्यानमाला, विविध कलाविष्कार / संगीत रजनी सारख्या कार्यक्रमांसाठी, विविध राजकीय पक्षांच्या सभांसाठी, शैक्षणिक / सामाजिक / शासकिय – निमशासकीय / राजकीय संस्थांचे विविध उपक्रम / कार्यक्रम / स्नेह संमेलनासाठी, वाहनतळ, हेलीपॅड इ. साठी या जागेचा उपयोग करता येईल. उक्त जागेमध्ये फक्त १० टक्के क्षेत्रात मनपाचे या सुविधेसाठी प्रशासकीय कार्यालय, लोक सभागृह, उपहारगृह, दुकान गाळे, स्वच्छतागृह, गेस्ट हाऊस, स्टाफ क्वॉर्टर्स, अग्निशमन केंद्र, बँक, ए.टी.एम., तातडीचे वैद्यकीय सेवा केंद्र, व्यायामशाळा, वाचनालय इत्यादीसाठी व अशा स्वरुपाच्या अन्य पुरक सोई सुविधांसाठी मा. महापालिका आयुक्त निर्धारित करतील अशा सुसंगत प्रयोजनांसाठी परिसर विकसनाच्या तत्वावर (Place Making Concept) आवश्यक बांधकाम / वापरास परवानगी देऊ शकतील. तथापी या आरक्षणाचे ९० टक्के क्षेत्र कायमस्वरुपी खुले राहण्याचे हेतूने वर नमूद केल्यानुसार विविधोपयोगी सोई सुविधांसाठी मा. महापालिका आयुक्त ठरवतील अशा ठराविक कालावधीसाठी तात्पुरती परवानगी ( Temporary Permission) महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विशेष अटी शर्तीस अधिन देऊ शकतील.

एच.ए. कंपनीच्या ताब्यातील अतिरिक्त ५९ एकर जमीन "बहुउद्देशिय सार्वजनिक मैदान" (Multi functional Public Ground) या प्रयोजनासाठी मागणीचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर करण्यास व त्याकामी येणारा भूसंपादन खर्चास (नविन भूसंपादन कायद्यान्वये अथवा खाजगी वाटाघाटीने) मा. जिल्हाधिकारी, पुणे ठरवतील त्या अटी व शर्तीस अधिन राहुन अदा करण्यास मा. महापालिका सभेची मंजुरी आवश्यक आहे. त्या सोबतच पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेत विषयांकित एच.ए. कंपनीच्या ताब्यातील अतिरिक्त ५९ एकर जमीन "बहुउद्येशिय सार्वजनिक मैदान" ( Multi functional Public Ground) या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहित कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा. महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.माधुरी कुलकर्णी** – मा.महापौर साहेब, सदर विषयाला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** – उपसूचना पूर्ण वाचा. सर्वच उपसूचना व्यवस्थित वाचल्या जातील.

**मा.राहूल जाधव-**मा.महापौर साहेब,मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ३ मधील मोशी शिवाजीवाडी भागातील

नागरीकरण झपाटयाने वाढले आहे. पुणे नाशिक रस्ता (६० मी. पासून) ते शिवाजीवाडी मधील मंजूर विकास योजनेतील २४ मी. रस्त्याला जोडणारा अंतर्गत रस्ता वाहतुकीस अपुरा पडत आहे. पुणे नाशिक रस्त्यापासून कैलास भांबुर्डेकर यांचे गट नं.४२/१ चे मिळकतीपासून गट नं. ४४ व ४५ मधील शिवक्लासिक इमारती समोरुन गट नं. ३५ व ३६ मधील निवृत्ती हाईट्स समोरुन गट नं. ४२ पासून कैलास दगडू तांबे यांचे घर व रुपाराम चौधरी यांचे किराणा दुकानापर्यंत ते विकास योजनेतील २४ मी. रस्त्यापर्यंत जोडणारा रस्ता ३० फुट (९ मी.) रुंदीचा असणे गरजेचे आहे. तरी वरीलप्रमाणे पुणे नाशिक महामार्गापासून शिवक्लासिक इमारती समोरुन निवृत्ती हाईट्स इमारती समोरुन तांबे यांचे घर व रुपाराम चौधरी यांचे किराणा दुकानापासुन शिवाजीवाडी मधील विकास योजनेमधील २४ मी. अंतर्गत रस्त्याला जोडणारा विकास आराखडया व्यतिरिक्त ९ मी. रुंद रस्ता व श्री.काळूराम सस्ते यांच्या घरापासून दक्षिणेला गट नं. ४१ पै.श्री.राजू सस्ते यांच्या घरापर्यंतचा रस्ता व मौजे दापोडी येथील आंबेडकर पुतळयासमोरील अस्तित्वातील ३० मी.रस्त्यापासून सि.स.नं.२९२९ ते २८६१, सि.स.नं.२८६२ ते २१५३ मधुन बोपोडी ब्रीजपर्यंतच्या ३० मी.रस्त्यापर्यंत अस्तित्वातील रस्त्यास दोन्ही बाजूने समान १२ मी. रस्ता रुंदीकरण करणेबाबत तसेच मौजे मोशी गट नं.४६७ चे उत्तरेकडील १८ मी.रस्त्यापासून नवीन गट नं.४५४ विदयूत उच्चदाब वाहिनीखालील नवीन गट नं. ४५२ व तेथून नाल्याकडील नाशिक रस्त्याला जोडणारा रस्ता (NON DP) मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करण्याची कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.शितल शिंदे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एच.ए. कंपनीच्या ताब्यातील अतिरिक्त ५९ एकर जमिन बहुउद्येशिय सार्वजनिक मैदान (Multi –functional Public Ground) या प्रयोजनासाठी मागणेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी पुणे यांना सादर करणे व त्याकामी येणारा भूसंपादन खर्च नवीन भूसंपादन कायद्यान्वये अथवा खाजगी वाटाघाटीने मा.जिल्हाधिकारी पुणे ठरवतील त्या अटीशर्तीच्या अधिन राहून अदा करण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे. त्यासोबत पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेत विषयांकित अतिरिक्त ५९ एकर जमिन बहुउद्देशिय सार्वजनिक मैदान या उद्देशासाठी आरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र नगररचना अधिनियमाचे कलम ३७ अन्वये फेरबदल करणे तसेच फेरबदलाची विहीत कारवाई पूर्ण करुन प्रस्ताव शासनास मंजूरीस प्रस्ताव सादर करण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. अतिशय चांगला विषय आहे. मा.आयुक्त आपले व सर्व सन्मा.सदस्यांचे त्याबद्दल अभिनंदन. ही जागा लवकरात लवकर ताब्यात कशी घेता येईल यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा. शहरातील प्रॉपर ठिकाणची मोक्याची जागा आहे. ही जागा मिळाल्यानंतर महापालिकेचे अनेक प्रश्न मार्गी लावू शकतो. परंतू ही जागा शेवटी केंद्र शासनाची आहे. केंद्र शासनाची अनुमती घेऊन राज्य शासनाची अनुमती त्यानंतर जिल्हाधिकारी यांची अनुमती घेणे अशी लेन्दी प्रोसेस आहे. याचा फॉलोअप करुन आपण सर्वांनी ही जागा

घेण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी सभागृहाच्या वतीने मी आपले व महापौरांचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो.

**मा.आरती चोंधे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** – उपसूचनेसहीत विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ४१ विषय क्रमांक – ६
दिनांक – २०/६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.नरवि/कावि/१५/१८२/२०१७
दि.३१/०५/२०१७

मौजे पिंपरी वाघेरे येथील स.नं. १०३/१ब , १०४/१ब, १०४/२ब, १०५, १०६/१ब, १६८/२, १६९/२अ पैकी सुमारे ६९.३३ आर क्षेत्राची जमीन भूसंपादनाने मे. हिंदुस्थान एंटीबायोटिक्स लिमिटेड, पिंपरी यांचे ताब्यात आहे. मे. हिंदुस्थान एंटीबायोटिक्स लिमिटेड कंपनी सध्या तोट्यात चालु असल्याने कंपनीच्या ताब्यातील अतिरिक्त असलेली ६६ एकर जमीन खुल्या बाजारात विक्री करण्यास कंपनीने शासनाकडे परवानगी मागितली होती. त्यास अनुसरुन महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाने दिः- १४/३/२००१ रोजीचे निर्णयाव्दारे कंपनीस ताब्यात दिलेल्या जमिनीपैकी अतिरिक्त ५९एकर जमीन भूसंपादन नियम पुस्तिकेतील परिच्छेद ३२६ मधील तरतुदीनुसार विक्री करण्यास अटी व शर्तीवर आणि मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना योग्य वाटतील अशा इतर अटी शर्तीवर परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जून्या हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस १८९३/१२७६/प्र.क्र.१७४/९३/नवि-१३, दिः- १८/९/१९९५ अन्वये मंजूर असून एच.ए. कंपनीचे ताब्यातील जमिनीपैकी अतिरिक्त ५९ एकर जमीन ही निवासी विभागात समाविष्ट आहे. एच.ए. कंपनीचे उक्त जमीनीमध्ये प्रस्तावित अभिन्यासास पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने क्र. बीपी/लेआऊट/पिंपरी/६६/२०१०, दिः- ३१/१२/२०१० अन्वये सूधारित परवानगी मंजूर केली आहे. तसेच कंपनीचे वतीने ला. आ. यांनी दिः- ०४/३/२०१४ अन्वये नव्याने अभिन्यास सुधारित करण्याचा प्रस्ताव दाखल केला असून त्यास अद्याप मनपाची मंजूरी प्राप्त नाही.

पिंपरी चिंचवड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एच.ए. कंपनीची विषयांकित ५९ एकर जागा स्थित असून वाहतुकीचे / रस्त्यांचे जाळ्याने ( Road Network) देखील सोईस्करपणे जोडली गेलेली आहे. पिंपरी चिंचवड शहरातील नागरीकांसाठी शहर स्तरावरील (City Level) सार्वजनिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उक्त जागा ही सोईस्कर आहे.

विषयांकित जागा मंजूर विकास योजनेत “बहुउद्येशिय सार्वजनिक मैदान” (Multi – functional Public Ground) म्हणून आरक्षित केल्यास नागरिकांना विविधोपयोगी सोई सुविधांसाठी उदा. प्रदर्शन भरविण्यासाठी, सर्कस, लोक उपक्रमांसाठी, क्रीडा विषयक विविध स्पर्धा / कार्यक्रमांसाठी, सांस्कृतिक / धार्मिक / आध्यात्मिक कार्यक्रमांसाठी, व्याख्यानमाला, विविध कलाविष्कार / संगीत रजनी सारख्या कार्यक्रमांसाठी, विविध राजकीय पक्षांच्या सभांसाठी, शैक्षणिक / सामाजिक / शासकिय – निमशासकीय / राजकीय संस्थांचे विविध उपक्रम / कार्यक्रम / स्नेह संमेलनासाठी, वाहनतळ, हेलीपॅड इ. साठी या जागेचा उपयोग करता येईल. उक्त जागेमध्ये फक्त १० टक्के क्षेत्रात मनपाचे या सुविधेसाठी प्रशासकीय कार्यालय, लोक सभागृह, उपहारगृह, दुकान गाळे, स्वच्छतागृह, गेस्ट हाऊस, स्टाफ क्वॉर्टर्स, अग्निशमन केंद्र, बँक, ए.टी.एम., तातडीचे वैद्यकीय सेवा केंद्र, व्यायामशाळा, वाचनालय इत्यादीसाठी व अशा स्वरुपाच्या अन्य पुरक सोई सुविधांसाठी मा. महापालिका आयुक्त निर्धारित करतील अशा सुसंगत प्रयोजनांसाठी परिसर विकसनाच्या तत्वावर (Place Making Concept) आवश्यक बांधकाम/ वापरास परवानगी देऊ शकतील. तथापी या आरक्षणाचे ९० टक्के क्षेत्र कायमस्वरुपी खुले राहण्याचे हेतूने वर नमूद केल्यानुसार विविधोपयोगी सोई सुविधांसाठी मा. महापालिका आयुक्त ठरवतील अशा ठराविक कालावधीसाठी तात्पुरती परवानगी ( Temporary Permission) महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे विशेष अटी शर्तीस अधिन देऊ शकतील.

एच.ए. कंपनीच्या ताब्यातील अतिरिक्त ५९ एकर जमीन “बहुउद्येशिय सार्वजनिक मैदान” ( Multi –functional Public Ground)या प्रयोजनासाठी मागणीचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर करण्यास व त्याकामी येणारा भूसंपादन खर्चास ( नविन भूसंपादन कायद्यान्वये अथवा खाजगी वाटाघाटीने ) मा. जिल्हाधिकारी, पुणे ठरवतील त्या अटी व शर्तीस अधिन राहुन अदा करण्यास मा. महापालिका सभेची मंजुरी आवश्यक आहे. त्या सोबतच पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेत विषयांकित एच.ए. कंपनीच्या ताब्यातील अतिरिक्त ५९ एकर जमीन “बहुउद्येशिय सार्वजनिक मैदान” ( Multi –functional Public Ground) या प्रयोजनासाठी आरक्षित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनिमय, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास तसेच फेरबदलाची विहित कार्यवाही पुर्ण करुन प्रस्ताव शासन मंजुरीस्तव सादर करण्यास मा. महापालिका आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. ३ मधील मोशी शिवाजीवाडी भागातील नागरीकरण झपाटयाने वाढले आहे. पुणे नाशिक रस्ता (६० मी. पासून) ते शिवाजीवाडी मधील मंजूर विकास योजनेतील २४ मी. रस्त्याला जोडणारा अंतर्गत रस्ता वाहतुकीस अपुरा पडत आहे. पुणे नाशिक रस्त्यापासून कैलास भांबुर्डेकर यांचे गट नं. ४२/१ चे मिळकतीपासून गट नं. ४४ व ४५ मधील शिवक्लासिक इमारती समोरुन गट नं. ३५ व ३६ मधील निवृत्ती हाईट्स समोरुन गट नं. ४२ पासून कैलास दगडू तांबे यांचे घर व रुपाराम चौधरी यांचे किराणा दुकानापर्यंत ते विकास योजनेतील २४ मी. रस्त्यापर्यंत जोडणारा रस्ता ३० फुट (९ मी.) रुंदीचा असणे गरजेचे आहे. तरी वरीलप्रमाणे पुणे नाशिक महामार्गापासून शिवक्लासिक इमारती समोरुन निवृत्ती हाईट्स इमारती समोरुन तांबे यांचे घर व रुपाराम चौधरी यांचे किराणा दुकानापासुन

शिवाजीवाडी मधील विकास योजनेमधील २४ मी. अंतर्गत रस्त्याला जोडणारा विकास आराखडया व्यतिरिक्त ९ मी. रुंद रस्ता व श्री.काळूराम सस्ते यांच्या घरापासून दक्षिणेला गट नं. ४१ पै.श्री.राजू सस्ते यांच्या घरापर्यंतचा रस्ता व मौजे दापोडी येथील आंबेडकर पुतळयासमोरील अस्तित्वातील ३० मी.रस्त्यापासून सि.स.नं.२९२९ ते २८६१, सि.स.नं.२८६२ ते २१५३ मधुन बोपोडी ब्रीजपर्यंतच्या ३० मी.रस्त्यापर्यंत अस्तित्वातील रस्त्यास दोन्ही बाजूने समान १२ मी. रस्ता रुंदीकरण करणेबाबत तसेच मौजे मोशी गट नं.४६७ चे उत्तरेकडील १८ मी.रस्त्यापासून नवीन गट नं.४५४ विदयूत उच्चदाब वाहिनीखालील नवीन गट नं. ४५२ व तेथून नाल्याकडील नाशिक रस्त्याला जोडणारा रस्ता (NON DP) मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करण्याची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकुल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक – २०/०६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.स्वभाअक/३/कावि/६६/२०१७ दि.७/६/२०१७

केंद्र शासनाच्या “स्वच्छ भारत अभियान”च्या धर्तीवर राज्यामध्ये “स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु २८७,०३,०००/- व ५,०३,९१,०००/- असे एकुण र. रु ७,९०,९४,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/५/२०१७ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या<br><br>कुटुंबांची संख्या | | १०३३३ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत<br><br>स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ९३३६ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ५९३२ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुतीशौचालय | ४८५० | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ४४०० | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | १७५सीटस | महिला – ९४ सिटस कामकाज पूर्ण<br><br>पुरुष – ८१ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहसा | ५२४५लाभार्थी | GOI+GOM=३१४.७० <br><br>लाख | GOI=२०००/-व<br><br>GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =१०४.९० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४१९.६लाख** | |
| निर्गत करणेत आलेला<br><br>दुसरा हसा | ३७८१ लाभार्थी | GOI+GOM=२२६.८६<br><br>लाख | GOI=२०००/-व<br><br>GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =७५.६२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३०२.४८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे.

**मा.माधुरी कुलकर्णी -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे –** मा. महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-

१) अंदाजपत्रकात विविध कामांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये नविन व जुन्या कामांचा समावेश आहे. अंदाजपत्रकातील नविन कामांच्या निविदा प्रसिध्द करणे वा इतर कार्यवाही करणे याकरिता विवीध समित्यांची प्रशासकीय मंजूरीची आवश्यकता लागते. प्रशासकीय मान्यता घेण्याकरिता अंदाजपत्रके तयार करुन तदनंतर सक्षम समितीपुढे मान्यतेकामी सादर करण्यास मोठा कालावधी लागतो व त्यामुळे निविदा प्रसिध्द करणे व त्यानंतर कामाचा आदेश देणे यास बराच विलंब लागतो व पर्यायाने सन्माननीय सदस्यांच्या प्रभागातील कामे करण्यासाठी होणा-या विलंबामुळे तक्रारी वाढत जातात. अंदाजपत्रकातील तरतुदींचा पुरेपुर वापर व्हावा व होणा-या कामांचा फायदा नागरिकांना लवकरात लवकर व्हावा यासाठी प्रशासकीय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे. सदर कामांना महापालिकेने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकात कामांच्या समोर दर्शविलेल्या रकमेइतक्या खर्चास एकत्रीत प्रशासकीय मान्यता देण्यात यावी तसेच ही प्रशासकीय मान्यतेची रक्कम निवीदा प्रक्रीया पुर्ण झाल्यावर मंजुर निविदा रकमेइतकी मर्यादीत राहील यासही मंजुरी देण्यात यावी तसेच हया व यापुर्वीच्या अंदाजपत्रकातील महसूली खर्चाच्या कामांवर यापुर्वी झालेल्या व मार्च २०१८ पर्यंत होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. तसेच चालू वर्षात निवडणुकांमुळे अंदाजपत्रकास विलंब झालेला आहे त्यामुळे तसेच अन्यथा देखील अंदाजपत्रकीय तरतुदींचे वर्गीकरण वेळीच होऊन विकासकामे व अन्य कामांच्या निवीदा प्रक्रिया व इतर प्रक्रिया वेळीच होऊन कामे लवकर होण्याच्या दृष्टिने व त्यांचा फायदा शहरातील नागरिकांना वेळीच मिळण्याच्या दृष्टिने यापुढे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०१ नुसारचे व अनुसूची ड मधील प्रकरण-७ मधील कलम २ नुसारचे भांडवली लेखाशिर्षाबाबतचे महापालिकेचे अधिकार स्थायी समितीस प्रदान करण्यास मान्यता देणेत यावी तसेच अंदाजपत्रक दोन मधील भाग-३ मधील अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात यावी.

**मा.उषा मुंढे –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

**मा.शारदा सोनवणे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते- मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दिनांक ३१/५/२०१७ च्या प्रस्तावानुसार प्रसार माध्यम

प्रतिनिधींना वितरीत करावयाच्या सवलतीचे बसप्रवास पास देणेकामी धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव सादर केला असलातरी प्रसार माध्यम प्रतिनिधींना प्रचलीत अटी-शर्ती कायम ठेवून मोफत बसप्रवास पास देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.सुरेश भोईर –** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, दोन्ही उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसुचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ४२ विषय क्रमांक – ७
दिनांक – २०/०६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.स्वभाअक/३/कावि/६६/२०१७ दि.७/६/२०१७

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालयनाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु २८७,०३,०००/- व ५,०३,९१,०००/- असे एकुण र. रु ७,९०,९४,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु.८००० /- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/५/२०१७ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १०३३३ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान” च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ९३३६ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ५९३२ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुतीशौचालय | ४८५० | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | ४४०० | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ३६१ सीटस | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | १७५सीटस | महिला – ९४ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष – ८१ सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिलाहप्ता | ५२४५लाभार्थी | GOI+GOM=३१४.७० लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =१०४.९० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **४१९.६लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | ३७८१ लाभार्थी | GOI+GOM=२२६.८६ लाख | GOI=२०००/-व GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =७५.६२ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **३०२.४८ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत येत आहे तसेच १) अंदाजपत्रकात विविध कामांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये नविन व जुन्या कामांचा समावेश आहे. अंदाजपत्रकातील नविन कामांच्या निविदा प्रसिध्द करणे वा इतर कार्यवाही करणे याकरिता विवीध समित्यांची प्रशासकीय मंजूरीची आवश्यकता लागते. प्रशासकीय मान्यता घेण्याकरिता अंदाजपत्रके तयार करुन तदनंतर सक्षम समितीपुढे मान्यतेकामी सादर करण्यास मोठा

कालावधी लागतो व त्यामुळे निविदा प्रसिध्द करणे व त्यानंतर कामाचा आदेश देणे यास बराच विलंब लागतो व पर्यायाने सन्माननीय सदस्यांच्या प्रभागातील कामे करण्यासाठी होणा-या विलंबामुळे तक्रारी वाढत जातात. अंदाजपत्रकातील तरतुदींचा पुरेपुर वापर व्हावा व होणा-या कामांचा फायदा नागरिकांना लवकरात लवकर व्हावा यासाठी प्रशासकीय मान्यता तातडीने मिळणे आवश्यक आहे. सदर कामांना महापालिकेने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकात कामांच्या समोर दर्शविलेल्या रकमेइतक्या खर्चास एकत्रीत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच ही प्रशासकीय मान्यतेची रक्कम निवीदा प्रक्रीया पुर्ण झाल्यावर मंजुर निविदा रकमेइतकी मर्यादीत राहील यासही मंजुरी देण्यात येत आहे. तसेच हया व यापुर्वीच्या अंदाजपत्रकातील महसूली खर्चाच्या कामांवर यापुर्वी झालेल्या व मार्च २०१८ पर्यंत होणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच चालू वर्षात निवडणुकांमुळे अंदाजपत्रकास विलंब झालेला आहे त्यामुळे तसेच अन्यथा देखील अंदाजपत्रकीय तरतुदींचे वर्गीकरण वेळीच होऊन विकासकामे व अन्य कामांच्या निवीदा प्रक्रिया व इतर प्रक्रिया वेळीच होऊन कामे लवकर होण्याच्या दृष्टिने व त्यांचा फायदा शहरातील नागरिकांना वेळीच मिळण्याच्या दृष्टिने यापुढे, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०१ नुसारचे व अनुसूची ड मधील प्रकरण-७ मधील कलम २ नुसारचे भांडवली लेखाशिर्षाबाबतचे महापालिकेचे अधिकार स्थायी समितीस प्रदान करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच अंदाजपत्रक दोन मधील भाग-३ मधील अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे दिनांक ३१/५/२०१७ च्या प्रस्तावानुसार प्रसार माध्यम प्रतिनिधींना वितरीत करावयाच्या सवलतीचे बसप्रवास पास देणेकामी धोरण निश्चित करण्याचा प्रस्ताव सादर केला असलातरी प्रसार माध्यम प्रतिनिधींना प्रचलीत अटी-शर्ती कायम ठेवून मोफत बसप्रवास पास देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.आरती चोंधे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/०६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील
जा.क्र.मातंवि/१२/कावि/१३४/१७ दि.०८/०६/२०१७

राज्य उच्चाधिकार समितीच्या दिनांक २८/१२/२०१६ च्या चौथ्या बैठकीत समितीने नवी मुंबई महानगरपालिके ऐवजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवड करण्यासंदर्भात शिफारस शहरी विकास मंत्रालय, केंद्र शासन यांना केली होती.

तदअनुषंगाने दिनांक ३०/१२/२०१६ च्या पत्रान्वये शहरी विकास मंत्रालय,केंद्र शासन यांनी नवी मुंबई महानगरपालिके ऐवजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश स्मार्ट सिटी अभियानात करणेत आल्याचे कळविले होते. त्यानुसार सदर अभियानाचे तिस-या व अंतिम फेरीत पात्र होणेसाठी केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार स्मार्ट सिटी प्रपोजल तयार करून राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी दि ३१ मार्च २०१७ पर्यंत पाठविणे आवश्यक होते. त्यानुसार, महापालिकेचे स्मार्ट सिटी प्रपोजल मंत्रालय मुंबई येथे दि.३१ मार्च २०१७ रोजी पार पडलेल्या राज्य शासनाची उच्चधिकार समितीच्या बैठकीत Smart City Proposal सादर केल्याची माहिती मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. Smart City – 2017 / CR- 125/UD-23 दि. ३१ मार्च २०१७ अन्वये मा. अतिरिक्त सचिव नगरविकास विभाग भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविणेत आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.स्मार्टसिटी–२०१६/प्र. क्र.५०३/-नवि-२३ दि. ९ जानेवारी २०१७ अन्वये स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्य स्तरिय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविणेकरीता विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) स्थापन करणेस मान्यता दिलेली असून स्मार्ट सिटी अभियान राबविणेकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिका विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) चे तात्काळ गठण करावे असे कळविण्यात आलेले आहे.

**विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) ची रचना खालील प्रमाणे असेल:-**

विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) यांच्या रचनेत महानगरपालिका महाराष्ट्र शासन केंद्र सरकार स्वतंत्र संचालक यासह १५ संचालक मंडळास मान्यता देण्यात आली आहे. सदर संचालक मंडळातील विविध भागधारक (stake holders) यांचे संचालक मंडळातील प्रतिनिधीत्वास खालील प्रमाणे मान्यता देणेत आली आहे.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका – ६ संचालक
२) महाराष्ट्र शासन – ४ संचालक
३) केंद्र शासन – १ संचालक
४) २ स्वतंत्र संचालक ( या संचालकाची निवड केंद्रीय कंपनी व्यवहार मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या संचालकाच्या डेटा बँक मधून करणेत येईल.)
५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त
६) मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.)
७) श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग (१) हे उक्त विशेष उद्देश वहनाचे अध्यक्ष असतील.

उक्त रचनेच्या अनुंषगाने विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) मध्ये महानगरपालिकेसाठी शासनाने खालील प्रमाणे संचालक नामनिर्देशीत केलेले आहेत.

१) मा. महापौर - पिंपरी चिंचवड महानगरपालिका
२) मा. अध्यक्ष, स्थायी समिती, - पिंपरी चिंचवड महानगरपालिका
३) मा. सभागृह नेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

४) मा. विरोधी पक्षनेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

तसेच व्यापक राजकिय प्रतिनिधीत्व देण्याचा उद्देशाने विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) वर प्रतिनिधीत्व मिळणे आवश्यक आहे. याकरीता वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशीत संचालक म्हणून नियूक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय/ राज्य मान्यता प्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशीत करणेत येतील अशी शासन निर्णयात तरतुद केलेली आहे.

सबब, स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्य स्तरिय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरिता विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) वर महापालिकेचे वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशीत संचालक म्हणून नियूक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय /राज्य मान्यता प्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे दोन संचालक नामनिर्देशीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.माधुरी कुलकर्णी-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.राहुल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय आपण आपल्या अधिकारात घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मा.एकनाथ पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्यस्तरिय उच्चाधिकार समिती. खरंतर स्मार्ट सिटी संदर्भात आपल्या सगळयांना कल्पना आहे. या शहरामधील राजकारण स्मार्ट सिटीच्यावर ढवळून गेलं होतं आणि ढवळून गेल्याच्यानंतर स्मार्ट सिटीमध्ये समावेशाबाबत मा.वेंकय्या नायडू यांनी सांगीतल आणि स्मार्ट सिटी घोषीत झाल्याच्यानंतर दोन प्रभाग आणि उरलेल्या शहरामध्ये आपल्याला काम करायच आहे. खरतर दोन प्रभाग स्मार्ट करायचे नाहीतर संपुर्ण शहर आपल्याला स्मार्ट करण्यासाठी पुढच्या काळामध्ये काम कराव लागणार आहे. यासाठी एसपीव्हीच्या संदर्भामध्ये जी समिती आहे. भारतीय जनता पार्टीचे ७७ सदस्य आहेत. वेगवेगळया पध्दतीने शिवसेनेस किती मिळाले पाहीजे परंतु एक गोष्ट निश्चित आहे यामध्ये ज्या समितीमध्ये नाव दयायच ठरलेलं आहे. आपल्या पिंपरी चिंचवडचे महानगरपालिका आयुक्त असतील, मुख्य कार्यकारी अधिकारी, एसपीव्हीचे. मा.नितीन करीर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मा.महापौर, मा.स्थायी समिती अध्यक्ष, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता. याशिवाय उरलेली जी दोन नाव आहेत ती शिवसेनेचे एक सदस्य म्हणून प्रमोद कुटे व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सचिन

चिखले. मा.महापौर साहेब, मी आपल्याला विनंती करतो हा अधिकार महासभेचा आहे. हा अधिकार गटनेत्यांनी पक्षाच्या संघटनेनी पत्र दिल आहे त्यामुळ नाही. महासभेच्या माध्यमातून ही नाव दिली आहेत तरी महापौरांनी हा विषय मंजूर करावा.

मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्य स्तरिय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरिता विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) वर महापालिकेचे वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशीत संचालक म्हणून नियूक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय /राज्य मान्यता प्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे दोन संचालक नामनिर्देशीत करावयाचे असलेने महानगरपालिकेचे सध्याचे खालील प्रमाणे पक्षीय बलाबल आहे-

| क्र. | मा.विभागीय आयुक्त यांचे कडे नोंद झालेले पक्ष/गट/आघाडी | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ७७ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ३६ |
| ३ | शिवसेना | ०९ |
| ४ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ०१ |
| ५ | अपक्ष आघाडी- २०१७ | ०५ |
| | एकूण | १२८ |

वरील पैकी भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांना प्रतिनिधीत्व मिळाले असलेने उर्वरीत खालीलप्रमाणे राष्ट्रीय/ राज्य मान्यता प्राप्त पक्षाकडील दोन संचालकांचे नामनिर्देशन करणेस मान्यता देणेत येत आहे.

| क्र. | राजकीय पक्षाचे नाव | नामनिर्देशित करावयाचे सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका-शिवसेना | मा.प्रमोद कुटे |
| २ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका-महाराष्ट्र नवनिर्माण सेना | मा.चिखले सचिन तुकाराम |

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सन्मा.सभागृह नेते आपल्याला विनंती आहे की आपण थोडीशी गल्लत करत आहात. वास्तविक पाहता यामध्ये स्पष्ट म्हणलेल आहे. मा. महापौर - पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मा. अध्यक्ष, स्थायी समिती, - पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मा. सभागृह नेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मा.विरोधी पक्षनेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका. व्यापक राजकिय प्रतिनिधीत्व देण्याचा उद्देशाने विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) वर प्रतिनिधीत्व मिळणे आवश्यक आहे. याकरीता वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशीत संचालक म्हणून नियूक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय/ राज्य मान्यता प्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशीत करणेत येतील अशी शासन निर्णयात तरतुद केलेली आहे. मा.महापौर साहेब, आपण ज्यावेळेला एखादया विशिष्ठ गटाकडन संख्याबळानुसार ज्यावेळेला नाव घेतो त्यावेळेला त्या त्या पक्षाचे गटनेते ते नाव देतात. मा.महापौर साहेब, त्या त्या वेळेला त्या त्या पक्षाचे जे गटनेते आहेत ते नाव देतात. त्यामुळे चुकीची आणि उलटी प्रथा पाडू नका. त्यामध्ये जे गटनेते आहेत ते गटनेते जे नाव देतील मला प्रमोदच्या नावाला बिलकुल विरोध नाही. परंतु माझी विनंती अशी आहे की जी प्रथा आहे आणि येथे स्पष्ट म्हणलेल आहे की पक्षाच्या संख्या बळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशीत करणेत येतील अशी शासन निर्णयात तरतुद केलेली आहे. त्या पक्षाचा गटनेता मगाशी वृक्षप्राधिकरण समितीमध्ये तसं विषयात काही लिहीलेल नव्हतं म्हणून आम्ही तीथ काही विरोध केला नाही. अन्यत: मागच्यावेळेला काहीही नसताना सुध्दा मंगलाताईनी त्यावेळेला भाजपचे तीन नगरसेवक असताना एक नगरसेवक घेतला होता. आता पक्षनेते म्हणाले की चार नाही तुम्ही तीन घ्या आम्ही म्हणलो काही हरकत नाही तीनतर तीन. परंतु माझी सभागृह नेत्यांना विनंती आहे की मा.महापौर आपल्यालाही विनंती आहे की काहीतरी चुकीचा पायंडा पाडू नका त्या त्या पक्षाचा सन्मान त्या त्या गटनेत्याना दयावा अशी आपल्याला विनंती करतो.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता योगेशजी बहल यांनी सांगीतल त्यांच्या म्हणण्यामध्ये मला एक थोडीशी त्रुटी आढळून आलेली आहे. राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय/ राज्य मान्यता प्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशीत करणेत येतील अशी शासन निर्णयात तरतुद केलेली आहे. यामध्ये कुठेही म्हणलेल नाही की गटनेत्यांकडून नाव आल पाहीजे. त्यामुळे येथे जे सत्तारुढ पक्षनेत्यांनी नाव

दिलेले आहेत त्याला आपण मान्यता देवून हा विषय मंजूर करण्यात यावा ही आपणास विनंती करण्यात येत आहे.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मा.उध्दव ठाकरे साहेबांचा पक्षादेश, पक्षनेत्यांच देखील आपल्याकडे पत्र दिलेल आहे, आयुक्त साहेबांनाही दिलेलं आहे.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. जे जे म्हणल ते आपण नियमाप्रमाणे करतो. एसपीव्हीच्या संदर्भामध्ये जे जे निर्देश दिलेले आहेत त्याप्रमाणे नावे दिलेली आहेत त्यांना एक जागा शिवसेनेची दिली आहे. तुमच्याच पार्टीच्या कार्यकर्त्यांला पद दिलं आहे दुस-यांना तर दिल नाहीनां. सगळयांनाच संधी मिळाली पाहीजे. शहराचा सर्वांगीणजर विकास करायचा असेलतर एसपीव्हीमध्ये शिवसेनेचा सदस्य बसला आहेनां. भारतीय जनता पार्टीचा सदस्य त्याच्यावर बसला नाही. मला असं वाटतय की या संदर्भामध्ये स्पष्ट शब्दामध्ये दिलेंल आहे. यामध्ये तुमच्या अधिकारावर आम्ही गदा आणणार नाहीत. तुम्हांला जे अधिकार आहेत ते शंभर टक्के आहेत. खरतर तुम्ही एवढे वर्षे या सभागृहामध्ये काम करता आम्ही कोणाच्याही अधिकारावर गदा आणणार नाहीत. मी यामधील पुन्हा एकदा वाचून दाखवतो. स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्य स्तरिय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरिता विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) वर महापालिकेचे वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशीत संचालक म्हणून नियूक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय /राज्य मान्यता प्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे दोन संचालक नामनिर्देशीत करणेस मान्यता देणेत येत आहे. त्यामुळे अशी परिस्थिती नाही. दोन नगरसेवक एक शिवसेनेचा आणि एक मनसेचा अशा पध्दतीचे आपण नाव दिलेली आहेत. मा.महापौर साहेब, आपण हा विषय मंजूर करावा. कारण स्मार्ट सिटीच्या संदर्भामध्ये कामकाज सुरु झालेलं आहे. आपल्याला पुढच्या काळामध्ये या शहराला ख-या अर्थान स्मार्ट करण्यासाठी, या शहराला खरंच मॉडेल करायच आहे तरी हा विषय अधिक गतीमान करण्यासाठी आपण हा विषय मंजूर करावा.

**मा.राहूल कलाटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पक्षप्रमुखांच पत्र आपल्यालाही दिलेलं आहे.

**मा.नामदेव ढाके -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.सचिन चिखले -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण या योजनेमध्ये आम्हांला सामाविष्ठ करुन घेतले त्याबद्दल सर्वाच मी मनपुर्वक हार्दीक आभार मानतो. स्मार्ट सिटीसाठी आपले पिंपरी चिंचवड शहर हे घेण्यात यावे यासाठी या शहरातील शाळा असतील, कॉलेजेस असतील, ज्येष्ठ तज्ञ लोक असतील, पत्रकार बांधव असतील विवीध संघटनांनी स्मार्ट सिटीमध्ये याव यासाठी आम्ही दिवसरात्र या शहरासाठी आंदोलन केलेली आहेत. या पिंपरी चिंचवड शहराचा स्मार्ट सिटीमध्ये समावेश झाला आणि त्याचा एक सदस्य म्हणून माझी नियुक्ति करण्यात आली त्याबद्दल पुन्हा सभागृहाच मी हार्दीक आभार मानतो. मा.महापौर साहेब, पहीली सुचना मी करतो की आपण वर्तमानपत्रामध्ये पाहीले असेल आपल्या महापौरांची गाडी शाळेतील विदयार्थी ढकलत होते आमचे विभाग अध्यक्ष च-होलीमध्ये आहेत त्यांच्या घरी मी बसलो होतो आणि नेमक त्यांच घर समोरच आहे. एवढा मोठा गतीरोधक होता की ती गाडी अशी घासुन वरती लटकलेली जोरात. आणि कालचे चित्र मी पाहीलतर सगळयाच वर्तमानपत्रानी सांगीतल की बंद पडली आणि विदयार्थी ढकलतात. अक्षरश: एक दिवस महापौरांना या पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये येऊ शकले नाहीत त्याच्यामुळे सगळे त्यांच कामकाज थांबलेले आहे. मी विनंती करतो की महापौरांना जी आवडेल ती गाडी लवकरात लवकर देण्यात यावी अशी मी नंम्र विनंती करतो, धन्यवाद.

**मा.प्रमोद कुटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सर्वात प्रथम याठिकाणी सभागृहाचे सत्तारुढ पक्षनेते मा.एकनाथजी पवार, स्थायी समिती सभापती मा.सिमाताई सावळे, आमच्या पक्षाचे गटनेते राहूलजी कलाटे, विरोधी पक्षनेते योगेशजी बहल तसेच स्मार्ट असणारे आमचे स्मार्ट सिटीचे सदस्य सचिनजी चिखले यांनी आताच गाडीचा विषय मांडला आहे मी तुमच सर्वांच मनापासून आभार व्यक्त करतो की आपण मला या स्मार्ट सिटी योजनेमध्ये काम करण्याची जी संधी दिलेली आहे. नक्कीच येणा-या काळामध्ये या स्मार्ट सिटी योजनेमध्ये काम करण्याची संधी मला दिली त्याबद्दल मी तुमच आभार मानतो. मा.महापौरांच सुध्दा मला शिवसेनेच्या वतीने स्विकारले त्याबद्दल आभार व्यक्त करतो.

**मा.आरती चोंधे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर -** विषय क्रमांक ८ हा उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ४३ विषय क्रमांक – ८

दिनांक – २०/०६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील

जा.क्र.मातंवि/१२/कावि/१३४/१७ दि.०८/०६/२०१७

राज्य उच्चाधिकार समितीच्या दिनांक २८/१२/२०१६ च्या चौथ्या बैठकीत समितीने नवी मुंबई महानगरपालिके ऐवजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची निवड करण्यासंदर्भात शिफारस शहरी विकास मंत्रालय, केंद्र शासन यांना केली होती.

तद्अनुषंगाने दिनांक ३०/१२/२०१६ च्या पत्रान्वये शहरी विकास मंत्रालय,केंद्र शासन यांनी नवी मुंबई महानगरपालिके ऐवजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा समावेश स्मार्ट सिटी अभियानात करणेत आल्याचे कळविले होते. त्यानुसार सदर अभियानाचे तिस-या व अंतिम फेरीत पात्र होणेसाठी केंद्र शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार स्मार्ट सिटी प्रपोजल तयार करून राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी दि ३१ मार्च २०१७ पर्यंत पाठविणे आवश्यक होते. त्यानुसार, महापालिकेचे स्मार्ट सिटी प्रपोजल मंत्रालय मुंबई येथे दि.३१ मार्च २०१७ रोजी पार पडलेल्या राज्य शासनाची उच्चधिकार समितीच्या बैठकीत Smart City Proposal सादर केल्याची माहिती मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. Smart City – 2017 / CR- 125/UD-23 दि. ३१ मार्च २०१७ अन्वये मा. अतिरिक्त सचिव नगरविकास विभाग भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविणेत आलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.स्मार्टसिटी–२०१६/प्र. क्र.५०३/-नवि-२३ दि. ९ जानेवारी २०१७ अन्वये स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्य स्तरिय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविणेकरीता विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) स्थापन करणेस मान्यता दिलेली असून स्मार्ट सिटी अभियान राबविणेकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिका विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) चे तात्काळ गठण करावे असे कळविण्यात आलेले आहे.

**विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) ची रचना खालील प्रमाणे असेल:-**

विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) यांच्या रचनेत महानगरपालिका महाराष्ट्र शासन केंद्र सरकार स्वतंत्र संचालक यासह १५ संचालक मंडळास मान्यता देण्यात आली आहे. सदर संचालक मंडळातील विविध भागधारक (stake holders) यांचे संचालक मंडळातील प्रतिनिधीत्वास खालील प्रमाणे मान्यता देणेत आली आहे.

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका – ६ संचालक

२) महाराष्ट्र शासन – ४ संचालक

३) केंद्र शासन – १ संचालक

४) २ स्वतंत्र संचालक ( या संचालकाची निवड केंद्रीय कंपनी व्यवहार मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या संचालकाच्या डेटा बँक मधून करणेत येईल.)

५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.)

७) श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगरविकास विभाग (१) हे उक्त विशेष उद्देश वहनाचे अध्यक्ष असतील.

उक्त रचनेच्या अनुंषगाने विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) मध्ये महानगरपालिकेसाठी शासनाने खालील प्रमाणे संचालक नामनिर्देशीत केलेले आहेत.

१) मा. महापौर - पिंपरी चिंचवड महानगरपालिका
२) मा. अध्यक्ष, स्थायी समिती, - पिंपरी चिंचवड महानगरपालिका
३) मा. सभागृह नेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
४) मा. विरोधी पक्षनेता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

तसेच व्यापक राजकिय प्रतिनिधीत्व देण्याचा उद्देशाने विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) वर प्रतिनिधीत्व मिळणे आवश्यक आहे. याकरीता वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशीत संचालक म्हणून नियूक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय/ राज्य मान्यता प्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशीत करणेत येतील अशी शासन निर्णयात तरतुद केलेली आहे.

सबब, स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्य स्तरिय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरिता विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) वर महापालिकेचे वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशीत संचालक म्हणून नियूक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय /राज्य मान्यता प्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे दोन संचालक नामनिर्देशीत करणेस मान्यता देणेत येत आहे तसेच सबब, स्मार्ट सिटी अभियानांतर्गत राज्य स्तरिय उच्चाधिकार समिती मार्फत शिफारस करण्यात आलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात स्मार्ट सिटी अभियान राबविण्याकरिता विशेष उद्देश वहन (एस.पी.व्ही.) वर महापालिकेचे वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशीत संचालक म्हणून नियूक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय /राज्य मान्यता प्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक याप्रमाणे दोन संचालक नामनिर्देशीत करावयाचे असलेने महानगरपालिकेचे सध्याचे खालील प्रमाणे पक्षीय बलाबल आहे-

| क्र. | मा.विभागीय आयुक्त यांचे कडे नोंद झालेले पक्ष/गट/आघाडी | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ७७ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी | ३६ |
| ३ | शिवसेना | ०९ |
| ४ | महाराष्ट्र नवनिर्माण सेना | ०१ |
| ५ | अपक्ष आघाडी- २०१७ | ०५ |
|  | एकूण | १२८ |

वरील पैकी भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांना प्रतिनिधीत्व मिळाले असलेने उर्वरीत खालीलप्रमाणे राष्ट्रीय/ राज्य मान्यता प्राप्त पक्षाकडील दोन संचालकांचे नामनिर्देशन करणेस मान्यता देणेत येत आहे.

| क्र. | राजकीय पक्षाचे नाव | नामनिर्देशित करावयाचे सदस्याचे नाव |
|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका-शिवसेना | मा.प्रमोद कुटे |
| २ | पिंपरी चिंचवड महानगरपालिका-महाराष्ट्र नवनिर्माण सेना | मा.चिखले सचिन तुकाराम |

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४४ विषय क्रमांक – ९

दिनांक – २०/०६/२०१७ विभाग – मा.नगरसचिव

**<u>विधी समिती</u>**

अ) दि.६/०१/२०१७ व दि.०७/०१/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२०/०१/२०१७ दि.०३/०२/२०१७, दि.१७/०२/२०१७ दि.३/३/२०१७ व २१/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१५/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दि.२१/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

इ) दि.०२/०५/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.चंद्रकांत नखाते -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम केंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४५ विषय क्रमांक – १०

दिनांक – २०/०६/२०१७ विभाग – मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.११/१/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.२५/०१/२०१७, दि.०८/०२/२०१७, दि.२२/०२/२०१७ दि.८/०३/२०१७ व दि.०२/०२/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१५/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दि.०२/०५/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

इ) दि.१६/०५/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम कैंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४६ विषय क्रमांक – ११

दिनांक – २०/०६/२०१७ विभाग – मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.१९/०१/२०१७, दि.०२/०२/२०१७ व दि.२५/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.०२/०२/२०१७ व २५/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१५/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दि.२५/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

इ) दि.०९/०५/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.उत्तम कैंदळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ४७ विषय क्रमांक – १२

दिनांक – २०/०६/२०१७ विभाग – मा.नगरसचिव

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

**अ) दि.४/१/२०१७ चा सभावृत्तांत** कायम करणेत येत आहे.

**ब)** दि. १८/०१/२०१७, दि.०१/०२/२०१७ दि.१५/२/२०१७ व दि.२८/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१५/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ड) दि.२८/०४/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

इ) दि.१२/०५/२०१७ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.कैलास बारणे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.आशा धायगुडे-शेंडगे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक – ४८ विषय क्रमांक – १३

दिनांक – २०/०६/२०१७ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.स्वभाअक/३/कावि/८०/२०१७ दि.१९/६/२०१७

मे. सॅमटेक क्लिन अँन्ड केअर प्रा.लि. यांनी Automatic Public toilet adaption करणेबाबतचा प्रस्ताव दिनांक १३/०६/२०१७ रोजी महानगरपालिकेस सादर केलेला आहे.

मे. सॅमटेक क्लिन अँन्ड केअर यांनी दिलेल्या प्रस्तावामध्ये सदर कंपनीने स्वखर्चाने Demo Premium Toilet हे ७ वर्षाकरिता सदर जागेवर जाहिरात व Coin collection करुन टॉयलेटचा देखभाल व दुरुस्ती खर्च कंपनीकडून भागविला जाईल असे नमूद केले आहे. त्याकरिता त्यांना महानगरपालिकेमार्फत जागा, विदयूत, पाणी व जलनिस्स:रण जोडणी आवश्यक असल्याचे कळविले असुन त्यांनी खालील ठिकाणी डेमो प्रिमियम टॉंयलेट बसविण्याची विनंती केली आहे.

१) निगडी बस स्टॉप

२) डांगे चौक

३) पिंपळे सौदागर

४) नाशिक फाटा

५) रांका ज्वेलर्स चिंचवड स्टेशन

अशा प्रकारच्या स्वच्छतागृहांचा महानगरपालिका परिसरात वापर करणेकामी संबंधित खाजगी संस्थेस जागा उपलब्ध करुन देणे, त्या करिता स्वच्छतेकामी लागणारे पाणी, वीज व सांडपाण्यासाठीची व्यवस्था उपलब्ध करुन देणे ही बाब धोरणात्मक असल्याने त्यास मा. महापालिका सभेची मान्यता देणेत येत आहे. तसेच अशा प्रकारच्या स्वच्छतागृहासाठी पर्यायी जागा देणे व भविष्यात अशा प्रकारचे सी.एस.आर अथवा अन्य संस्थेने तयारी दर्शविल्यास आवश्यकतेनुसार टॉयलेट उभारण्यास मा. आयुक्त यांच्या मंजूरीने करणेस मान्यता देणेत येत आहे.तसेच याकामी सी.एस.आर चे माध्यमातून अथवा अन्य संस्थांनी अशा प्रकारे स्वच्छतागृहे/शौचालये बांधून हस्तांतरीत केल्यास त्याची स्वच्छता, देखभाल दुरुस्ती ही महापालिकेमार्फत करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर –** वृक्ष प्राधिकरण समिती सदस्यपदी ज्या सदस्यांची निवड झाली आणि स्मार्ट सिटीमध्ये ज्या सदस्यांची निवड झाली या सर्व सदस्यांच मी अभिनंदन करतो. तसेच सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे मी जाहीर करतो.

-----

**(नितीन (आप्पा) प्रताप काळजे)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/१०/कावि/६०/२०१७
दिनांक - ०९/०८/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.